नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

युगवाणी
१९८६

'महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ' पुरस्कृत विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

या मासिकाला वापरलेला कागद हा महाराष्ट्र राज्य शिक्षण खात्याने उपलब्ध करून दिलेला सवलतीच्या दरातील कागद आहे.

एप्रिल–मे १९७६
चैत्र–वैशाख शके १८९८
वर्षारंभ अंक

युगवाणी

संपादक : मधुकर आष्टीकर
कार्यकारी संपादक वसंत खेरडीकर

मूल्य तीन रुपये | वर्ष ३२ अंक १–२

संपादकीय

मराठी भाषिक मासिके, साप्ताहिके, वार्षिकांक व तदितर नियतकालिकांची संख्या झपाट्याने वाढत आहे, ही आनंदाची बाब आहे. पण 'कविता' हा अपवाद वगळल्यास, इतर प्रकारचे मनोरंजक विदग्ध वाङ्मय आजकाल अत्यल्प प्रमाणात निर्माण होत आहे. आणि जे काही होत आहे, त्याचे स्वरूप पुष्कळदा अनुवादात्मक वा अनुकरणात्मक आढळते. हे घटणारे प्रमाण व ही प्रवृत्ती चिन्त्य होय.

समीक्षा, टीका लेख, संशोधन व परिचयात्मक वैचारिक लेखन मात्र ह्या सर्व नियतकालिकांतून विपुल प्रमाणात आढळून येत आहे. मराठीची सृजनशील, विदग्ध प्रतिभा क्षीण होऊन बौद्धिक आणि वैचारिक अंग मात्र बलवान होत चालले आहे असा ह्याचा अर्थ घ्यावा काय? की प्रतिभेच्या अभावी, हे ललित-लेखन कमी होत आहे हे सत्य आहे आणि कुणाहि व्यक्तीवर, तिच्या चारित्र्यावर, मतांवर वा लेखनावर टीकास्त्र चालविणे, पुस्तकी बुद्धीच्या जुजबी तर्काधारे सोपे जाते म्हणून हे वैचारिक म्हणविणारे लिखाण विपुल निर्माण होत आहे ही वस्तुस्थिती आहे? चांगला विनोद तर आजकाल दुर्मिळच होत चालला आहे. दुर्मिळ होत चाललेले प्राणी व इतर जाती जोपासण्यासाठी सरकार जसे योजनापूर्वक प्रयत्न करीत आहे तसे काहीसे ह्या ललितलेखन प्रकारांबाबत व विनोदाबाबत करणे आज अगत्याचे होऊन बसले आहे. साहित्य संस्था व इतर सांस्कृतिक घटकांनी एकत्र येऊन ह्याबाबत गंभीर विचारविनिमय करणे आज अगत्याचे झालेले आहे.

अख्या भारतात, आर्थिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात कृतिशील वैचारिक स्थित्यंतरे झपाट्याने होत आहेत. त्यांचे सुखद फलितही दृष्टिपथांत येत आहे. असे असता त्यांचे पडसाद मात्र आजच्या विदग्ध वाङ्मयांत का पडू नयेत ह्याची खंत वाटते. असे घडू नये. वैदर्भीय लेखकांनी तरी भोवतालच्या बदलत्या परिस्थितीची जाण ठेवून ललित वाङ्मयनिर्मिती करावी ही अपेक्षा.

ख्यातनाम वैदर्भीय साहित्यिक श्री. व्यंकटेश वकील आणि सुप्रसिद्ध कवि व नाटककार श्री. चिं. त्र्यं. खानोलकर (आरती प्रभु) यांच्या निधनाने मराठी साहित्याची अपरिमित हानी झाली आहे. व्यक्तिशः व वि. सा. सं. तर्फे हार्दिक शोकसंवेदना व्यक्त करतो.

हा वर्षारंभ अंक आहे. लेखकांचे सहकार्य ह्यावर्षीही पूर्ववत मिळत राहीलच ही खात्री आहे. गतवर्षी दिलेल्या सहकार्याबद्दल मी कृतज्ञ आहे. मुद्रक श्री. श्यामकान्त धनहट्टी ह्यांचे केवळ मुद्रक म्हणूनच नव्हे तर संपादकीय साहाय्यक म्हणूनहि अनमोल सहकार्य लाभले. सर्वांगसुंदर अंक काढण्यात त्यांचाहि वाटा आहे. मी त्यांचा आभारी आहे.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

पंढरपूर येथील चौऱ्याऐशीचा शिलालेख

शं. गो. तुळपुळे

'युगवाणी'च्या ऑगस्ट–सप्टेंबर १९७५ च्या अंकात श्री. वावगावकर यांचा "'पंढरपूर चौऱ्यांशी' चा शिलालेख – नामचर्चेवर नवा प्रकाश" हा लेख प्रसिद्ध झाला आहे. या तीन–पानी, सहा–स्तंभी लेखातील केवळ एक स्तंभ किंवा अर्धे पान 'नवा प्रकाश' दाखविणारे असून उर्वरित पाच स्तंभ केवळ चर्वितचर्वणात्मक आहेत. त्यातही मुख्यतः माझ्यावर टीका करणे एवढच लेखकाचा हेतू दिसतो. त्यालाही हरकत नाही. पण मग लेखाचा मथळा बदलणे अवश्य होते. असो. शिवाय, 'चौऱ्यांशी'चा शिलालेख या नावाची जी 'संभाव्य उकल' म्हणून श्री. वावगावकरांनी दाखविली ती एका शब्दात सांगावयाचे म्हणजे केवळ मनःकल्पित आहे. आसपासच्या ८४ गावांच्या विभागाचे प्रमुख ठाणे पंढरपूर व त्यावरून 'पंढरपूर चौऱ्यांशीचा शिलालेख' हे नामकरण, आणि त्याचेच 'चौऱ्यांशीचा शिलालेख' हे शेष–नाम, अशी ही अभिनव 'उकल' आहे. पंढरपूर हे ८४ गावांचे ठाणे असून ते त्या नावाने ओळखले जात होते, असे जोपर्यंत दाखविता येत नाही तोपर्यंत वरील 'उकल' केवळ कल्पनेत जमा होईल. शिलालेखाच्या पुसून गेलेल्या भागात 'पंढरपूर चौऱ्यांशी' अशा प्रदेशस्थलवाचक अर्थाचा निर्देश असण्याची शक्यता श्री. वावगावकर शेवटी व्यक्त करतात. पण याचा अर्थ इतकाच, की त्यांनी मूळ लेख पाहिलेला नाही. कारण त्यातील पुसलेला भाग दानविषयक तपशिलाशी संबद्ध असून त्याचा 'पंढरपूर' या ग्रामनामाशी कोणताही संबंध नाही. हे मूळ शिलालेखाच्या अभ्यासकांना चांगले ठाऊक आहे.

याप्रमाणे 'नवा प्रकाश' म्हणजे केवळ अंधार आहे हे पाहिल्यानंतर लेखकाने केलेल्या वैयक्तिक टीकेकडे वळतो. त्यांचे म्हणणे असे की मी "पं. इंद्रजींच्या म्हणण्याची मोडतोड करून त्यातला सोयीपुरताच अंश उद्धृत करून मग त्याचे खंडन करण्याचा प्रयत्न केला आहे... (व) पुढे राजवाड्यांच्या मताचे खंडन करतानाही (मी) हाच प्रकार केला आहे" (पृ.११०). सारांश, पं. इंद्रजी व राजवाडे या दोघांच्याही बाबत मी अन्याय आणि मतलबीपणा केला असे लेखकाचे म्हणणे दिसते. प्रथम पं. इंद्रजीविषयी लिहितो. त्यांनी केलेली लेख–नाम–चर्चा फार त्रोटक असून मी 'प्राचीन मराठी कोरीव लेख' या ग्रंथात क्र. ३४ च्या लेखात ती समग्र दिली आहे, तिची 'मोडतोड' करून दिलेली नाही. 'मोडतोड' करण्यासारखे त्या चर्चेत काही नाहीच. डॉ. इंद्रजींचे म्हणणे असे की या शिळेवरील प्रारंभीचा शकांक ११९४ असा असून त्यातील तिसरा ९ हा आकडा ८ सारखा दिसत असल्याने ११८४ असे वाचले गेले व त्यामुळे या शिळेस चौऱ्यांशीची शिळा असे नाव पडले. डॉ. इंद्रजींचे वरील म्हणणे उद्धृत करून मी ते निराधार असल्याचे दाखविले आहे, इतकेच. यात 'मोडतोड' कोठे आली ? जाता जाता हेही सांगणे अवश्य आहे की मी पं. इंद्रजींचे म्हणणे मुळातून म्हणजे 'गॅझेटीयर' मधून दिले आहे, तर प्रा. वावगावकर यांनी, त्यांच्याच शब्दात सांगावयाचे म्हणजे, "राजवाड्यांनी दिलेले इंद्रजीचे म्हणणे" उद्धृत केले आहे. कदाचित वरील लेख लिहिला तेव्हा त्यांच्या हाताशी 'गॅझेटीयर' नसेल; म्हणून त्यांना राजवाड्यांनी दिलेल्या उताऱ्यावर काम भागवावे लागले असावे.

पण श्री. वावगावकरांची खरी मळमळ राजवाड्यांच्या संबंधात आहे. प्रस्तुत शिलालेखास 'चौऱ्याशीचा लेख' हे नाव का पडले याची एकाहून एक सयुक्तिक अशी तीन कारणे देऊन ती सर्वच खोटी असण्याची शक्यता राजवाडे बोलून दाखवीत असताना त्यातील एका (म्हणजे तिसऱ्या) कारणाचा फोलपणा उघड करून दाखविण्यात मी हातचलाखी केली आहे असे श्री. वावगावकरांचे म्हणणे दिसते. परंतु यात हातचलाखी, किंवा "राजवाड्यांचाच उत्तरपक्ष

[illegible] म्हणून " राजवाड्यांविरुद्ध वापरण्या "चा [illegible] मुळीच नाही. कारण राजवाड्यांनीच स्वतः हेही (म्हणजे तिसरे) कारण दुसऱ्याइतकेच, कदाचित् त्याहूनही जास्त सयुक्तिक आहे " असे स्पष्टपणे म्हटले आहे. म्हणजे " या शिळेवर प्रथम चौऱ्यायशी नामांकित [illegible]रांची नावे खोदली गेली, त्यावरून चौऱ्यायशी पुण्यपुरुषांची शिला अथवा संक्षेपाने चौऱ्यायशीची शिला अशी प्रख्याती या दगडाची झाली " हे तिसरे कारण राजवाड्यांना, ते ' सयुक्तिक ' असल्यामुळे, मान्य दिसते हे उघड आहे. मग ते खोडून काढण्यात मी गैर ते काय केले ? हां, पुढे राजवाड्यांनीच स्वतः " यांपैकी सगळीही कारणे खोटी असली, तरी सध्या या दगडाला चौऱ्यायशीचा दगड म्हणतात, हे मात्र खरे आहे " असे म्हटले आहे हे खरे. पण नेमके याच ठिकाणी श्री. वावगावकर घसरले आहेत. " यांपैकी सगळीही कारणे खोटी असलीं तरी. . ." या राजवाड्यांच्या वाक्याचा पूर्वार्ध त्यांना नीटपणे कळला नाही व त्यामुळे त्यांनी त्याचा अर्थ ' ती खोटी आहेत ' असा केला. राजवाडे यांचा अभिप्राय तसा नाही. त्यांना इतकेच म्हणावयाचे आहे की वरील सर्वच कारणे वादग्रस्त असल्याने ती बाजूला ठेवून तूर्त या नामचर्चेच्या प्रश्नात अधिक खोल जाण्यात काही अर्थ नाही. " सगळीही कारणे खोटी असली तरी " हा वाक्यार्ध म्हणजे राजवाडीभाषेची एक ढब असून ती ध्यानात घेतल्यावाचून त्यांचे म्हणणे स्पष्ट होणार नाही. येथे केवळ वाच्यार्थ अभिप्रेत नसून त्यापलीकडे जाणे अवश्य आहे. श्री. वावगावकरांना राजवाडी भाषेची ही मोड कळती तर त्यांच्याकडून वरील प्रकारची विपरीत टीका झाली नसती. राजवाड्यांची भाषा आता जुनी झाली हे खरे; पण ती न कळण्याइतकी जुनी झाली असेल असे मात्र मला वाटले नव्हते !

❋ ❋ ❋

वचन

संध्याकाळ :
कुठंवर घेऊन जाणार मला तुझ्यासोबत
तुलाही तर तुझा रस्ता ज्ञात नाही.
कितीही चाललो तरी संपणार नाही ही वाट
वाटेने तरी कुठवर चालायचे ?
डोळ्यांच्या डोहात
माझ्या प्रतिबिंबाच्या सावल्या
कुठे घेऊन जात आहेत मला
जो प्रदेश मी कधी पाहिला नाही
ज्याचे नाव मी कधी ऐकलेच नाही
स्वर ऐकलाच नाही असा कधी जीवघेणा
असा फाटलोच नाही कधी उसवतांना. . .
अशा संध्याकाळी पिंपळाखाली
का घेतलेस वचन
तुला विसरून संसारात रमून जाण्याचे ?

—कृष्णा चौधरी

दुभंग

आता
दुभंगल्या खुरांची
ही गुरं
सैरावैरा भरकटतील
जागोजाग
पायखुणा उमटवतील
आणि मग
हंबरडा फोडून विचारतील
सांगा सांगा
या अवघ्या मातीत
आहे का कुठे अभंग जागा ?

—लक्ष्मीकांत प्रामाणिक

पेमेंट

मुरलीधर कुलकर्णी

भिंतीला पाठ देऊन तो खुषीनं विडीचे झुरके घेत बसलेला. मनात एक एक विचार. सही कशी करायची ? पैसे कसे घ्यायचे ? भिमाला हुलकावणी देऊन बँकेत जायचं आणि पैसे आपल्या नावावर टाकायचे. मनातल्या मनात तो आराखडा तयार करीत होता आणि स्वतःवरच खूष होत होता. समाधानानं त्यानं विडीचा एक खोल झुरका घेतला आणि त्याला ठसका लागला. त्यानं मग विडी चिरडून टाकली. अजून मोटारला उशीर होता म्हणून तो सावकाशीनं उठला. मग दोन मैलांची वाट तुडवीत तडक निघाला. कानाला गमच्या गुंडाळला.

कालच त्याला पेमेंटची नोटीस मिळाली होती. घराच्या पडीक जागेचं पेमेंट पाच सहाशे मिळेल असा अंदाज. स्वतःच्या नावावर ते बँकेत टाकण्याच्या स्वप्नात तो दंग होऊन राहिला. नोटीस मिळाल्यावर रात्रीदेखील त्याला पैशाचीच स्वप्नं पडली होती.

रस्त्यानं चाललेला एकटाच. काळोख. एका घुशीच्या विळातून चांदीचे चमचम रुपये बाहेर येताहेत. त्यानं सदऱ्याची खोळ केली. भराभर रुपये जमा करून खोळीत भरून घेतले. भरतच राहिला, पैसे संपेनात. तो दमला. कंटाळून घरी आला. शर्टाची पाखी धरलेले हात सोडले. खोळीतून बदाबदा दगडच खाली सांडले. स्वप्नातही निराशाच पदरी आली.

आजवर निराशाच झालेली. ही शेवटली संधी. दवडायची नाही. पैसे घ्यायचे आणि भिमाला कळू न देता तिथून पोबारा करायचा. सरळ बँकेत. आजवर प्रत्येक पेमेंटच्या वेळी भिमानं त्याच्या टाळूवरून हात फिरवला होता. तो बनला होता. भिमा नावाप्रमाणं भीम. पाठीवर पाय देऊन आलेला सख्खा भाऊ.

भिमा सातवीपर्यंत शिकला. तल्हाटी झाला. त्याचं स्वतःचं डोकं मात्रं चालेना. चौथीतूनच शाळा सोडून दिली. बापानं पूजा अर्चा नि थोडं आह्निक तयार करून घेतलं. त्याच्या जिवावर तो भटकी करू लागला.

सुरवातीला आईबाप गेल्यावर दोघंजणं एकत्रच होते. धाकटा भिमा नोकरीला. भिमा म्हणाला होता,

"भटकी कर आणि शेतीवाडीकडं बघ."

"मी बघीन. काळजी करू नकोस. नोकरी सोडून कसं चालेल ?"

तेव्हापासून तो शेतीवाडी बघू लागला. सरळ स्वभाव. नाकासमोर चालणंच तेवढं ठाऊक. जमिनी कुळाकडं गुंतलेल्या होत्या. नोटिशी देऊन कच्च्या कुळकायद्याच्या काळात भिमानं सोडवून घेतल्या. त्याच्या ताब्यात दिल्या. भिमा स्वार्थ बघतोय हे येडम्याच्या ध्यानातहि आलं नाही.

भिमा महिन्याच्या महिन्याला आल्यागेल्याचा हिशेब बघू लागला. जरा कुठं दीडदोन रुपयांचा घोटाळा दिसला की भिमाला त्याचा संशय यायचा.

"हे दोन रुपये गेले कुठं ?"

"झालं असंल इकडंतिकडं. त्याचं काय !"

"ही लक्षणं ठीक नाहीत. येथून पुढं शेतीतला छदाम खर्च करायचा नाही. तुझं तू भटकीवर भागव.'

" ? "

" छक्केपंजे चालणार नाहीत. माझ्याशी गाठ आहे !"

तो त्याला घाबरत होता. त्याच्यासमोर त्याची नांगी पडत होती. भटकीच्या मिळकतीवर तो त्याचं आणि एकुलत्या एका मुलीचं चालवू लागला. शेतीत अर्धा हिस्सा असूनहि.

शारदा मोठी झाली. लग्नाला आली म्हणून त्यानं भिमाजवळ विषय काढला. स्वतः स्थळाच्या शोधात राहिला. एखादवेळी अगदी जुळून येई. भिमा

अनुक्रमणिका

परस्पर सोयऱ्याला काहीतरी कळवी आणि लग्नात बिब्बा घाली. पोटच्या पोरीवर त्याचं अतोनात प्रेम. एक मुलगी पदरी टाकून बायको कधीच मरून गेलेली.

घरात भिमाची बायको कशावरूनही खुसपट काढू लागली. शारदाला छळू लागली. कटकटी सुरू झाल्या. भिमाची बायको फुणग्या लावू लागली. त्यामुळंच एकदा भिमानं त्याला भरस्त्यात बुटानं मारलं. स्वतःच्या दुबळेपणाची त्याला जशी चीड आली तशीच कीवहि. जगानं पाहिलं आणि ते दात काढून हसलं. त्याच्या दुबळेपणावर पचकन थुंकलं.

कटकटींना कंटाळून त्यानं हक्काचं घर सोडलं. बिऱ्हाड उचललं. शारदाला घेऊन टाकळीला राहू लागला. दुसऱ्याच्या घरात. टाकळीला बाया होत्या तशा हातभट्टयाही. तो वैतागलेला. कुणीतरी म्हणालं, घेऊन बघ. घेतली नि चटक लागली. गाणाऱ्या बाईच्या बैठकीला जाऊ लागला आणि रमला. बाहेरख्याली झाला. गाव मागं उपहास करी. पण त्याला गाव भटकीची कामं देतच राहिलं. कारण गावच भ्रष्ट होतं.

एकदा त्याला वाटलं, आपल्या हिश्श्याची जमीन मागून तर पहावी ! म्हणून तो आपल्या गावी आला. ऐतवारी भिमा यायचा. तो ऐतवार बघून आला. विषय काढण्यासाठी तो बेताबातानं बोलू लागला,

"तुझ्याचकडं आलूतो."

"जमतंय वाटतं कुठं शारदेचं !"

भिमाला त्याचा अर्थ ठाऊक आहे अशा अर्थानं तो हसला.

"हसतोस काय ?"

"नाही दुसरंच काम होतं."

"बोल."

"नाही म्हंजे – म्हंजे जमिनीच्या वाटण्या करू या आपण. किती दिवस उपाशी राहू मी ?"

"कसली वाटणी रे ? अरे भणंग तर भणंग ! मागं कोण आहे खायला तुझ्या ? तुला काय करायचीय वाटणी ? एक तर पोरगी. ती पण लग्न होऊन आज उद्या आपल्या घरी जाईल. तुला कशाला वाटणी ? घेशील नि फुंकून टाकशील." भिमाच्या शब्दांनी त्याला कहाणीतल्या वाघांची आठवण झाली. – तुला रे वसा कशाला ? उतशील मातशील घेतला वसा टाकून देशील. त्याला हसूच आलं.

"हसतोस काय ? तुला नाही अक्कल. लोक फसवतील तुला."

"मी काय दुधखुळा ?"

"सरळ सांगितलं तर समजत नाही वाटतं ?" म्हणत भिमानं बुटाकडं पाहिलं. कानकापल्या कुत्र्यासारखा तो उठला आणि टाकळीच्या वाटेला लागला.

त्याच्या सुदैवानं की दुर्दैवानं त्या भागात सरकारनं एक धरणाचा प्रचंड प्रकल्प हाती घेतला. सरकार जमिनी ताब्यात घेऊ लागलं. दोघांचीहि शेती त्यात बुडणार होती. अनेकांच्या बुडणार होत्या तशी. त्याला मनातल्या मनात आनंद. निदान आता तरी जमिनीचे रोकड पैसे हाती येतील. जमीन काही भिमाच्या एकट्याच्या नावावर नव्हती. शारदाचं कार्य उरकता येईल.

शेतीच्या पैशांचा पहिला हप्ता. त्याचं नाव पुकारलं. सही करताना व पैसे घेताना त्याचे हात थरथरत होते. एकदम दोन हजार रुपये. इतके पैसे त्यानं आयुष्यात पाहिले नव्हते. नोटांची बंडलं हातात घेऊन तो झपाट्यानं बाहेर पडला. व्हरांड्यात समोर भिमा उभाच. म्हणतो कसा, बघू दे बघू दे. मोजून पाहू या. हातातली बंडलं त्यानं ओढून घेतली. पैसे मोजू लागला. तो खुळ्यासारखा बघत राहिला. हा हा म्हणता भिमा मामलेदार कचेरीच्या बाहेर झपाट्यानं निघाला. हा मागं पळतोय.

"अरे भिमा देरे माझे पैसे." तो काकुळतीला येऊन म्हणाला. गावचे लोक हसत होते. बँकेत गेल्यावर भिमानं ते सगळे पैसे स्वतःच्या नावावर टाकले. म्हणाला,

"अरे वेडा की काय तू बाबू ? एवढे पैसे घेऊन चाललास. भरस्त्यात कुणी लुबाडलं नसतं का ? काळजी करू नकोस. तुला लागतील तेव्हा पैसे माग. पैसे जातात कुठं ?"

त्या पैशांबद्दल पुढं कधीच त्याला काळजी करावी लागली नाही. दुसरा हप्ता दीड हजारांचा. तोहि भिमाच्या भक्ष्यस्थानी असाच पडला. हा हात हालवीत परत. त्यावेळी भिमाबरोबरचा पित्त्या म्हणाला,

" राहू दे बाबूराव भिमाकडं पैसे. तो काय खात न्हाई, भावच हायेना ! काय कुठं पळून जातूय ? नड लागली म्हंजी माग." त्यावेळी खुळचागत तो आळी-पाळीनं दोघांच्या तोंडाकडं कितीतरी वेळ बघत राहिला. भिकाऱ्याचं बोचकं हरवल्यागत.

हातातोंडाशी आलेले जमिनीचे पैसे गेले. आता पडीत जागेचे. त्याच्या मनात धाकधूक.

तो मोटारतळावर आला तेव्हा गाडीला ही गर्दी ! अनेकांना नोटिशी होत्या. त्यात दिवसाची एकच गाडी. त्यानं रांगेला नंबर लावला. बिडी शिलगावून धूर सोडीत इकडं तिकडं उगाचच बघू लागला. खरं म्हणजे गाडी पकडायला दोन मैलांची तकट त्याला नेहमीच पडे. टाकळी म्हणजे आडमाप गाव. ना सडक ना मोटार. तेवढ्यात भिमा दैत्यासारखा समोर हजर. त्याच्या काळजात उतरंड गडगडली.

"बाबू, माझंहि एक तिकिट काढ बरं का. मी गाडीत जागा धरतोय. पैसे देतो नंतर." मनात नसूनही भिम्याचं तिकिट त्याला काढावं लागणार होतं. त्याला स्वत:ची किळस आली. आपण इतके मिंधेपणानं का वागतो ? कळेना. समजत असलं तरी भिम्या अमकं कर म्हणाला की तो करत होता. कधी कधी मन बंड करी. पण पालीपुढं विंचवानं नांगी टाकावी तसं होई. कान कापल्यागत होई.

गाडी अजून आली नव्हती. उगा गर्दी करणारी पोरं 'आली आली' म्हणून मधूनच गलगा करीत होती.

गाडी आल्यावर रांगेला त्यानं दोन तिकिटं काढली. गाडीतल्या गर्दीत खेचाखेच करुन शिरला. भिम्यानं आपल्यासाठी जागा पकडली असेल म्हणून धावला. भिम्याच्या शेजारी सरपंच बसलेला. उठा कुठं म्हणता येतंय ? भिम्यानंच जागा दिली असेल भडव्यानं. त्याचं तिकिट देऊन तो उभाच राहिला. भिमा खुशालून सरपंचाशी गोष्टी करीत होता. गाडी चालू होऊन मैलामागून मैल मागं टाकीत तालुक्याला आली. भुकेलेल्या कुत्र्यानं भाकरीवर झडप घालावी तशी माणसं पेमेंटसाठी कचेरीकडं धावू लागली. उतरून तो चालू लागला. भिमानं त्याला गाठलं.

" बाबू, दशमीविशमी आणलीस का ? की घरीच जेवून आलास ? लागली तर माझ्याकडं आहे बरं का ! नाहीतर म्हण पाठचा भाऊ आपल्याला विचारीत नाही म्हणून."

" जेवून आलोय मी."

" चल, हॉटेलात. जरा चहा घेऊ या !"

" नंतर यायचा तिकडं. पुकारायचे."

" इतक्यात कुठला ? चल." भिमानं त्याच्या खांद्यावर हात ठेवला. दोघं हॉटेलात गेले. भिमानं एकदम दिली पेढ्यांची आर्डर.

" ए पोऱ्या, पाव पाव किलो पेढे." तो आश्चर्यचकित. भिमाकडं बघू लागला. तोवर पेढ्यांच्या बशा पुढ्यात आल्या.

" घे. खा. अरे मला तू काही हे समजू नकोस." भिमा बकाबक पेढे भरू लागला. त्यानंही बरेच दिवसात पेढे पाहिलेच नव्हते. जिभेवर पेढे विरघळत राहिले.

" बाबू, तू पैशाची मुळीच काळजी करू नकोस. मी भाऊच ना तुझा ? माझ्या नावावर काय नि तुझ्या काय, सारखंच. अरे, पैसे तू केव्हाही माग, अर्ध्या रात्री देखील. झोपेतून उठून देईन." तो जरा विरघळलाच. पेढ्यासारखा.

" अरे, भावाला भावानं नाही जाणायचं तर कुणी ? तू निर्धास्त रहा. आणि शारद काय म्हणतेय ? बरी आहे ना ? शेवटी पिंपळगांवच्या स्थळाचं फिस्कटलंच ना ? मी म्हटलंच होतं. दरिद्री लेक. मुलगा भीक मागतोय. जमीनजुमला नाही. मुलगी काय खाणार, खाक ? नकोच लागूस नादी तू. शारदचं कल्याण करायचं ना तुला ? " भिमा बोलतच होता आणि हा ऐकत. मंत्रमुग्ध.

"आणखी काय हवंय तुला ? जलेबी ? बर्फी ? चिवडा ? अरे काहीही माग ! माणसानं खाऊन जगावं. पोटाला चिमटा घेऊन जगूच ने. खूष आहोत आपण. ए पोऱ्या दोन चाय लाव पाणी कमी. नको, स्पेशलच लाव."

चहाचे घुटके घेताना बशीवरून त्याची नजर भिमाकडं गेली. भिमा डोळे मिटून गरम चहा समाधानानं पीत होता. पाण्यात बसलेल्या बगळ्यासारखा. भिमा उठून निघाला. कोरी करकरीत दहाची नोट त्यानं हॉटेलवाल्याकडं सरकवली. ऐटीत बाबूकडं पाहिलं. उरलेले पैसे घेऊन तो हॉटेलबाहेर पडला. लांडग्याच्या तावडीतून सोडवलेली शेळी जशी पुन्हा

लांडग्यामागंच पळते तसा तो भिमामागं ओढला जात होता. भिमा पानाच्या ठेल्यासमोर थांबला.

"बाबू पान घेणार ना रे ? दोन पानं लावा. तंबाखू पान. एकात चुना जास्ती. आणि एक विडी बंडल." भिम्यानं पान तोंडात कोंबलं. एक पान आणि विडी बंडल त्याच्याकडं केलं. पान खाऊन खुशीनं विडीचा धूर काढीत तो भिमामागून चालू लागला.

"बरं का बाबू मी सांगतो, हे साले पक्के हरामखोर. पैसे खातात साले. कमिशन लागतं यांना शेकड्यामागं दहा रुपये. नाहीतर नंबर येतोय् कशाला ? पण आपलं गांव भेटलं यांना चांगलं शेराला सव्वाशेर. त्यांना वाटलं सारेच भाटेमामा. यांच्या बापानं ठेवलंय् कमिशन. लुच्चे साले !" भिमा बरंच बोलत होता. तो ऐकत होता. ते कचेरीत पोचले. चहूकडं माणसांची ही गर्दी ! काही उभी गप्पा करीत. काही टोळघाटोळघांनी बसलेली. कान पैसा वाटपाच्या खोलीकडं. नाव पुकारलं की जो तो तटकन उठं. धोतर झटकून बगलेत मारं. आत धाव घेई. बाहेर दारातच कुठल्यातरी बँकेची माणसं बसलेली. पैसा घेऊन बाहेर येणाऱ्या माणसाला आग्रह करून खातं उघडायला लावत होती. आतून नोटांची बंडलं हातात सावरीत येणारा माणूस धोका नको म्हणून तिथल्या तिथं नोटा त्या माणसाच्या हवाली करीत खातं उघडीत होता. नोटा लाकडाच्या मोठ्या पेटीत गडप होत होत्या. ही बरी सोय होती.

माणसं इथंतिथं बचावचा बोलत होती. शब्दांची सरमिसळ चाललेली.

'आपलं नाव आलं का ?' म्हणून भिमानंच चौकशी केली. नंबर अजून आला नव्हता. तो भितीला रेलून बसला. विडीचा धूर काढू लागला. एखादा सूटबूटवाला एखाद्या ऑफिसातून बाहेर पडताना दिसला की दोन्ही हातातल्या चंबूत विडी लपवीत होता. बराच वेळ वाट बघून तो कंटाळला. भिमा इकडं तिकडं भटकत गावच्या माणसांबरोबर गोष्टी करीत होता. लोक नोटांची बंडलं घेऊन बाहेर पडत होते. त्याच्या तोंडाला पाणी सुटत होतं. उत्सुक होऊन बँकेच्या माणसांजवळ जाऊन त्यानं त्या लाकडाच्या दणकट पेटीत डोकावून पाहयलं. पेटी बंडलांनी भरत आलेली होती. शंभराच्या, दहाच्या, पाचाच्या, दोनाच्या, एकाच्या नोटांच्या बंडलांची भेसळ झालेली. बंडलं टाकण्यासाठी पेटीजवळ बसलेला माणूस मधूनच ती उघडीत होता. कचऱ्याप्रमाणं बंडलं आत झोकीत होता. त्याच्या खप्पड तोंडावरले खोल डोळे बुभुक्षित झाले. एवढे पैसे आजवर त्यानं एके ठिकाणी कधी पाह्यले नव्हते.

"बाबूराव गणपतराव पुणेकर"

"भीमराव गणपतराव पुणेकर"

नाव पुकारल्याबरोबर तो दचकला. हातातल्या विडीचा गडबडीत चटका बसला. विडी जमिनीवर चिरडून उभा राहीस्तवर भिमानं वाटपाच्या खोलीत झेप घेतली. त्याचे हातपायच गळाठले. अंगात उरनं बळ आणून तो आत पोचला.

"बाबूराव गणपतराव कोण ?"

"मी–मी–माझाच भाऊ तो. द्या माझ्याकडं." भिमा लाचारपणानं बोलत होता. याला "मी बाबूराव" म्हणायचं त्राण नव्हतं. भान नव्हतं.

"तुम्ही कोण ?"

"भाऊ हयाचा. धाकटा भाऊ."

"मग तुम्ही कशाला करताय हात पुढं. तुम्हाला काय अधिकार ? तुमचं नाव पुकारलंय ? प्रथम त्यांचे पैसे त्यांना घेऊ द्या. ज्याचे पैसे त्यालाच मिळायला हवेत. तुमची लुडबुड नको. मागं व्हा. सरकारी कायदा कळतो ना ?" भिमा चपराक बसल्यासारखा तोंड उतरवून मागं झाला.

"आम्ही भाऊच. एकत्रच आहोत. बरं द्या–द्या त्याच्याकडं. त्याला दिले काय मला दिले काय एकच. कुणाकडंहि द्या तुम्ही. फरक नाही." भिमानं सारवासारव केली. हातात नोटांचं बंडल घेऊन असलेल्या अधिकाऱ्याकडं एकदा, एकदा नोटांच्या बंडलाकडं भिमा आधाशासारखं बघत होता. गिधाडासारखा दिसत होता.

"घ्या हो बाबूराव, सही करा अगोदर इथं." त्यानं थरथरत्या हातानं सही केली. अधिकाऱ्यानं बंडल त्याच्या हातात दिलं. कागदावर नोंद केली. हातात पैसे पडल्यावर बाबू बाहेर पडला.

खांबाशी बसून तो नोटा मोजत होता. तितक्यात भिमा त्याला मिळालेले नोटांचे बंडल हातात गच्च आवळून त्याला शोधत आला.

" किती रे बाबू ? बरोबर ना ?"

" साडेसातशे."

" बघू दे. बघू दे. मी देतो मोजून. चुकले असतील. मला तर सातशे साठ मिळालेत." हातातल्या नोटा हा हा म्हणता भिमानं ओढून घेतल्या. कावळ्यानं लहान मुलाच्या हातातलं खाणं झडप घालून पळवावे तसं त्याला झालं. तो उठून उभा राहिला. चेहरा भीतीनं व्यापला. अविश्वासानं तो बाबूकडं पहात राहिला. भिमा नोटा मोजत होता. तो नोटांकडं पुन्हापुन्हा हात नेत होता. भिमा तो चुकवीत होता. नोटा मोजून झाल्यावर त्यानं दोन्ही हात पुढं केले. भिमानं हात वर नेला. त्यानं हात उंचावले. उंचावत राहिला. तस तसे भिमानं हात आणखी उंचावले. भाकरीचा तुकडा घेऊन भुकेलेल्या मरतुकड्या कुत्र्याला चाळवावं तसा भिमा त्याला चाळवू लागला. त्याचा चेहरा भयग्रस्त लाजिरवाणा झाला. मेल्याहून मेल्यासारखं त्याला झालं.

" चल बँकेत टाकू या." म्हणत बँकेच्या माणसाकडं भिमा निघाला. तो त्याच्या मागं धावला. लोकांना गंमत वाटत होती. बँकेची माणसं हसत होती.

" हे पैसे टाका हो आमचे. नवं खातं. माझ्याच नावावर." भिमानं रुबाबात आज्ञा सोडली.

" नाव ?"

" भिमराव गणपतराव पुणेकर."

" अरे पण — पण माझे पैसे. माझ्या नावावर —" त्यानं बोलण्याचा दुबळा प्रयत्न केला.

" गप रे तू. मधे बोलू नकोस. हं करा भिमराव गणपतराव. तुला काय करायचेत रे एवढे पैसे ? टाकशील उडवून दारूपायी. सांगतो काय ? अहो पक्का दारूबाज माणूस हा. मी आहे म्हणून चाललंय. नाही तर कोणता भाऊ याला जवळ करील ? घरी लग्नाची पोर वाढवलीय. याला त्याची काळजी नाही. खुशाल आपला लोळतो गटारात. पैसे असू दे माझ्याकडं. हे घे तुला वरले सेहेचाळीस रुपये. जा मजा कर. पुन्हा लागले तर माग ! हां, सातशे रुपये. तुला काय करायचेत एवढे ? मग देतो ना ! सातशे सातशे चौदाशे टाकतोय बँकेत. हे घे सेहेचाळीस सध्या घरखर्चाला." फक्त सेहेचाळीस रुपये त्यानं त्याच्या हातात कोंबले.

" वरचे चार रुपये कापून घेतलेत म्या. मघाचे हॉटे लातले." भिमानं खुलासा केला. त्याचं तोंड काहीतरी बोलायचा प्रयत्न करत होतं. पण नुसते ओठ हालत होते. शब्दच उमटत नव्हता.

त्याला वाटलं एकदम मोठ्यानं बोंब ठोकावी. सभोवताली गावाकडली माणसं. वेडं ठरवलं असतं त्यांनी. शिवाय बोंब ठोकायला घशातून आवाज निघेल की नाही याची त्याला खात्री नव्हती.

बँकेची माणसं तमाशा बघत होती. तेवढीच त्यांना दोन मिनिटं करमणूक झाली. त्यांना तरी काय हवं होतं. अधिकात अधिक रक्कम बँकेच्या खात्यावर जमा करायची आणि उरल्या वेळात गंमत बघायची. त्यांनी देखील घाई करून चौदाशेची रक्कम बँकेच्या पदरी पाडून घेतली. बाचाबाचीकडं फारसं लक्ष न देता. दर पेमेंटच्या वेळी होणारे अनेक घोटाळे गोंधळ त्यांच्या परिचयाचे होते. त्यांना वादाशी घोटाळ्याशी काही कर्तव्य नव्हतं. कर्तव्य होतं फक्त मोठाल्या रकमांची खाती उघडून देण्याशी. बँकेच्या नावावर रक्कम जमा करण्याशी. सरकारच्या एका खात्यातून पैसा येत होता आणि बँकेत येऊन पडत होता. हा ओघ. या ओघालाहि थांबवण्याचं कारण नव्हतं. कुणाच्या अडीअडचणींचं सोयरसुतक नव्हतं. चौदाशे रुपयांचं खातं भिमाच्या नावावर उघडलं गेलं. बँकेच्या कारकुनानं पुस्तक तयार करून भिमाच्या हातात दिलं.

" हे बघ बँक बुक. बघ, खोलून बघं. आहे ना चौदाशेची रक्कम. अरे पैसे जातात कुठं ? उगा काळजी का करतोस फुकटची ? मी पळून जाणारा थोडाच आहे ? आता नाही ना धास्ती राहिली तुला ? झालं ना समाधान. अरे, मी काय धाकट्याभावानं तुला शहाणपणा शिकवावा ?" भिमानं पुस्तक त्याच्या तोंडासमोर उघडून धरलं. डोळे ताणून तो आकडा बघू लागला.

" हे बघ हे चौदाशे इथं. ह्या कोपऱ्यात रे. पाहिलंस ? एक हजार चारशे रुपये. आलं ना लक्षात ? आता काळजी सोड. अरे काळजी कसली करायची ? आपण दोघं भाऊच ना ? माझ्या नावावर असले काय न् तुझ्या नावावर असले काय, सारखेच ! होय का नाही ?"

तो वेड्यासारखा भिमाच्या तोंडाकडं बघत राहिला. रडू येईल असं वाटू लागलं. गळ्याची घाटी

लांडग्यामागंच पळते तसा तो भिमामागं ओढला जात होता. भिमा पानाच्या ठेल्यासमोर थांबला.

"बाबू पान घेणार ना रे? दोन पानं लावा. तंबाखू पान. एकात चुना जास्ती. आणि एक विडी बंडल." भिम्यानं पान तोंडात कोंबलं. एक पान आणि विडी बंडल त्याच्याकडं केलं. पान खाऊन खुशीनं विडीचा धूर काढीत तो भिमामागून चालू लागला.

"बरं का बाबू मी सांगतो, हे साले पक्के हरामखोर. पैसे खातात साले. कमिशन लागतं यांना शेकड्यामागं दहा रुपये. नाहीतर नंबर येतोय् कशाला? पण आपलं गांव भेटलं यांना चांगलं शेराला सव्वाशेर. त्यांना वाटलं सारेच भाटेमामा. यांच्या बापानं ठेवलंय् कमिशन. लुच्चे साले!" भिमा बरंच बोलत होता. तो ऐकत होता. ते कचेरीत पोचले. चहूकडं माणसांची ही गर्दी! काही उभी गप्पा करीत. काही टोळ्याटोळ्यांनी बसलेली. कान पैसा वाटपाच्या खोलीकडं. नाव पुकारलं की जो तो तटकन उठं. धोतर झटकून बगलेत मारं. आत धाव घेई. बाहेर दारातच कुठल्यातरी बँकेची माणसं बसलेली. पैसा घेऊन बाहेर येणाऱ्या माणसाला आग्रह करून खातं उघडायला लावत होती. आतून नोटांची बंडलं हातात सावरीत येणारा माणूस धोका नको म्हणून तिथल्या तिथं नोटा त्या माणसाच्या हवाली करीत खातं उघडीत होता. नोटा लाकडाच्या मोठ्या पेटीत गडप होत होत्या. ही बरी सोय होती.

माणसं इथंतिथं वचावचा बोलत होती. शब्दांची सरमिसळ चाललेली.

'आपलं नाव आलं का?' म्हणून भिमानंच चौकशी केली. नंबर अजून आला नव्हता. तो भिंतीला रेलून बसला. विडीचा धूर काढू लागला. एखादा सूटबूटवाला एखाद्या ऑफिसातून बाहेर पडताना दिसला की दोन्ही हातातल्या चंबूत विडी लपवीत होता. बराच वेळ वाट बघून तो कंटाळला. भिमा इकडं तिकडं भटकत गावच्या माणसांबरोबर गोष्टी करीत होता. लोक नोटांची बंडलं घेऊन बाहेर पडत होते. त्याच्या तोंडाला पाणी सुटत होतं. उत्सुक होऊन बँकेच्या माणसांजवळ जाऊन त्यानं त्या लाकडाच्या दणकट पेटीत डोकावून पाहूयलं. पेटी बंडलांनी भरत आलेली होती. शंभराच्या, दहाच्या, पाचाच्या, दोनाच्या, एकाच्या नोटांच्या बंडलांची भेसळ झालेली. बंडलं टाकण्यासाठी पेटीजवळ बसलेला माणूस मधूनच ती उघडीत होता. कचऱ्याप्रमाणं बंडलं आत झोकीत होता. त्याच्या खप्पड तोंडावरले खोल डोळे बुभुक्षित झाले. एवढे पैसे आजवर त्यानं एके ठिकाणी कधी पाहूले नव्हते.

"बाबूराव गणपतराव पुणेकर"

"भीमराव गणपतराव पुणेकर"

नाव पुकारल्याबरोबर तो दचकला. हातातल्या विडीचा गडबडीत चटका बसला. विडी जमिनीवर चिरडून उभा राहीस्तवर भिमानं वाटपाच्या खोलीत झेप घेतली. त्याचे हातपायच गळाठले. अंगात उतनं बळ आणून तो आत पोचला.

"बाबूराव गणपतराव कोण?"

"मी–मी–माझाच भाऊ तो. द्या माझ्याकडं." भिमा लाचारपणानं बोलत होता. याला "मी बाबूराव" म्हणायचं त्राण नव्हतं. भान नव्हतं.

"तुम्ही कोण?"

"भाऊ हयाचा. धाकटा भाऊ."

"मग तुम्ही कशाला करताय हात पुढं. तुम्हाला काय अधिकार? तुमचं नाव पुकारलंय? प्रथम त्यांचे पैसे त्यांना घेऊ द्या. ज्याचे पैसे त्यालाच मिळायला हवेत. तुमची लुडबूड नको. मागं व्हा. सरकारी कायदा कळतो ना?" भिमा चपराक बसल्यासारखा तोंड उतरवून मागं झाला.

"आम्ही भाऊच. एकत्रच आहोत. बरं द्या – द्या त्याच्याकडं. त्याला दिले काय मला दिले काय एकच. कुणाकडंहि द्या तुम्ही. फरक नाही." भिमानं सारवासारव केली. हातात नोटांचं बंडल घेऊन असलेल्या अधिकाऱ्याकडं एकदा, एकदा नोटांच्या बंडलाकडं भिमा आधाशासारखं बघत होता. गिधाडासारखा दिसत होता.

"घ्या हो बाबूराव, सही करा अगोदर इथं." त्यानं थरथरत्या हातानं सही केली. अधिकाऱ्यानं बंडल त्याच्या हातात दिलं. कागदावर नोंद केली. हातात पैसे पडल्यावर बाबू बाहेर पडला.

खांबाशी बसून तो नोटा मोजत होता. तितक्यात भिमा त्याला मिळालेले नोटांचे बंडल हातात गच्च आवळून त्याला शोधत आला.

"किती रे बाबू ? बरोबर ना ?"

"साडेसातशे."

"बघू दे. बघू दे. मी देतो मोजून. चुकले असतील. मला तर सातशे साठ मिळालेत." हातातल्या नोटा हा हा म्हणता भिमानं ओढून घेतल्या. कावळ्यानं लहान मुलाच्या हातातलं खाणं झडप घालून पळवावे तसं त्याला झालं. तो उठून उभा राहिला. चेहरा भीतीनं व्यापला. अविश्वासानं तो बाबूकडं पहात राहिला. भिमा नोटा मोजत होता. तो नोटांकडं पुन्हापुन्हा हात नेत होता. भिमा तो चुकवीत होता. नोटा मोजून झाल्यावर त्यानं दोन्ही हात पुढं केले. भिमानं हात वर नेला. त्यानं हात उंचावले. उंचावत राहिला. तस तसे भिमानं हात आणखी उंचावले. भाकरीचा तुकडा घेऊन भुकेलेल्या मरतुकडया कुत्र्याला चाळवावं तसा भिमा त्याला चाळवू लागला. त्याचा चेहरा भयग्रस्त लाजिरवाणा झाला. मेल्याहून मेल्यासारखं त्याला झालं.

"चल बँकेत टाकू या." म्हणत बँकेच्या माणसाकडं भिमा निघाला. तो त्याच्या मागं धावला. लोकांना गंमत वाटत होती. बँकेची माणसं हसत होती.

"हे पैसे टाका हो आमचे. नवं खातं. माझ्याच नावावर." भिमानं रुबाबात आज्ञा सोडली.

"नाव ?"

"भिमराव गणपतराव पुणेकर."

"अरे पण – पण माझे पैसे. माझ्या नावावर –" त्यानं बोलण्याचा दुबळा प्रयत्न केला.

"गप रें तू. मधे बोलू नकोस. हं करा भिमराव गणपतराव. तुला काय करायचेत रे एवढे पैसे ? टाकशील उडवून दारूपायी. सांगतो काय ? अहो पक्का दारूबाज माणूस हा. मी आहे म्हणून चाललंय. नाही तर कोणता भाऊ याला जवळ करील ? घरी लग्नाची पोर वाढवलीय. याला त्याची काळजी नाही. खुशाल आपला लोळतो गटारात. पैसे असू दे माझ्याकडं. हे घे तुला वरले सेहेचाळीस रुपये. जा मजा कर. पुन्हा लागले तर माग ! हां, सातशे रुपये. तुला काय करायचेत एवढे ? मग देतो ना ! सातशे सातशे चौदाशे टाकतोय बँकेत. हे घे सेहेचाळीस सध्या घरखर्चाला." फक्त सेहेचाळीस रुपये त्यानं त्याच्या हातात कोंबले.

"वरचे चार रुपये कापून घेतलेत म्या. मघाचे हॉटे लातले." भिमानं खुलासा केला. त्याचं तोंड काहीतरी बोलायचा प्रयत्न करत होतं. पण नुसते ओठ हालत होते. शब्दच उमटत नव्हता.

त्याला वाटलं एकदम मोठयानं बोंब ठोकावी. सभोवताली गावाकडली माणसं. वेडं ठरवलं असतं त्यांनी. शिवाय बोंब ठोकायला घशातून आवाज निघेल की नाही याची त्याला खात्री नव्हती.

बँकेची माणसं तमाशा बघत होती. तेवढीच त्यांना दोन मिनिटं करमणूक झाली. त्यांना तरी काय हवं होतं. अधिकात अधिक रक्कम बँकेच्या खात्यावर जमा करायची आणि उरल्या वेळात गंमत बघायची. त्यांनी देखील घाई करून चौदाशेची रक्कम बँकेच्या पदरी पाडून घेतली. बाचाबाचीकडं फारसं लक्ष न देता. दर पेमेंटच्या वेळी होणारे अनेक घोटाळे गोंधळ त्यांच्या परिचयाचे होते. त्यांना वादाशी घोटाळ्याशी काही कर्तव्य नव्हतं. कर्तव्य होतं फक्त मोठाल्या रकमांची खाती उघडून देण्याशी. बँकेच्या नावावर रक्कम जमा करण्याशी. सरकारच्या एका खात्यातून पैसा येत होता आणि बँकेत येऊन पडत होता. हा ओघ. या ओघालाहि थांबण्याचं कारण नव्हतं. कुणाच्या अडीअडचणींचं सोयरसुतक नव्हतं. चौदाशे रुपयांचं खातं भिमाच्या नावावर उघडलं गेलं. बँकेच्या कारकुनानं पुस्तक तयार करून भिमाच्या हातात दिलं.

"हे बघ बँक बुक. बघ, खोलून बघं. आहे ना चौदाशेची रक्कम. अरे पैसे जातात कुठं ? उगा काळजी का करतोस फुकटची ? मी पळून जाणारा थोडाच आहे ? आता नाही ना धास्ती राहिली तुला ? झालं ना समाधान. अरे, मी काय धाकटयाभावानं तुला शहाणपणा शिकवावा ?" भिमानं पुस्तक त्याच्या तोंडासमोर उघडून धरलं. डोळे ताणून तो आकडा बघू लागला.

"हे बघ हे चौदाशे इथं. ह्या कोपऱ्यात रे. पाहिलंस ? एक हजार चारशे रुपये. आलं ना लक्षात ? आता काळजी सोड. अरे काळजी कसली करायची ? आपण दोघं भाऊच ना ? माझ्या नावावर असले काय न् तुझ्या नावावर असले काय, सारखेच ! होय का नाही ?"

तो वेडयासारखा भिमाच्या तोंडाकडं बघत राहिला. रडू येईल असं वाटू लागलं. गळयाची घाटी

वरखाली होऊ लागली. घशाला कोरड पडली. तो घुटके गिळू लागला. मघूनच त्याचं लक्ष हातातल्या सेहेचाळीस रुपयांच्या नोटांकडं गेलं. त्याला थोडी हुशारी आली. सातशेची आठवण होऊन पुन्हा हाता-पायांचा गळाठा झाला. तो पुन्हा पुन्हा अविश्वासानं भिमाच्या तोंडाकडं पहात होता.

"कुठं जाणार तू आता?"

"पंढरपूरला." घ्यानीमनी नसताना त्याच्या तोंडी देव आला.

"कशाला?"

"आषाढीला."

"मग नीघ लवकर. तेवढी रक्कम बस झाली तुला. चल नीघ. स्पेशल गाड्या सुटल्यात पंढरपूरला." भिमानं जवळ जवळ त्याला ढकलून दिलं. पायात धोतर अडकून तो अडखळला. स्वत:ला सावरून त्यानं मुकाट्यानं पैसे लोंबत्या खिशात घातले.

"जपून जारे नाहीतर कापायचा खिसा कुणी. तुम्ही पडले हे असे! पहायचं एकीकडं चालायचं एकीकडं. टोचून घेतलंस का पण? परवानापत्र आहे ना? भावावर विश्वास ठेव! अरे मी तुझा पाठीवरला भाऊच ना! जा आता." भिमा सांगत होता. चारचौघात बंधुप्रेमाचा उजाळा करीत होता

पावलं ओढत तो निघाला. स्वत:च्या जिंदगीवर पचकन थुकला. स्वत:चीच कीव करू लागला. किळस करू लागला. आपल्या दुबळेपणांची त्याला भयंकर लाज वाटली. नालायकीची किळस आली. खिशातल्या नोटांचे तुकडेतुकडे करून उधळून द्यावेत अशी तीव्र इच्छा त्याला झाली.

पण एकदम त्याला या छळणुकीतून तात्पुरता मुक्त करणारा रामबाण मार्ग आठवला. उत्सुकतेनं त्याची पावलं तिकडं वळली. आडगल्लीतल्या ओळ-खीच्या, अडगळीनं भरलेल्या घरापाशी तो आला. आत शिरून त्यानं तिथं बसलेल्या काळ्याकरंद लाल डोळ्यांच्या माणसाला हुकूम दिला. पेल्यामधला फेसाळलेला तो घोट जळजळ करीत जेव्हा घशामधून पोटात उतरला तेव्हा तो साऱ्या दुनियेचा राजा बनला. आता भिम्याची त्याच्यापुढं बिशाद नव्हती.

कविता

चित्रातल्या शहरावर सांवली पसरून मी
पाण्यातल्या बिंबातील डोळे सारून मी
शब्दकल्लोळांच्या थव्यात गुदमरलेला मी
आत्मलुब्धतेच्या छिनाल किनाऱ्यावर घट्ट पाय रोवून मी
मी आपसूक माझ्यातल्या तेजोवलयांना शरण
मरण—गंधाच्या वाहतुकीवर डोळे साठवून
आर—पार छेदलेल्या आरस्पानी श्वासांचे तावूत
उभारलेल्या मंदीर कल्पनेत बुडालेला मी
मी माझ्यातून निसटण्याच्या प्रयत्नात
चित्ररंगात देखील अवकाश टाळून घट्ट
कोपऱ्यात सांवलीसारखा रेंगाळणारा
चित्रातल्या डोळ्यात मी
की माझ्या डोळ्यात चित्र....
या प्रश्नाचं निरुत्तर करणारं उत्तर
शेवटाकडून पहिल्यांदा ओठावर रेंगाळलं
तेव्हा शब्दकल्लोळांचे थवे देखील निमूट
माघारी परतले....
आता माझं मुक्याचं सोंग चालुयं....

—प्रकाश कामतीकर

मानव, मानवेतर आणि भाषा

सु. बा. कुलकर्णी

प्राणिमात्रांमध्ये मानवाचे वेगळेपण दर्शविण्याचे भाषा हे एकमेव साधन होय. यामुळेच अनेक विचारवंत मानवाची व्याख्या 'भाषाशील प्राणी' किंवा 'भाषणशील प्राणी' (homo loquens) अशी करतात. मानवाचे सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन भाषेवर आधारलेले आहे. भाषा नसती तर मानव आणि पशुपक्षिकीटक यांच्यात भेद उरला नसता. श्रमविभागणीमुळे होणारी भौतिक प्रगती अशक्य झाली असती. साहित्य, कला, अध्यात्म, विज्ञान इत्यादी गोष्टीच काय, पण विश्वातील चराचराचे आकलनही त्याला होऊ शकले नसते. त्याची विचार करण्याची शक्तीच नष्ट झाली असती.

रूसोने मानवाची व्याख्या 'समाजशील प्राणी' अशी केली आहे. परंतु मानव हाच काही एकमेव समाजशील प्राणी नाही. व्याघ्रसिंहादी पशू, काककीरादी पक्षी, किंवा मुंग्या, वाळवी, मधमाशा, इत्यादी कीटकही समुदायाने राहातात व सहकार्याने जीवन व्यतीत करतात. मुंग्या आणि वाळवी यांचा समुदाय म्हणजे एक मातृसत्ताक कुटुंबच होय. एक माता व तिची हजारो लेकरे. कोणी कामकरी, कोणी शिपाई, तर कोणी बातमीदार. सहकार्य हा त्यांच्या जीवनाचा पाया होय. मेंढरास देखील कळपात बरे वाटते.

मानव हाही एक समाजशील प्राणी आहे परंतु मानव हा नुसताच समाजशील नाही. तो संस्कृतिशीलही आहे. प्राणिमात्रांमध्ये सामाजिकता ही नैसर्गिक प्रवृत्ती असल्याचे दिसून येते. संस्कृतीचे मात्र तसे नाही. ती अर्जित असते. आपल्या पूर्वजांकडून व सहकाऱ्यांकडून मिळवावी लागते. एका पिढीकडून पुढील पिढ्यांकडे संक्रांत करावी लागते. मानवाच्या सवयी, तंत्रे, कल्पना, मूल्ये, वर्तणूक, इ० गोष्टी संस्कृतीने सीमित झालेल्या असतात. मानव ज्या समाजात वाढतो त्यावर त्याचा वेश, व्यवसाय, अन्न, धर्म, शासन, करमणूक, इ० अवलंबून असतात. मानवातील ही संस्कृतिशीलता फक्त भाषेमुळेच शक्य झाली आहे.

अरिस्टॉटलने मानवाची व्याख्या 'विचारशील प्राणी' अशी केली आहे. येथे, मानवेतर प्राणी विचार करू शकत नाही काय, असा प्रश्न उपस्थित होतो व याला नाही असेच उत्तर द्यावे लागते. मानवेतरांच्या प्रतिक्रिया ह्या बाह्य प्रेरणेवर अवलंबून असतात. विचाराचे मूळ अंत:प्रेरणेमध्ये असते. विचार हा स्थितिकालनिरपेक्ष असतो. वर्तमान – भूत – भविष्य यांतील कोणत्याही काळासंबंधी व विश्वातील कोणत्याही गोचर–अगोचर वस्तुजातासंबंधी मानव विचार करू शकतो. विचार करणे भाषेमुळेच शक्य होते. सर्कशीतील प्राणी शिकविलेल्या कृतींपलीकडे कोणत्याही कृती करू शकत नाहीत. पोपट शिकविलेले शब्दच फक्त बोलू शकतो. या सर्वांचे कारण त्यांना विचार करता येत नाही. वस्तुस्थितीचे विश्लेषण करून प्रतिक्रिया व्यक्त करता येत नाहीत. विचार आणि भाषा यांचे अतूट नाते आहे. सुप्रसिद्ध तत्त्वज्ञ बर्ट्रांड रसेल याने म्हटले आहे, "Almost all higher intellectual activity is a matter of words to the nearly total exclusion of everything else."

मानवाचे सांस्कृतिक आणि वैचारिक श्रेष्ठत्व भाषेवर अवलंबून आहे. भाषा हे मानवाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. म्हणूनच मानवाची 'भाषाशील प्राणी' अशी व्याख्या अधिक समर्पक ठरावी.

आपल्या मनातील विचार दुसऱ्याच्या मनात संक्रांत करण्यासाठी मानव भाषेचा उपयोग करतो. यालाच भाषिक संप्रेषण वा दळणवळण अशी संज्ञा आहे. काही मर्यादित प्रमाणात मानवेतर प्राणीही आपल्या प्रतिक्रिया स्वजातीतील इतर सदस्यांना वा अन्य प्राण्यांना कळवीत असतात. त्यांच्याही विशिष्ट स्वरूपाच्या संप्रेषण पद्धती असतात. भुंकण्याचा आवाज काढून व

शेपटीची हालचाल करून कुत्री आपला रागलोभ इतर कुत्र्यांना वा धन्याला कळवीत असतात. चीत्कार व चेहऱ्यावरील हावभावांद्वारे माकडे संदेश देतात. खरखरीत पाय शरीरावर घासून निर्माण होणाऱ्या ध्वनींद्वारे रातकिडे आपले मनोगत स्वकीयांना कळवितात व आपण त्यास 'किरकिरणे' म्हणतो. फुफ्फुसाच्या वरच्या टोकाला असलेल्या पाण्यासारख्या नळयांच्या जोडीमधून ध्वनी काढून पक्षी आपल्या जातबांधवांना नाना प्रकारचे संदेश देतात. गाय हंबरून, म्हैस रेकून, घोडा खिकाळून, वाघ गुरगुरून आणि इतर अनेक प्राणी विशिष्ट प्रकारचा आवाज काढून आपले मनोगत स्वजातीतील व परजातीतील प्राण्यांना कळवितात.

मानवेतर प्राण्यांत मधमाशीची संप्रेषण पद्धती तर मोठी वैशिष्ट्यपूर्ण आहे. मधमाशांच्या सामाजिक जीवनाचा व संप्रेषण पद्धतीचा अभ्यास जर्मन वैज्ञानिक फिश याने करून बरीच मनोरंजक माहिती प्रकाशात आणली आहे. मधाने भरलेल्या फुलांचा ताटवा अगर मध लावून ठेवलेला कागद एखाद्या कामकरी मधमाशीच्या नजरेस आल्यास त्यांतील थोडा मध घेऊन ती ताबडतोब आपल्या पोळयाकडे उड्डाण करते व आपल्या असंख्य मैत्रिणींना घेऊन त्या जागी परत येते. याचा अर्थ असा की कोणत्या तरी पद्धतीने तिने इतर मधमाशांना मधाच्या साठयासंबंधी संदेश दिला असला पाहिजे. अधिक निरीक्षणानंतर असे आढळून आले की मधाच्या साठयाच्या जागी मधमाशी आपल्या शरीरातील एका विशिष्ट ग्रंथीमधील गंध लावून ठेवते. शिवाय पोळयाजवळ आल्यावर ठराविक पद्धतीच्या गिरक्या, वळणे व पोटाची हालचाल करीत नृत्य करते व इतर मधमाशांना मध सापडलेल्या ठिकाणाचे अंतर व दिशा सूचित करते. मध शंभर मीटर अंतरावर असल्यास साधारणपणे अडतीस वेळा गिरक्या घेतल्या जातात. या माहितीच्या आधारे इतर मधमाशा त्या ठराविक जागी बिनचूक पोहोचू शकतात.

मानवेतर प्राण्यांमधील संप्रेषण प्रामुख्याने विशिष्ट प्रकारचे ध्वनी व अंगविक्षेप यांद्वारे होत असते. मानव देखील आपले विचार व भावना व्यक्त करण्यासाठी अनेक प्रकारच्या माध्यमांचा उपयोग करीत असतो. संगीत, नाटय, नृत्य, चित्रकला यांच्या द्वारे, नाना प्रकारचे अंगविक्षेप, मुद्राभिनय, खुणा यांच्या द्वारे, विविध प्रकारचे दिवे लावून, विविध रंगांची निशाणे फडफडवून, ढोल बडवून, दोऱ्यांना गाठी मारून आणि भाषा व लेखन यांच्या द्वारे एक व्यक्ती दुसऱ्या एक वा अनेक व्यक्तींना संदेश देत असते. यांतील अंगविक्षेप म्हणजेच हावभाव व भाषा यांचे मोठेच साहचर्य असते.

हावभाव देखील अनंत प्रकारचे असतात. होकार आणि नकार कळविण्याचे वेगवेगळे. त्यांतही भिन्न समाजात भिन्न तऱ्हा. कोणी डोके हालवून, कोणी हात हालवून, कोणी चेहऱ्यावरील हालचालींनी, तर कोणी मूक राहून होकार वा नकार कळवील. होकारासाठी डोके खालीवर हालविले जाईल, तर नकारासाठी बाजूच्या दिशांना. होकार दर्शविण्यासाठी सेमांग लोक डोके एकदम पुढे खुपसतील, तर ओविंबिडू नाकासमोर तर्जनी नाचवतील. मराठी माणूस कोणास बोलवीत असताना हात उपडा करून बोटे हालवतो; पण अमेरिकन माणूस हात उताणा करून बोटांची हालचाल करतो.

अभिवादनाच्या देखील नाना तऱ्हा संभवतात. डोके वाकवून, दुसऱ्याचा हात आपल्या हातात पकडून जोरजोराने हलवून, दोन्ही मनगटे हातांत पकडून, हात जोडून, साष्टांग नमस्कार घालून, पायाला हात लावले न लावल्यासारखे करून, चुंबन देऊन-घेऊन, व आलिंगनाने अभिवादन वा स्वागत होते. ताम्र एस्किमो दुसऱ्याच्या डोक्यावर बुक्के मारून, स्पॅनिश अमेरिकन त्याची पाठ थोपटून तर पॉलिनेशियन त्याच्या पाठीला पाठ घासून अभिवादन करतात!

एकाच गोष्टीसाठी स्त्रीपुरुषांचे हावभाव वेगवेगळे. परस्त्रीच्या अस्तित्वाची जाणीव होताच पुरुष आपल्या झुलपांवर हात फिरवील, पँट सावरील वा टाय किंवा कोटाची बटणे घट्ट करील. परपुरुषाच्या अस्तित्वाची जाणीव होताच स्त्री डोळयांची उघडझाप करील. मानेला झटका देईल, वा पदर सावरल्यासारखा करील, ताकीद देण्यासाठी, शांत करण्यासाठी, भिवविण्यासाठी वेगवेगळे हावभाव. लांबी, रुंदी, उंची, खोली, जाडी, वजन, आकार, दिशा, स्थिती, इ० दर्शविणारे हावभाव वेगवेगळे. वेदना, दुःख, भीती, प्रेम, आश्चर्य, खेद, प्रशंसा, उपहास, इ० भावना व्यक्त करणारे हावभाव निरनिराळे. बोटे मोडणे, हात नाचविणे, डोळे ताणणे. डोळे मिचकाविणे, डोळे मारणे,

शीळ घालणे, जांभया देणे, खोकणे, उचकी देणे, विशिष्ट जागी खाजविणे असे नाना प्रकार. नृत्य; गायन, वक्तृत्व, रुदन यांसारख्या कृतींसाठी प्रत्येक समाजात विशिष्ट हावभावांचे उपयोजन होते.

प्रतिपाद्य विषय, भावना, उच्चारातील आरोहावरोह, मुद्राभिनय व अंगविक्षेप यांचे अतूट साहचर्य असते. अनेक प्रसंगी हावभाव हे प्रतिपादनास पोषक वा मारक ठरत असतात. साध्या विधानांचा अर्थ हावभावांनी बदलता येतो. 'हे फार मोठे साहित्यिक आहेत !' असे म्हणताना डोळा मिचकावला अगर तोंड मुरकले तर त्या विधानाचा विपरीत अर्थ होऊ शकतो. 'तुझं कल्याण होईल !' असे म्हणताना 'तुझं वाट्टोऽऽऽळं होईल !' असे दर्शविणारी हाताची हालचाल करता येते. हातातील वडगा दाखवीत 'तुझ्या समाचाराला आलोय् !' असे कोणी म्हणताच पुढील समाचाराच्या दृश्याची सहज कल्पना यावी. हावभावांचा शास्त्रीय अभ्यास करण्याच्या विद्याशाखेला अंगविक्षेपविज्ञान (Kinesics) असे म्हणतात. भाषेचा सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यास करणारांस या शाखेचे ज्ञान आवश्यक असते.

प्राणिसृष्टीतील विविध संप्रेषण पद्धती, किंवा मानवाने उपयोजिलेल्या हावभावादी संप्रेषण पद्धती, या सर्व मर्यादित भावभावनांचे वा विचारांचे प्रेषण करू शकतात. रस्त्यावरील लाल, हिरव्या व केशरी दिव्यांनी दिलेले संदेश थांबा, जा, वाट पहा यांपलीकडे काहीही सांगू शकत नाहीत. नृत्याद्वारे 'काल आळूची भाजी जरा खारट झाली होती' हा संदेश कितीही वाकडेतिकडे अंगविक्षेप केले तरी देणे कठीण आहे. हरणांच्या कळपाचा म्होरक्या 'धोका आहे, सावध रहा' असा संदेश इतर हरणांना कसावसा देऊ शकेल; परंतु 'पलीकडील करवंदीच्या जाळीत ढाण्या वाघ घोरत पडला आहे' हे त्याला सांगता येणार नाही. कागदाला लावलेल्या मधाच्या जागी साखरपाण्याची वाटी ठेवली तरीही मधमाशा येतच राहातात. ती वाटी बाजूस काढली तरीही बराच वेळ तेथे येत राहातात. 'आता तेथे मधही नाही आणि साखरपाणीही नाही; जाऊ नका !' असा संदेश त्या अन्य मधमाशांना देऊ शकत नाहीत. संगीत, चित्रकलादी संप्रेषण पद्धतींतही हीच मर्यादा जाणवते. भाषेचे मात्र तसे नाही. कितीही गुंतागुंतीचा संदेश असो, तो भाषेद्वारे पाठविणे शक्य असते. मानवी जीवनात जे जे म्हणून काही उपयोगात येते, जे जे म्हणून काही जाणवते, ते ते व्यक्त करण्याचे सामर्थ्य भाषेत असते. एवढेच नव्हे, तर काल्पनिक विश्वाची उभारणीही भाषेद्वारे करता येते.

संप्रेषण म्हणजे एका ठिकाणची माहिती दुसऱ्या ठिकाणी पाठविणे. या प्रक्रियेसाठी किमान पाच घटकांची आवश्यकता असते. संप्रेषणाची यशस्विता या पाचही घटकांनी आपापली कामे योग्य तऱ्हेने पार पाडण्यावर अवलंबून असते. (आकृती पहा.) संप्रेषणाचे मुख्य घटक म्हणजे प्रेषक आणि ग्राहक. संप्रेषणाचा प्रारंभ प्रेषकामध्ये होतो व शेवट ग्राहकामध्ये होतो. प्रेषक व ग्राहक यांमध्ये स्थल वा काल या बाबतीत दूरत्व असावे लागते. परगांवी असलेल्या स्नेह्याला पत्र पाठवून केलेल्या संप्रेषणात स्थलाच्या संदर्भात दूरत्व आहे. आज स्मरणिकेत लिहून ठेवलेला मजकूर काही दिवसांनी वाचला म्हणजे कालाच्या संदर्भात दूरत्व होते.

सामान्य संप्रेषण पद्धती

प्रेषक → प्रेषण यंत्रणा → सरणी → ग्रहण यंत्रणा → ग्राहक

भाषिक संप्रेषण

वक्ता → वागींद्रिये → ध्वनी → श्रवणेंद्रिये → श्रोता

शेपटीची हालचाल करून कुत्री आपला रागलोभ इतर कुत्र्यांना वा धन्याला कळवीत असतात. चीत्कार व चेहऱ्यावरील हावभावांद्वारे माकडे संदेश देतात. खरखरीत पाय शरीरावर घासून निर्माण होणाऱ्या ध्वनींद्वारे रातकिडे आपले मनोगत स्वकीयांना कळवितात व आपण त्यास 'किरकिरणे' म्हणतो. फुपफुसाच्या वरच्या टोकाला असलेल्या पाण्यासारख्या नळ्यांच्या जोडीमधून ध्वनी काढून पक्षी आपल्या जातबांधवांना नाना प्रकारचे संदेश देतात. गाय हंबरून, म्हैस रेकून, घोडा खिंकाळून, वाघ गुरूगुन आणि इतर अनेक प्राणी विशिष्ट प्रकारचा आवाज काढून आपले मनोगत स्वजातीतील व परजातीतील प्राण्यांना कळवितात.

मानवेतर प्राण्यांत मधमाशीची संप्रेषण पद्धती तर मोठी वैशिष्ट्यपूर्ण आहे. मधमाशांच्या सामाजिक जीवनाचा व संप्रेषण पद्धतीचा अभ्यास जर्मन वैज्ञानिक फ्रिश याने करून बरीच मनोरंजक माहिती प्रकाशात आणली आहे. मधाने भरलेल्या फुलांचा ताटवा अगर मध लावून ठेवलेला कागद एखाद्या कामकरी मधमाशीच्या नजरेस आल्यास त्यांतील थोडा मध घेऊन ती ताबडतोब आपल्या पोळ्याकडे उड्डाण करते व आपल्या असंख्य मैत्रिणींना घेऊन त्या जागी परत येते. याचा अर्थ असा की कोणत्या तरी पद्धतीने तिने इतर मधमाशांना मधाच्या साठ्यासंबंधी संदेश दिला असला पाहिजे. अधिक निरीक्षणानंतर असे आढळून आले की मधाच्या साठ्याच्या जागी मधमाशी आपल्या शरीरातील एका विशिष्ट ग्रंथीमधील गंध लावून ठेवते. शिवाय पोळ्याजवळ आल्यावर ठराविक पद्धतीच्या गिरक्या, वळणे व पोटाची हालचाल करीत नृत्य करते व इतर मधमाशांना मध सापडलेल्या ठिकाणाचे अंतर व दिशा सूचित करते. मध शंभर मीटर अंतरावर असल्यास साधारणपणे अडतीस वेळा गिरक्या घेतल्या जातात. या माहितीच्या आधारे इतर मधमाशा त्या ठराविक जागी बिनचूक पोहोचू शकतात.

मानवेतर प्राण्यांमधील संप्रेषण प्रामुख्याने विशिष्ट प्रकारचे ध्वनी व अंगविक्षेप यांद्वारे होत असते. मानव देखील आपले विचार व भावना व्यक्त करण्यासाठी अनेक प्रकारच्या माध्यमांचा उपयोग करीत असतो. संगीत, नाट्य, नृत्य, चित्रकला यांच्या द्वारे, नाना प्रकारचे अंगविक्षेप, मुद्राभिनय, खुणा यांच्या द्वारे, विविध प्रकारचे दिवे लावून, विविध रंगांची निशाणे फडफडवून, ढोल बडवून, दोऱ्यांना गाठी मारून आणि भाषा व लेखन यांच्या द्वारे एक व्यक्ती दुसऱ्या एक वा अनेक व्यक्तींना संदेश देत असते. यांतील अंगविक्षेप म्हणजेच हावभाव व भाषा यांचे मोठेच साहचर्य असते.

हावभाव देखील अनंत प्रकारचे असतात. होकार आणि नकार कळविण्याचे वेगवेगळे. त्यांतही भिन्न समाजात भिन्न तऱ्हा. कोणी डोके हालवून, कोणी हात हालवून, कोणी चेहऱ्यावरील हालचालींनी, तर कोणी मूक राहून होकार वा नकार कळवील. होकारासाठी डोके खालीवर हालविले जाईल, तर नकारासाठी बाजूच्या दिशांना. होकार दर्शविण्यासाठी सेमांग लोक डोके एकदम पुढे खुपसतील, तर ओविंबिंदू नाकासमोर तर्जनी नाचवतील. मराठी माणूस कोणास बोलवीत असताना हात उपडा करून बोटे हालवतो; पण अमेरिकन माणूस हात उताणा करून बोटांची हालचाल करतो.

अभिवादनाच्या देखील नाना तऱ्हा संभवतात. डोके वाकवून, दुसऱ्याचा हात आपल्या हातात पकडून जोरजोराने हलवून, दोन्ही मनगटे हातांत पकडून, हात जोडून, साष्टांग नमस्कार घालून, पायाला हात लावले न लावल्यासारखे करून, चुंबन देऊन–घेऊन, व आलिंगनाने अभिवादन वा स्वागत होते. ताम्र एस्किमो दुसऱ्याच्या डोक्यावर बुक्के मारून, स्पॅनिश अमेरिकन त्याची पाठ थोपटून तर पॉलिनेशियन त्याच्या पाठीला पाठ घासून अभिवादन करतात !

एकाच गोष्टीसाठी स्त्रीपुरुषांचे हावभाव वेगवेगळे. परस्त्रीच्या अस्तित्वाची जाणीव होताच पुरुष आपल्या झुलपांवर हात फिरवील, पँट सावरील वा टाय किंवा कोटाची बटणे घट्ट करील. परपुरुषाच्या अस्तित्वाची जाणीव होताच स्त्री डोळ्यांची उघडझाप करील. मानेला झटका देईल, वा पदर सावरल्यासारखा करील, ताकीद देण्यासाठी, शांत करण्यासाठी, भिवविण्यासाठी वेगवेगळे हावभाव. लांबी, रुंदी, उंची, खोली, जाडी, वजन, आकार, दिशा, स्थिती, इ० दर्शविणारे हावभाव वेगवेगळे. वेदना, दुःख, भीती, प्रेम, आश्चर्य, खेद, प्रशंसा, उपहास, इ० भावना व्यक्त करणारे हावभाव निरनिराळे. बोटे मोडणे, हात नाचविणे, डोळे ताणणे. डोळे मिचकाविणे, डोळे मारणे,

शीळ घालणे, जांभया देणे, खोकणे, उचकी देणे, विशिष्ट जागी खाजविणे असे नाना प्रकार. नृत्य; गायन, वक्तृत्व, रुदन यांसारख्या कृतींसाठी प्रत्येक समाजात विशिष्ट हावभावांचे उपयोजन होते.

प्रतिपाद्य विषय, भावना, उच्चारातील आरोहावरोह, मुद्राभिनय व अंगविक्षेप यांचे अतूट साहचर्य असते. अनेक प्रसंगी हावभाव हे प्रतिपादनास पोषक वा मारक ठरत असतात. साध्या विधानांचा अर्थ हावभावांनी बदलता येतो. 'हे फार मोठे साहित्यिक आहेत !' असे म्हणताना डोळा मिचकावला अगर तोंड मुरकले तर त्या विधानाचा विपरीत अर्थ होऊ शकतो. 'तुझं कल्याण होईल !' असे म्हणताना 'तुझं वाट्टो ऽऽऽ ळं होईल !' असे दर्शविणारी हाताची हालचाल करता येते. हातातील वडगा दाखवीत 'तुझ्या समाचाराला आलोय् !' असे कोणी म्हणताच पुढील समाचाराच्या दृश्याची सहज कल्पना यावी. हावभावांचा शास्त्रीय अभ्यास करण्याच्या विद्याशाखेला अंगविक्षेपविज्ञान (Kinesics) असे म्हणतात. भाषेचा सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यास करणारांस या शाखेचे ज्ञान आवश्यक असते.

प्राणिसृष्टीतील विविध संप्रेषण पद्धती, किंवा मानवाने उपयोजिलेल्या हावभावादी संप्रेषण पद्धती, या सर्व मर्यादित भावभावनांचे वा विचारांचे प्रेषण करू शकतात. रस्त्यावरील लाल, हिरव्या व केशरी दिव्यांनी दिलेले संदेश थांबा, जा, वाट पहा यांपलीकडे काहीही सांगू शकत नाहीत. नृत्याद्वारे 'काल आळूची भाजी जरा खारट झाली होती' हा संदेश कितीही वाकडेतिकडे अंगविक्षेप केले तरी देणे कठीण आहे. हरणांच्या कळपाचा म्होरक्या 'धोका आहे, सावध रहा' असा संदेश इतर हरणांना कसाबसा देऊ शकेल; परंतु 'पलीकडील करवंदीच्या जाळीत ढाण्या वाघ घोरत पडला आहे' हे त्याला सांगता येणार नाही. कागदाला लावलेल्या मधाच्या जागी साखरपाण्याची वाटी ठेवली तरीही मधमाशा येतच राहातात. ती वाटी बाजूस काढली तरीही बराच वेळ तेथे येत राहातात. 'आता तेथे मधही नाही आणि साखरपाणीही नाही; जाऊ नका !' असा संदेश त्या अन्य मधमाशांना देऊ शकत नाहीत. संगीत, चित्रकलादी संप्रेषण पद्धतींतही हीच मर्यादा जाणवते. भाषेचे मात्र तसे नाही. कितीही गुंतागुंतीचा संदेश असो, तो भाषेद्वारे पाठविणे शक्य असते. मानवी जीवनात जे जे म्हणून काही उपयोगात येते, जे जे म्हणून काही जाणवते, ते ते व्यक्त करण्याचे सामर्थ्य भाषेत असते. एवढेच नव्हे, तर काल्पनिक विश्वाची उभारणीही भाषेद्वारे करता येते.

संप्रेषण म्हणजे एका ठिकाणची माहिती दुसऱ्या ठिकाणी पाठविणे. या प्रक्रियेसाठी किमान पाच घटकांची आवश्यकता असते. संप्रेषणाची यशस्विता या पाचही घटकांनी आपापली कामे योग्य तऱ्हेने पार पाडण्यावर अवलंबून असते. (आकृती पहा.) संप्रेषणाचे मुख्य घटक म्हणजे प्रेषक आणि ग्राहक. संप्रेषणाचा प्रारंभ प्रेषकामध्ये होतो व शेवट ग्राहकामध्ये होतो. प्रेषक व ग्राहक यांमध्ये स्थल वा काल या बाबतीत दूरत्व असावे लागते. परगांवी असलेल्या स्नेह्याला पत्र पाठवून केलेल्या संप्रेषणात स्थलाच्या संदर्भात दूरत्व आहे. आज स्मरणिकेत लिहून ठेवलेला मजकूर काही दिवसांनी वाचला म्हणजे कालाच्या संदर्भात दूरत्व होते.

सामान्य संप्रेषण पद्धती

प्रेषक → प्रेषण यंत्रणा → सरणी → ग्रहण यंत्रणा → ग्राहक

भाषिक संप्रेषण

वक्ता → वागींद्रिये → ध्वनी → श्रवणेंद्रिये → श्रोता

प्रेषक व ग्राहक यांस स्थल वा काल यांबाबतीत जोडणाऱ्या माध्यमास सरणी (channel) असे म्हणतात. सरणीमधून संदेश जाण्यासाठी संदेशावर काही प्रक्रिया करावी लागते. ही प्रक्रिया करणाऱ्या घटकास प्रेषण यंत्रणा असे म्हणतात. मुक्कामाला पोचलेल्या संदेशाचे आकलन होण्यासाठी त्याला पूर्वरूप देणे आवश्यक असते. ही प्रक्रिया करणाऱ्या घटकास ग्रहण यंत्रणा असे म्हणतात. प्रेषण यंत्रणेकडून होणाऱ्या क्रियेस संकेतीकरण व ग्रहण यंत्रणेकडून होणाऱ्या क्रियेस विसंकेतीकरण असे म्हणतात.

बहुसंख्य संप्रेषणात प्रेषक व ग्राहक मानवच असतात. पूर्वानुभव व संप्रेषण–समयीची गरज यांवर आधारलेले संदेश ते परस्परांस पाठवीत असतात. अशा वेळी ते आपल्या भूमिका आलटून पालटून बदलत असतात. संदेशांच्या संकेतीकरणाचे व विसंकेतीकरणाचे नियम त्यांनी अगोदरच ठरविलेले असतात. या दृष्टीने प्रत्येक भाषा ही एक स्वयंपूर्ण संप्रेषण पद्धतीच होय. तिचे संकेती – विसंकेतीकरणाचे नियम स्वतंत्र असतात.

भाषिक संप्रेषणात प्रेषक हा वक्ता होय. वक्ता आपल्या मनातील आशयास वागींद्रियांमार्फत ध्वनींचे रूप देतो. वागींद्रिये ही प्रेषण यंत्रणा होत. ध्वनी म्हणजे हवेमध्ये होणारी विशिष्ट स्वरूपाची कंपने. ध्वनी हे संप्रेषण सरणी होत. ध्वनींचे आकलन श्रवणेंद्रियांमार्फत होते. श्रवणेंद्रिये ही ग्रहण यंत्रणा होत. श्रवणेंद्रियांकरवी विसंकेतीकरण झाल्यावर संदेश ग्राहकाप्रत जातो. भाषिक संप्रेषणात प्रेषक हा एका वेळी एकच असू शकतो. परंतु ग्राहक मात्र एका वेळी एक वा अनेक श्रोते असू शकतात.

भाषेच्या लिखित स्वरूपातील संप्रेषणात लेखन, म्हणजेच शाईने कागदावर रेषा काढणे, हे संकेतीकरण झाले. कागदाचा टिकाऊपणा ही सरणी होय. मानवाची दृक – इंद्रिये ही ग्रहण यंत्रणा. ग्राहक हा अन्य ठिकाणी असलेला मानव किंवा कालांतराने स्वतः प्रेषकही असू शकतो.

भाषिक संप्रेषणात वक्ता हा आपल्या मनातील आशय ध्वनींच्या माध्यमातून श्रोत्यांच्या मनात संक्रांत करतो असे म्हटले गेले, तरी ते एका मर्यादित अर्थानेच खरे आहे. भाषेतील शब्द ज्या वस्तूचे प्रातिनिधिक असतात त्या वस्तूंसंबंधीच्या दोन व्यक्तींच्या मनांतील संकल्पना (concepts) एकीसारख्या एक असू शकत नाहीत. त्या वस्तूसंबंधीचा त्या व्यक्तींचा अनुभवही एकसारखा एक असू शकत नाही. 'कुत्रा' या शब्दाचा एकंदर आशय वक्ता व श्रोता या दोघांच्या त्या प्राण्यासंबंधीच्या पूर्वानुभवावर, संकल्पनेतील अमूर्तीकरणाच्या पातळीवर, बोलण्याच्या हेतूवर, बोलतेसमयीच्या मानसिक अवस्थेवर आणि हावभावांवर अवलंबून असेल. 'कुत्रा' असे म्हटल्यावर दोन व्यक्तींच्या मनात उभा राहाणारा प्राणी उभा – आडवा, काळा – गोरा, गरीब - रागीट, चावरा–लुवरा, इत्यादींपैकी कोणत्याही एक वा अनेक प्रकारचा असू शकेल. व्यक्तींच्या पूर्वायुष्यात घडलेल्या प्रसंगांशी जोडले जाणारे त्याचे साहचर्यही एकसारखे असू शकणार नाही, भाषिक प्रतीकांद्वारे व्यक्त होणारा अनुभव हा फारच ढोबळ व व्यक्तिसापेक्ष असतो.

वस्तू अगर क्रियांप्रमाणे अमूर्त कल्पनांच्या बाबतींतही हेच असते. उदाहरणार्थ 'न्याय' हा शब्द घ्या. न्यायाची संकल्पना व्यक्तीच्या जीवनातील साधेपणा वा गुंतागुंत, व त्याचप्रमाणे विचार करण्याची कुवत यांवर अवलंबून राहील. कोणाच्या मनात न्याय म्हणजे 'परमेश्वराची इच्छा' असे असू शकेल. कोणाच्या मनात 'सुसंस्कृत स्वार्थ' वा कोणाच्या मनात 'दुसऱ्यांनी आपल्यासाठी जे करावे अशी अपेक्षा आहे ते आपण दुसऱ्यासाठी करावे' असा असू शकेल. इतके असूनही 'परमेश्वराच्या घरी न्याय नाही!' 'हा काय न्याय झाला?' अशा प्रतिक्रियाही ऐकू येतातच! या सर्वांचे कारण म्हणजे न्यायाविषयीची व्यक्तिव्यक्तीमधील संकल्पना–पातळी भिन्न असते. ज्यावेळी 'तुला काय म्हणायचं आहे ते मला समजत नाही' किंवा 'मला खरं म्हणजे असं म्हणायचं आहे' असे म्हटले जाते तेव्हा वक्ता आणि श्रोता यांच्या संकल्पना–पातळीत सुसंवाद साधलेला नसतो. परिणामतः दोघांच्या मनांतील आशय फार भिन्न असू शकतात.

आशयावर भाषेच्या संरचनेचाही फार प्रभाव असतो. मराठीत नामांची आणि अनुषंगाने वस्तुजाताची विभागणी पुंल्लिंगी, स्त्रीलिंगी व नपुंसकलिंगी अशा तीन गटांत केली जाते. हिंदीत हीच विभागणी पुल्लिंगी व स्त्रीलिंगी अशा दोनच गटांत होते. द्राविड भाषांत

ती मनुष्य व मनुष्येतर अशी आहे. काही भाषांत हीच विभागणी सजीव व निर्जीव अशी असते. शिवाय सजीवांत गतिमान व स्थिर आणि निर्जीवांत लांब, वाटोळे, उंच, इ० उपगट असतातच. यामुळे एकाच वस्तूवर एका भाषेत पौरुषत्वाचा तर अन्य भाषेत स्त्रीत्वाचा आरोप होतो. मराठीतील पुंल्लिगी 'पोलीस' हिंदीत स्त्रीलिंगी होतो; तर हिंदीतील पुंल्लिगी 'देवता' मराठीत स्त्रीलिंगी होते. मराठीत नपुंसकलिंगी असलेले 'सरकार' हिंदीत स्त्रीलिंगी बनते.

एस्किमोंच्या भाषेत 'पडणारे हिम', 'जमिनीवर पडलेले हिम', 'पाण्याबरोबर वाहणारे हिम', इ० हिमाचे प्रकार व्यक्त करणारे चाळीस शब्द आहेत; परंतु हिम ही प्रजाती व्यक्त करणारी संज्ञा नाही. गोधनावर उदरनिर्वाह करणाऱ्या झुलूंच्या भाषेत 'काळी गाय' 'करडी गाय' 'भुरी गाय', इ० गाईचे प्रकार व्यक्त करणारे अनेक शब्द आहेत; परंतु गाय ही जातिवाचक संज्ञा नाही. उंटाशी अहोरात्र संबंध असलेल्या अरबांच्या भाषेत उंटाला शब्द नाही! मराठीतील 'चुलत, आते, मामे, मावस भावंडे' इंग्रजीत फक्त 'कझिन' बनतात आणि हिंदीतील 'दादा' आणि 'नाना' मराठीत 'आजोबा'च राहातात. 'पाणी' तेच; परंतु त्याने वेगवेगळी रूपे धारण करताच 'दव, धुके, वाफ, हिम, बर्फ', इ० प्रकारांचा त्यावर आरोप होतो. ते कसे पसरले आहे यावरून 'विहीर, तळे, सरोवर नाला, नदी, समुद्र', इ० प्रकार आलेच. मराठीत वर्तमान, भूत, भविष्य असे तीन काळ आहेत. बांटू भाषांतून तर भूत आणि भविष्यात सामान्य, निकटचा व दूरचा असे आणखी उपप्रकार आहेत.

भाषिक प्रतीकांद्वारे व्यक्त होणारा वा आकलित होणारा आशय हा केव्हाही स्थिर नसतो. तो व्यक्तिसापेक्ष तर असतोच; परंतु भाषासापेक्षही असतो. संकल्पना, अनुभव, मनःस्थिती, इ० अनेक गोष्टींनी त्यास मर्यादित केलेले असते. भाषिक संप्रेषण म्हणजे समाजातील घटकांकडून परस्परांच्या अनुभूतीत सहभागी होण्यासाठी केलेला प्रयत्न. समान संस्कृतीच्या, समान गटाच्या, समान वयाच्या, किंवा समान लिंगाच्या दोन व्यक्तींमध्ये भाषिक संप्रेषण प्रभावीपणे होते याचे कारण त्या दोघांचे अनुभव मिळते जुळते असतात व परिणामतः त्यांनी केलेला परस्परांच्या भाषिक प्रतीकांचा अनुवाद हा बव्हंशी एकसारखा असतो.

भाषेचे रहस्य मानवाच्या मेंदूमध्ये आहे मानवातील कच्चे मडके देखील इतर प्राण्यांपेक्षा. बुद्धिमान असावे अशी निसर्गाने सोय करून ठेविली आहे. इतर प्राण्यांच्या मानाने मानवाचे प्रमस्तिष्क आकाराने मोठे व वजनाने अधिक असते. साधारणपणे प्रौढ व्यक्तीच्या मेंदूचे वजन एक किलो साडेतीनशे ग्रॅम इतके असते; तर पूर्ण वाढ झालेल्या कुत्र्याच्या मेंदूचे वजन एकशेचाळीस ग्रॅम एवढेच भरते. मोठ्या मेंदूच्या बाह्यपृष्ठावर अनेक वळ्या व खोलगट भाग असतात. ह्या वळ्यांचा आणि बुद्धीच्या प्रखरतेचा संबंध आढळून येतो. बुद्धिमान व्यक्तींच्या मेंदूवर अधिक वळ्या असतात. मेंदूच्या पृष्ठभागावर अनेक प्रेरकक्षेत्रे (motor areas) असतात. यांतील चेतापेशींमुळे आपल्याला स्मरण, इच्छा, कल्पना, भावना, इ० साध्य होतात. दृष्टिज्ञान करून देणाऱ्या चेतापेशींचा समूह मेंदूच्या मागल्या भागामध्ये असतो. मेंदूच्या खालच्या बाजूला रुची व गंध यांची केंद्रे असतात. उजव्या अर्धगोलाच्या बाहेरच्या बाजूला श्रवणकेंद्र व डाव्या अर्धगोलाच्या बाहेरच्या बाजूला वाचाकेंद्र असते. मानवाच्या मेंदूमध्ये असलेल्या या विशेष प्रकारच्या प्रेरककेंद्रामुळे त्याला वाचाशक्तीचा लाभ झालेला आहे. भाषेतील भाषण, श्रवण, लेखन, वाचन, आकलन या प्रमुख क्रिया विविध प्रेरककेंद्रांच्या परस्परपूरक कार्यपद्धतीमुळेच शक्य झालेल्या आहेत.

जैविक उत्क्रांतीमध्ये वाचाशक्तीचे प्रेरककेंद्र अन्य सजीवांमध्ये विकसित झाले नाही. किंबहुना, मानवी मेंदूतील अन्य संवेदी केंद्रांची कार्यक्षमताही त्यांना प्राप्त करता आली नाही. मानवाची सर्वगामी बुद्धिमत्ता हीच त्याची खरी संपत्ती. मूल जन्माला येताना आपल्याबरोबर मेंदूचे सामर्थ्य घेऊनच येते. या सामर्थ्याच्या जोरावर ते आपल्या भवतीभोंवती बोलल्या जाणाऱ्या भाषेचे विश्लेषण करून ती आत्मसात करते. पौगंडावस्था प्राप्त होईपर्यंत मेंदूची वाढ पूर्ण होत आलेली असते. मेंदूची वाढ आणि भाषाशिक्षणाची क्षमता यांमध्ये अन्योन्यसंबंध आढळून येतो. मेंदू पूर्ण वाढेपर्यंतच्या काळात मुले मातृभाषेशिवाय इतर दोनतीन भाषांवर सहज प्रभुत्व मिळवू शकतात. या काळात त्यांची विश्लेषणशक्ती व स्मरणशक्ती तीव्रतेने काम करते. या वयानंतर मात्र परभाषाशिक्षणाची क्षमता कमी झालेली आढळते.

मेंदूच्या मर्यादित कार्यक्षमतेमुळे मानवेतर प्राण्यांना विचार करता येत नाही. रडणे, कण्हणे, कुंथणे इ० मानवी क्रियांप्रमाणे प्राण्यांच्या संप्रेषणांतील संदेश हे आनुवंशिक व क्रियाप्रतिक्रियात्मक स्वरूपाचे असतात. भाषा ही शिकावी लागते. तिचे ज्ञान उपजत होत नाही. समाजभिन्नतेनुसार तिच्या संरचनेत बदल असलेला दिसतो. कालगतीनुसार, तिच्या स्वरूपात परिवर्तन होताना आढळते. परंतु इथूनतिथून गाईचे हंबरणे, म्हशीचे रेकणे, कावळ्याची कावकाव, किंवा चिमणीची चिवचिव सारखीच. कावळीने वाढविलेली कोकिळेची पिले कुहूकुहूच करणार !

भाषेच्या संरचनेची चावी हाती लागल्यावर मानव तिचा अमर्यादपणे उपयोग करू शकतो. क्षणाक्षणाला तो नवनवीन वाक्ये बनवू लागतो. कधीही व कुणीही न वापरलेली वाक्येही. काही मोजकेच ध्वनी. त्यांतील आवश्यक तितकेच एका वेळी निवडून त्यांची विशिष्ट अनुक्रमाने रचना. या रचनेला आशयाची जोड दिली की झाला शब्द तयार. शब्दांची विशिष्ट अनुक्रमाने रचना केली व विभक्त्यादी प्रत्ययांच्या शृंखलांनी त्यांना परस्परात गुंतवून टाकले की झाले वाक्य तयार. शब्दांची निवड, अनुक्रम, जोडाजोड यांविषयी नियमांचा संग्रह म्हणजे व्याकरण. भाषेला व्याकरण असते. मानवेतरांच्या संप्रेषण पद्धतींत व्याकरण नसते. त्यांचा प्रत्येक ध्वनी वा हावभाव हा विशिष्ट अर्थाचा द्योतक व संपूर्ण संदेश असतो. या संदेशांची संख्याही अत्यल्प, म्हणजे साधारणतः सातआठ एवढीच असते. भाषेतील संदेशाला लांबीचे बंधन नसते. एकेक वाक्य लिहू लागल्यास ते मैलोंगणती लांबविता येईल; परंतु स्मृती व आकलनाच्या मर्यादांमुळे आपण तसे करीत नाही एवढेच. बाणभट्टाने तीही करामत करून दाखविली आहे ! मानवेतरांच्या संप्रेषणांत असे पुनरावर्तन (recursiveness) शक्य नसते. गाढवाने आपला सूर अधिक काळ लांबवून फार गुंतागुंतीचा संदेश दिला असे म्हणता येणार नाही ! मानवेतरांचे संदेश हे विशिष्ट भावभावना वा सूचना व्यक्त करणारे असतात. त्यांना घटनेच्या प्रत्यक्ष संदर्भाची आवश्यकता असते. भाषेचे तसे नाही. तिला दिशा आणि काळाची बंधने नाहीत. ज्ञाताच्या कुंपणावरून तर ती केव्हाच उडी मारून जाते !

एखादा कावळा

अलिकडे,
खूप उदास उदाससं वाटतं तेव्हां—
विरंगुळा म्हणून मी फिरायला जातो
निसर्गसान्निध्यांत,
आणि सतत संथ लयीत वहाणारा एखादा ओहोळ
आठवण करून देतो,
मध्यमवर्गीयांच्या रूटीन लाईफची !
मी नजर फिरवतो,
दूर अंधुकपणे दिसणाऱ्या टेलीफोनच्या तारांवर
खिळवतो
पण तिथेही, रेशनच्या रांगेसारख्या
तारेवर ओळीने बसलेल्या पाखरांत मला दिसतो
मध्यमवर्गीयांचा गांजलेपणा !
घनगर्द झाडीत एखादंच निष्पर्णलेलं बोडकं झाड—
विधवेसारखं,
मातीनेच हुंगलेली
फुटपाथवर अस्ताव्यस्तपणे पडलेल्या बेघरवाल्यांसारखी
निर्माल्यून विखुरलेली रानफुले
मला कससंच होतं, इतक्यांत
एखादा कावळा
कामावरून दमून भागून आलेल्या कामगारासारखा
अर्धपोटीच !
मी पाणावतो – मागे वळतो – पावलं जड होतात
घरासमीप आल्यावर पुन्हां मागे वळून पहातो तो
मागे रस्ता महारोग्याप्रमाणे धूळ खात पडलेला !

—एम्. नारायण

नामा पाठकाचा अश्वमेध

मधुकर रामदास जोशी

परशुरामतात्या गोडबोले यांच्याप्रमाणेच मुंबईच्या श्री. ज. शा. देशपांड्यांनीही काव्याचा मेळा मराठी वाचकांना सादर करून काव्यानंदाची दिलेली अपूर्व मेजवानी अद्यापही मराठी रसिक विसरले नाहीत. आता देखील त्यांनी अशीच दुसरी मेजवानी दिली आहे. मराठी कवींच्या उत्तमोत्तम काव्यसंग्रहांच्या वेच्यांप्रमाणेच, विस्मृतीच्या खळग्यात पार दडपलेले प्राचीन मराठी काव्य पुन: उजेडात आणून मराठी कविताप्रेमी जनांना देशपांड्यांनी 'धालेपणाचे ढेकर' द्यावयास लावले. रसिकतेला संशोधनाची जोड असेल तर उत्तमच. ज. शा. देशपांडे ह्या दोन्ही गुणांच्या बाबतीत इतरांच्या मानाने तिळमात्रही मागे नाहीत हे त्यांच्या **प्राचीन मराठी खंडांवरून** स्पष्टच होते. इसवी सन एकोणविसशे वासष्ट सालापासून ज. शा. देशपांड्यांनी प्राचीन मराठी कविता संपादण्यास सुरवात केली व सतत दहा वर्षे खपून प्राचीन मराठीचे सात खंड प्रसिद्ध केले. नामापाठकाचा अश्वमेध ग्रंथ प्रस्तुत मालेतील सातवा खंड आहे.

प्रस्तुत खंडात प्रथमच मराठी जैमिनी अश्वमेध प्रसिद्ध होत आहे. हे प्राचीन काव्य नामापाठकाने लिहिले असल्याची नोंद भावे, पांगारकर, तुळपुळे प्रभृती वाङ्मयेतिहासकारांनी केली असली तरी आज-पर्यंत नामा पाठकाचे समग्र काव्य मुद्रित स्वरूपात मराठी अभ्यासकांसमोर आले नव्हते. श्री. ज. शा. देशपांड्यांनी प्रस्तुत काव्याच्या एकोणवीस हस्तलिखि-तांचे संशोधन करून तंजावर संहितेला प्रामाण्य देऊन नामापाठकाचे काव्य प्रसिद्ध केले आहे. तंजावर प्रत केवळ ओवीसंख्येने लहान म्हणून व अल्प ओवीसंख्या असलेली काव्यसंहिताच मूळ, ह्या राजवाडेप्रणीत सिद्धान्ताला अनुसरून नव्हे, तर, मूळ ग्रंथच लेखकाने जो लिहिला त्याचे यथातथ्य प्रतिबिंब म्हणून तंजावर प्रतीला संपादकांनी मान्यता दिली; परंतु तंजावर प्रतीतील शंकास्थळांची दुरुस्ती, प्रा. म. रा. जोशी प्रतीच्या आधारे करून अश्वमेधाची दुरुस्त, संशोधित संहिता संपादकांनी स्वीकारली. नामापाठकाच्या ग्रंथाच्या पूर्ण वा अंशत: स्वरूपात अनेक प्रती उपलब्ध आहेत व तशी नोंदही संपादकांनी परिशिष्टात केली आहे. पण उपलब्ध सर्वच प्रती मूळ ग्रंथाच्या केवळ नकला नव्हत. याचे कारण असे की, खुद्द ग्रंथकारानेच अश्वमेधाची रचना चार वेळा करून आपल्या मूळ ग्रंथाचा उत्तरोत्तर विस्तार केलेला आहे. याचा मनो-रंजक इतिहासही स्वत: ग्रंथकारानेच दिला आहे. प्रथम तेलंगणात जाऊन संस्कृत ग्रंथाच्या आधारे मराठी लघु अश्वमेध रचिला. नंतर थोड्याच दिवसांनी द्वारकेच्या पाच वर्षांच्या वास्तव्यात मराठी अश्वमेधाचा पूर्वार्ध व उत्तरार्ध एकत्रित केला. त्यानंतर उत्तरेकडे बहुधा काशीला तीर्थयात्रानिमित्ताने कवी गेला असता काशीच्या दहा वर्षांच्या वास्तव्यात अश्वमेध पूर्ण केला. पण एवढ्याने कवीचे समाधान झाले नाही. पूर्व भारताच्या तीर्थयात्रा प्रसंगी पुन: एकदा पूर्वेकडील अश्वमेधप्रतींच्या आधारे आपल्या मूळ ग्रंथाचा कवीने विस्तार केला. अशा प्रकारे सतत वीस वर्षे खपून नामापाठकाने अश्वमेध सिद्धीस नेला.

नामा पाठककृत अश्वमेध ग्रंथांची रचना व ग्रंथाची जन्मकथा ही केवळ नवलपूर्णच नसून ती प्राचीन मराठी ग्रंथरचनापद्धतीवर नेमका प्रकाश टाकणारी आहे. सहसा मराठी कवी आपल्या ग्रंथरचनापद्धतीचा इतिहास देत नाहीत. खिलजीच्या स्वारीत हरवलेल्या लीळाचरित्राची पुन्हा बांधणी महानुभावीयांनी केली. लीळाचरित्राचा प्रथम 'उत्तरार्ध' व नंतर 'पूर्वार्ध' तयार झाला आणि त्यानंतरच 'एकांका'ची जोड देण्यात आली. विस्ताराकडून अल्पत्वाकडे माहिमभटाने लक्ष दिले तर अल्पत्वाकडून विस्ताराकडे नामा पाठकाने लक्ष पुरविले.

ह्या काव्याचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे पूर्ण प्रतीतील सर्वात लहान प्रत (तंजावरप्रत) व सर्वांत

मोठी प्रत (म. रा. जोशी प्रत) ह्या दोहोंतही विलक्षण साम्य आहे. अश्वमेधाच्या चारही प्रतींचा व विशेषत: सर्वात लहान व सर्वात मोठया प्रतीचा तुलनात्मक अभ्यास मराठी पाठचिकित्सा व ग्रंथसंहिता यांच्या संशोधनाला सर्वस्वी नवीन वळण देणारा आहे.

प्रस्तुत खंडात प्रामुख्याने तंजावर प्रतीचाच अभ्यास असला तरी मुख्यत: म रा. जोशी प्रतीच्या आधारे संपादकांनी मूळ संहितेचे परिष्करण करून योग्य त्या ठिकाणी अन्य प्रतींच्या साहृयाने "तंजावर प्रत बरीचशी शुद्ध स्वरूपात आणली." ह्या संपादनपद्धतीचा मूळ ग्रंथरचनापद्धतीशी संबंध असल्याने प्राचीन मराठी कविता संपादनक्षेत्रात नवीन दालन उघडले गेले आहे. प्राचीन मराठी ग्रंथांचे संपादन गतानुगतिक वा परप्रत्ययनेय बुद्धीने करण्याऐवजी ग्रंथरचनेचा व लेखनाचा साक्षेपाने शोध घेऊन संपादनाच्या नव्या दिशा धुंडाळाव्या लागतात, हे प्रस्तुत खंडाच्याद्वारे देशपांड्यांनी उत्तम प्रकारे दाखवून दिले आहे. प्राचीन मराठी ग्रंथसंपादनास श्री. ज. शा. देशपांड्यांनी सर्वस्वी नवीन पण मौलिक वळण दिले ह्याबद्दल कोणाचेही दुमत होणार नाही.

जैमिनी अश्वमेध आख्यानकाव्य म्हणून ओळखले जात असले तरी ते खरे कथाकाव्य आहे. ह्यातील कित्येक कथा या प्रादेशिक आहेत व त्यावरून त्या त्या प्रदेशाची भौगोलिक व सांस्कृतिक माहिती मिळते. त्याचप्रमाणे तत्कालीन लोकजीवनाचेही दर्शन होते. ह्या काव्यातील भद्रसेनाची कथा अद्यापही चंद्रपूर भागात प्रसिद्ध आहे. नामापाठकाने भद्रसेनसारख्या असंख्य लौकिक कथांची निवड करून लोककथांशी व लोकवाङमयाशी आपले नाते दाखवून दिले आहे.

प्रस्तावनेत कविचरित्र दिले असून त्याच्या अन्य साहित्यकृतींची संशोधनपूर्ण माहिती पुरविली आहे. त्यानंतर तंजावर प्रतीचा दुरुस्त संहितापाठ दिला आहे. ग्रंथाला तीन परिशिष्टे असून पहिल्या परिशिष्टात तंजावर प्रतीत जेथे दुसरे पाठ घेतले तेथील मूळ मजकूर आहे. त्यानंतर अश्वमेधाच्या एकोणवीस प्रतींची माहिती दुसऱ्यात आहे. तिसरे परिशिष्ट कथाकल्पतरू व अश्वमेधाच्या साम्यस्थलांचे आहे. चवथे परिशिष्ट विविध प्रतींतील ओव्या देणारे आहे. त्यानंतर शब्दकोश, स्थलकोश व व्यक्तिसूची आहे. मूळ संहिता व अभ्यासाची सर्व साधने एकत्रित आणून संपादकांनी आपल्या साक्षेपी व अभ्यासू वृत्तीचा सुखद परिचय करून दिलेला आहे.

प्राचीन मराठी कविता खंड ७
संपादक : ज. शा. देशपांडे,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई.

आर्त आर्त तमकार !

आर्त आर्त तमकार इथे हा करुण सूरझंकार
नीलकंठ मिरवीत वीषधर चूर समाधित पार
घनवन वितळुन समरस सुटली सतत तमाची तार
भिल्लिण भिनली नर्तनात रत सजला सुरतविकार !

कातरस्वप्ने विकारलेली काहुरले मनि जार
जारा झाली फितूर काया जपे सोवळे फार
सुटे सावली सरणे कवळित अनाड अपरंपार
उनाड नाडी फोडुन फुटले कवटीतून ॐकार !

— नारायण रा. पेडणेकर

पंढरपूर विठ्ठल मंदिरातील शिलालेख– त्यास 'चौऱ्यांशीचा लेख' हे नाव कसे पडले?

आनंद ना. कुंभार

'युगवाणी' (आगष्ट सप्टेंबर १९७५, पृ. १०९–१११) च्या अंकात 'पंढरपूर चौऱ्यांशी'चा शिलालेख – नामचर्चेवर नवा प्रकाश असा एक लेख प्रा. म. शं. वाबगांवकरांनी प्रसिद्ध केला आहे. त्यात ते मूळ विषयावर साधार चर्चा करून प्रकाश पाडण्याऐवजी डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी कसे इतरांच्या तर्कांतून आपल्याला ग्राह्य असलेला भाग घेऊन आणि जणूं काही आपणच प्रथम ह्या गोष्टींचा उलगडा करीत आहोत! अशा गोष्टींवरच जास्त भर दिला आहे. हयावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, प्रा. वावगांवकर इतर संशोधक दुसऱ्यांचे श्रेय आपल्या नांवावर कसे खपवितात व त्याचे श्रेय आपल्याकडे कसे घेतात ते त्रिवविण्याचा निष्फळ प्रयत्न करतांना दिसतात. प्रा. वावगावकरांना असे विचारावेसे वाटते की, त्यांनी, उद्धव चिद्घन रचित ज्ञानदेव चरित्राची पोथी प्रा. म. रा. जोशी यांना प्राप्त झाली असतां, त्यांच्याकडून केवळ अवलोकनार्थ काही दिवस उसनी नेली असतां ती परस्पर 'मराठी संशोधन पत्रिके'त[1] कशी प्रसिद्ध करावीशी वाटली? त्यामागे त्यांचा काय हेतू होता? हयाला दुसऱ्याचे श्रेय हिसकावून घेऊन म्हणत नाहीत काय? केवळ स्वतःला प्रसिद्धी मिळावी म्हणून हा उद्योग त्यांनी केला असे उघड होते. त्या साऱ्या गोष्टी स्वतः प्रा. म. रा. जोशी[2] यांनीच उघडकीस आणल्या म्हणून संशोधकांस माहीत झाले. आजकाल संशोधक निव्वळ संशोधन न करता दुसऱ्याने कसे तारे तोडले, ह्यातच आपले सारे श्रम वाया घालवितात व त्यातच धन्य मानतात. हे संशोधकांना भूषणावह खचितच नाही. त्यापेक्षा आपल्याला काय सांगावयाचे आहे किंवा आपण काय नवे (?) 'संशोधन व चिंतन' केले आहे ह्याबद्दल चर्चा करणे, माहिती देणे व शक्य तितके दुसऱ्यांवर न घसरता ते व्यवस्थित मांडणे बरे ठरेल असे वाटते. बरे असो.

आता प्रा. वावगांवकर आपल्या लेखात काय म्हणतात ते पाहू. प्रथम त्यांनी पंढरपूरच्या चौऱ्यांशी शिलालेखासंबंधी – त्या शिलालेखाला 'चौऱ्यांशीचा लेख' हे नाव कसे प्राप्त झाले असावे – हयाबद्दल १८८४ साली प्रसिद्ध झालेल्या सोलापूर जिल्हयाच्या गॅझेटियरपासून डॉ. तुळपुळे यांचा 'प्राचीन मराठी कोरीव लेख' १९६३ पर्यंत गेल्या ८०–९० वर्षांत अनेक संशोधकांनी, काय काय तर्क केला आहे किंवा काय दंतकथा प्रचलित आहेत हे दिलेले आहेत. त्या सर्वांची चर्चा करून ते कसे 'टिकू शकत नाही' हे सांगितलेले आहे. व शेवटी आपल्या मते पंढरपूरच्या हया बहुचर्चित शिलालेखाला 'चौऱ्यांशीचा लेख' हे नाव कसे पडले हे सांगितले आहे. त्यांचे म्हणणे असे की – देवगिरी यादवांच्या पूर्व वंशातील सेउणदेशाच्या एरमदेवाचा नगर जिल्हयातील अरबी एथिल शके १०२० मध्ये दिलेला संस्कृत ताम्रपटांत 'श्रीनगर अडीच हजार' हया प्रमुख शासन विभागात 'संगमनेर चतुरशीति' म्हणजे ८४ खेडयांचा पोटविभाग म्हणजेच 'संगमनेर चौऱ्यांशी' असा उल्लेख असल्यामुळे पंढरपूर हे गांव सुद्धा चौऱ्यांशी – म्हणजे तो लेख खोदला गेला त्या काळांत (शके ११९५ ते ११९९) म्हणजेच रामचेदेव यादवांच्या काळात आजूबाजूच्या चौऱ्यांशी गावांचे विभागाचे प्रमुख ठाणे पंढरपूर असावे व पंढरपूर चौऱ्यांशीचा शिलालेख या मूळ नावातील पंढरपूर कालांतराने लुप्त होऊन केवळ 'चौऱ्यांशीचा शिलालेख'

---

१. 'मराठी संशोधन पत्रिका' त्रैमासिक, मुंबई; व० १९ अंक ३

२. 'श्री ज्ञानदेव चरित्र संशोधन' – प्रा. म. रा. जोशी, श्रीमाधव प्रकाशन, अकोला. डिसेंबर १९५४, पृ. १०२

एवढेच शिल्लक राहिले असावे. लेखाच्या पुसून गेलेल्या भागात 'पंढरपूर चौऱ्यांशी' असा प्रदेश स्थल वाचक अर्थाचा निर्देश असण्याचीही शक्यता नाकारता येणार नाही.

प्रा. वाबगांवकर यांच्या वरील म्हणण्यांतून स्पष्ट होते की, त्यांना कोणत्याही कोरीव लेखात 'पंढरपूर चौऱ्यांशी' असा उल्लेख आढळला नाही. (ह्या ठिकाणी 'कोणत्याही कोरीव लेख' म्हणतांना प्रामुख्याने पंढरपूरच्या परिसरांतील लेखच अभिप्रेत आहेत.) केवळ इतर लेखात 'संगमनेर चौऱ्यांशी' (संस्कृतातून) असा उल्लेख आला आहे म्हणून पंढरपूर सुद्धा पूर्वी चौऱ्यांशी गावाचे ठाणे होते असे म्हणणे धाडसाचे ठरेल. ह्या ठिकाणी प्रा. वाबगांवकर यांना सुद्धा हा दोष लावता येईल की आपल्या सोईसाठी ते 'संगमनेर चौऱ्यांशी' असा उल्लेख आल्यामुळे पंढरपूर सुद्धा चौऱ्यांशी गावांचे (खेड्यांचे) ठाणे होते असे गृहीत धरले आहे. पंढरपूर चौऱ्यांशीच कां ? पंच्याऐंशी, स्याऐंशी, सत्याऐंशी, अठ्याऐंशी कां नाही ? कां, 'ठाणे हे चौऱ्यांशी गावांचेच असते ?' ह्या ठिकाणी आम्ही असे म्हणावे कां की, पंढरपूरचा हा शिलालेख चौऱ्यांशीचा शिलालेख म्हणून प्रसिद्ध आहे. व प्रा. वाबगांवकर आपल्या सोईसाठी 'पंढरपूर चौऱ्यांशी'चा म्हणून गृहीत धरत आहेत. शिलालेखाच्या घासून पुसून नष्ट झालेल्या भागात 'पंढरपूर चौऱ्यांशी' असा प्रदेशस्थलवाचक अर्थाचा निर्देश आलेला असण्याची शक्यता फार कमी आहे. किंवहुना नाहीच असे म्हटले तरी चालेल. कारण एक तर घासून निर्वाच्य झालेला भाग अगदी नगण्य आहे आणि त्यात नेमके पंढरपूरचेच नाव आले असेल असे ठामपणे सांगता येत नाही. दुसरे असे की, प्रत्यक्ष लेखातच पंढरपूरचा उल्लेख 'पांडरी'[3] असा आलेला आहे. 'पंढरपूर चतुरशीति' अथवा तत्सम दुसरा शब्द आलेला नाही. म्हणून पूर्वी पंढरपूर चौऱ्यांशी खेड्यांचे ठाणे असावे आणि कालांतराने त्यातील मुख्य ठाण्याचेच नाव – पंढरपूर हे नाव लुप्त झाले असावे त्यामुळे तो लेख 'चौऱ्यांशीचा लेख' म्हणून ओळखला जाऊ लागला असावा हे निव्वळ तर्कट आहे. चिकित्सक बुद्धीला ते पटत नाही.

आजपर्यंत ज्या ज्या संशोधकांनी पंढरपुराच्या सदरील लेखास, 'चौऱ्यांशीचा लेख' असे नांव कां पडले ह्या बद्दल जी चर्चा केली आहे किंवा आपली मते मांडली आहेत, त्यावरून समाधान होत नाही. जो तो आपला तर्क कसा खरा आहे हेच बिंबविण्याचा प्रयत्न करतो, परंतु तो अद्यापी म्हणावा तसा सफल झाला नाही. त्याचेच ताजे उदा० म्हणजे प्रा. वाबगांवकरांचा हा लेख होय.

'चौऱ्यांशीचा लेख' असे नांव पडण्याचे अनेक कारणांपैकी एक कारण इतिहासाचार्य कै. राजवाडे यांनी दिले आहे. त्यांचे म्हणणे असे की, – याला चौऱ्यांशीची शिला किंवा दगड वारकरी लोक म्हणतात. कां म्हणून शोध करतां असे कळते की, या शिलेवर वारकऱ्याने पाठ घासली असतां तो ८४ च्या फेऱ्यांपासून म्हणजे ८४ लक्ष योनी जन्म घेण्याच्या खटाटोपातून मुक्त होतो. परंतु ही शिला अनेक शतके विठोबाच्या आवारांतील एका कोपऱ्यात लोळत पडली होती. पुढे गेल्या पांच पन्नास वर्षांपूर्वी कोण्या द्रव्यदृष्टी बडव्याने तिला प्रस्तुत स्थळी आणून तिच्यावर एक देवीची मूर्ति स्थापन केली. त्या मूर्तीला चौऱ्यांशीची मूर्ति म्हणून नांव दिले आणि जो कोणी मूर्तीची पूजा करील व शिलेवर पाठ घाशील त्याचा चौऱ्यांशीचा फेरा चुकेल अशी अफवा उठविली. ती भाविक वारकऱ्यांना फारच पसंत पडली.

वरील उतारा लक्षपूर्वक वाचल्यास एक गोष्ट लक्षांत येईल की पंढरपूर विठ्ठल मंदिराच्या आवारातच लोळत पडलेली ही शिळा कोण्या उपद्व्यापी, चतुर व द्रव्यलोभी बडव्यानी त्याची योग्य जागी स्थापना केली व भाविक लोकांत आपल्या कल्पनेतून निघालेले एक पिलू – चौऱ्यांशी लक्ष योनीच्या जन्मांतून मुक्तता – सोडून दिले. व त्याचप्रमाणे परोक्ष अपरोक्ष त्याचा पद्धतशीरपणे प्रचार केला असावा. काय रम्य कल्पना

३. प्रा. म. को. लेख – डॉ. शं. गो. तुळपुळे, पुणे विद्यापीठ १९६३; लेख क्रमांक २४, पृ. १७९ पंक्ती क्रमांक ३१
स्थलनामचर्चेत ह्या स्थलाची निश्चिती डॉ. तुळपुळे यांनी केलेली नाही. अशी आणखीन काही स्थळे त्यांनी निश्चिती न करता सोडून दिली आहे. त्यातील काही गावे मला सापडली आहेत. ती लवकरच एक लेखाद्वारे मांडणार आहे.

आहे पहा ! अशा कल्पना पसरण्यास आपल्या लोकांत फारसा वेळ लागत नाही. बहुतेक सार्‍या प्रसिद्ध मंदिरांतून अशा प्रकारचे स्वस्तात अथवा विनासायास स्वर्ग गाठण्याचे साधन पोटार्थी पुजारी तयार करून ठेवतात. त्यास भाविक चटकन बळी पडतो. व त्याचा प्रसारही फार झपाटयाने होतो. ज्या विठ्ठलाच्या मंदिरात त्याच्या दर्शनासाठी जावयाचे आणि आपले शुभ करावयास त्यास मनोभावे आळवावयाचे व त्याच मंदिरांत केवळ एका दगडाला पाठ घासली असतां ८४ लक्ष जन्मांतून मुक्तता ! खरे पहातां विठ्ठलापेक्षा ह्या लेखयुक्त दगडाचेच महात्म्य वाढावयास हवे, परंतु तसे घडले मात्र नाही. ह्या ठिकाणी एक महत्वाची गोष्ट लक्षांत ठेवावयास हवी की दंतकथेनुसार द्रव्यदृष्टी वडव्याने ह्या शिळेचा योग्य (?) कामी वापर करण्यापूर्वी ही शिळा कोणत्याही नांवाने ओळखली जात नव्हती ती उपेक्षितच होती. शिलालेखाच्या स्थापनेपूर्वी (म्हणजे अलीकडील स्थापनेपूर्वी) जर हा लेख कोणत्याही एका विशिष्ट नांवाने प्रसिद्ध नसेल तर, यादवकाळांत पंढरपूर–'पंढरपूर चौर्‍यांशी ' या नांवाने प्रसिद्ध होते अथवा 'चौर्‍यांशी ' ह्या संज्ञेचा शोध घेणे म्हणजे वाळवंटात पाणी शोधण्यासारखे आहे अर्थात हे चंद्रभागेचे वाळवंट खासच नव्हे.

ह्यावरून खालील गोष्टी स्पष्ट होतात असे म्हणण्यास हरकत नसावी. 'चौर्‍यांशीचा लेख ' हे नांव अलीकडे म्हणजे साधारणपणे १५०–२०० वर्षांत प्रचारात आले आहे. अनेक संशोधकांनी लेखातील शकांकाबद्दल अथवा मंदिराच्या वाढदिवसाबद्दल जी मनसोक्त चर्चा केली आहे त्यात काही स्वारस्य नाही. इतिहासाचार्य यांनीच प्रथम पुढे मांडलेली दंतकथाच सत्य असावी. दंतकथा हचा सार्‍याच खोटया असू शकत नाहीत. काहीत सत्यांश जरूर असतो. त्या अनाम वडव्याला ज्याने हचा बहुचर्चित शिलालेखाला 'चौर्‍यांशीचा लेख ' असे नामाभिधान प्राप्त करून दिले आणि मोठमोठया विद्वान संशोधकांना आपली बुद्धी, तर्कशास्त्र व चतुराई पणास लावावयास लावली त्याला माझे वंदन असो.

* * *

घुबडाचा ऋग्वेद

निशाकरा !
जाणतोय मी पुरेपूर
तुझ्या किरणांचे रंग-राग
फुटक्या कवड्यांच्या माळेस
लखडलेल्या दोऱ्यात
बांधलेस वेताळ
नेले फरफटत करवंदी जाळीत
डोंगर – धुक्याच्या
कुरंग गंध झेल्यांचे दाखवून

कोरून आकाश – शिल्प
जटाधूच्या पंखांचे
वितळून टाकलेस तळांत
इंद्रायणीच्या
समोर पेरून उभे
एक चंदनी वाळवंट
आपल्याच सावल्यांचे तुरे झुलवीत...

दुध–खुळ्या लाटांना नादावून
केले पानिपत किनाऱ्यावर
उधार यौवनाच्या उन्मादात
अंतराळांत उसळलेल्या
त्या लाव्हाकणांचा वज्रलेप
आहे कायम अजून
तुझ्या गालावर

गुलामा !
कुणाला भरतोय ताकीद
डोळ्यास डोळा भिडवून सूर्याच्या
पंचाग्नि साधन करण्याची अहोरात्र
तुझ्याच थडग्यावर रोवून दुर्बीण—
टिपेन....कायोत्सर्ग मुद्रेत
याचि देही, याचि डोळा
तुझी उत्तर – क्रिया
याच प्रकाशतीर्थावर !

—बाळकृष्ण बन्नोरे

' त्या ग '

कमलाकर कुलकर्णी

पलंगावर पडल्या पडल्या विनोदनं मनगटावरील घड्याळात पाहिलं. सात वाजले होते. म्हणजे अजून पंधरा मिनिटांनी सिस्टर गादी नीट करून द्यायला, टेंप्रेचर घ्यायला येणार होती आणि त्यानंतर दहा–पांच मिनिटांनी डॉ. सतीश आणि डॉ. विद्या नेहमीप्रमाणं वॉर्ड–राऊंड घ्यायला येणार होते.

डॉ. विद्या...हं! तिची मूर्ती डोळ्यासमोर तरळताच विनोदनं डोळे मिटून घेतले. एका वेगळ्याच अननुभूत सौख्यविश्वात तो क्षणकाल बुडून गेला. विनोदला मग आठवलं, तो लहान असतांना ' डॉ. विद्या ' नावाचा एक हिन्दी चित्रपट खूप गाजला होता. पण आपल्याही आयुष्यात नेमक्या ह्याच नांवाची एक स्त्री डॉक्टर येणार आहे, इतकंच नव्हे तर, नाजूक भावनांची नक्षी विणणार आहे असं त्याला कधी स्वप्नातही वाटलं नव्हतं. पण, सत्य हे कल्पिताहूनही अद्‌भुत असतं असं म्हणतात ना! त्याचीच प्रचिती जणू विनोदला आली होती!

दोन महिन्यांपूर्वी विनोदला हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आलं होतं. नागपूरला रिजनल इंजिनिअर्सची कॉन्फरन्स होती. त्या कामाकरिता स्कूटरवरून नागपूरला जात असता विनोदला रस्त्यातच अपघात झाला होता. स्कूटरवरून दूर एका झाडावर तो फेकला गेला आणि त्या झाडाची एक टोकदार फांदी त्याच्या पोटात खुपसली. रक्ताची चिरकांडी आणि क्षणैक जाणवलेल्या तीव्र वेदना ह्यानंतर विनोदची शुद्ध जी हरपली ती चार दिवसानंतरच परत आली. कुणीतरी भल्या ट्रकड्रायव्हरनं विनोदला ताबडतोब नागपुरात आणून इस्पितळात भरती केलं होतं. आणि तेथील डॉ. सतीश आणि डॉ. विद्या या तरुण इंटर्नी डॉक्टरांनी विनोदच्या पोटाचं मेजर ऑपरेशन यशस्वीपणं करून विनोदला पुनर्जन्म दिला होता!

विनोद शुद्धीवर आल्यानंतर त्याला हे सारं कळलं होतं. एखाद्या कादंबरीत शोभून दिसतील असे प्रसंग आपल्या जीवनात प्रत्यक्ष घडलेले पाहून त्याला जितकं आश्चर्य वाटलं, त्यापेक्षाही अधिक आश्चर्य याचं वाटलं की डॉ. सतीश हा दुसरा तिसरा कोणी नसून त्याचा बालमित्र सतीश जोशी ह्याच होता. मॅट्रिक नंतर सतीश वैद्यकशास्त्राच्या अभ्यासाकरिता मुंबईच्या विश्वविद्यालयात दाखल झाला तर विनोदनं इंजिनिअरींग अभ्यासक्रमासाठी अमरावतीच्या महाविद्यालयात प्रवेश घेतला. दोन बालमित्रांची भिन्न दिशांना ताटातूट झाली अन् बालमैत्रीचे धागे विस्मरणात विरळ होत गेले.

पण, ऋणानुबंधांचं गणित माणसाला वाटतं तितकं सोपं कुठं असतं? योगायोगानं तुटलेले मित्र असे पुन्हा चमत्कारिकपणे जवळ आले होते. ओळख पटल्यावर विनोद आणि सतीश दोघांच्याही डोळ्यातून प्रेमाश्रूंची मुक्त बरसात झाली होती. सतीशनं आपल्याला जीवदान दिलं हे विनोदनं जाणलं होतं आणि मित्रासाठी आपल्याला काहीतरी करता आलं या खुषीनं डॉ. सतीश भारावून गेला होता.

आणि नेमक्या याच काळात नियति आणखी दोन हृदयांना जवळ आणीत होती. विनोदवर उपचार करता करता डॉ. विद्या नकळत विनोदच्या जवळ येत चालली होती. विनोद सतीशचा मित्र आहे आणि प्रख्यात तरुण इंजिनिअर आहे हे कळल्यानं विद्या त्याचेकडे विशेष आकर्षित झाली होती. दोन तरुण मनातील प्रेमभावना विकसित होत होत्या. पण हे सुंदर गुपित त्या दोघांखेरीज अजून कुणालाच कळलं नव्हतं. विनोदनं कालच शोभाला – त्याच्या बहिणीला – घरच्या बागेतील तीन चार गुलाबाची फुलं आणायला सांगितलं होतं. त्याप्रमाणे तिनं ती आणून दिली होती. आणि आज विनोद विद्याला ती फुलं देऊन आपलं हृदगत

तिच्याजवळ बोलणार होता. केव्हा एकदा तो क्षण येतो असे त्याला होवून गेलं होतं.

इतक्यात खोलीचं दार वाजलं अन् डॉ. सतीश आणि सिस्टर आत आले.

'हं. क्यों मिस्टर, हाऊ आर यू ?' डॉ. सतीशनं विनोदची चौकशी केली. 'ओ. के. डॉक्टर ! आय अॅम क्वाईट वेल् ! पण, आज डॉ. विद्या नाही आल्यात ?' – विनोदनं विचारलं.

'नाही. आज सी. एस. नी त्यांना एका ऑपरेशन केससाठी नुकचंच नेलंय्. हॉरीबल ! पेशंट फारच जळलाय, अशा ऑपरेशन्सचा भरवसा नसतो !' – सतीशनं उत्तर दिलं. सिस्टरनं विनोदचा ताप मोजला, गादी नीट केली आणि त्यास चहा देवून ती निघून गेली. खोलीत विनोद आणि सतीश दोघंच बोलत बसले. बोलता बोलता लग्नाचा विषय निघाला.

'सतीश, खरंच सांग, लाडू केव्हा देणारायम् ?' विनोदनं विचारलं. 'प्रथम मी तुझे खाणार अन् नंतर तुला देईन!' सतीशनं हसत उत्तर दिलं. 'मजाक छोड यार ! खरंच, 'एखादी' ठरवली असशीलच किनई ?' विनोदनं सतीशचा हात हातात घेत विचारलं.

'दोस्त, खरंच सांगू का ?' – सतीश.

'खरंच सांग !' – विनोद.

'मग मला प्रॉमीस दे, सिक्रेट ठेवशील म्हणून !' –सतीश म्हणाला.

'प्रॉमीस, प्रॉमीस, प्रॉमीस !' – विनोदनं खात्री दिली.

'विनोद, विद्या कशी वाटते तुला ?'– सतीश.

'कोण विद्या रे ?' – विनोदनं विचारलं.

'हे बघ, वेड पांघरून पेडगावला जावू नकोस ! विद्या म्हणजे तीच, जी रोज माझ्याबरोबर इथं येते आणि आज ऑपरेशन केससाठी गेलीय ती ! कशी वाटते रे ?' असं विचारत सतीशनं विनोदकडं पाहिलं. पण विनोदनं कुस बदलली होती आणि तळहातांनी चेहरा झाकून घेतला होता. त्याचं अशक्त शरीर थरथरतंय असा सतीशला भास झाला.

'व्हॉट हॅपन्ड विनोद ? विनोद...?' सतीशनं त्याच्या तोंडावरील हात बाजूला केले. विनोदच्या डोळ्यातून अश्रू का वरं निघताहेत हे त्याला कळेना. 'विनोद काय झालं रे ? असा काय करतोस एकाएकी ?'

'काही नाही पोटात कळ निघाली जोरात.' विनोदनं डोळे पुसत उत्तर दिलं. ज्यानं शारीरिक वेदना शमविल्या त्याच सतीशनं नकळत विनोदच्या मनावर वज्राघात केला होता. 'विनोद, तू काही तरी तडतड केली असणार नक्की ! विनोद, माइन्ड वेल, यु स्टील नीड अे बेड रेस्ट ऑफ वन् मंथ !' विनोदला प्रेमळ अधिकाराने बराच वेळ दटावल्यानंतर सतीश निघून गेला.

सतीश जाताच विनोद पलंगावर उठून बसला. त्याचं डोकं भणभणत होतं. विलक्षण थकवा वाटत होता. सकाळची प्रसन्नता आता कुठंतरी लुप्त होवून गेली होती त्याला वाटलं उठावं, आणि खूप जोरानं विद्याला हाक मारावं, शोभानं आणून दिलेली, फुलदाणीत खोवलेली गुलाबाची फुलं कुस्करून खिडकीबाहेर फेकून द्यावी ! तो हळूहळू उठला आणि फुलदाणीजवळ येवून त्याने ती फुलं हातात घेतली. इतक्यात त्याचं लक्ष खिडकीतून बाहेर गेलं. हॉस्पीटलच्या बागेत माळी फुलझाडांना पाणी टाकत होता. तऱ्हेतऱ्हेची सुंदर टवटवीत फुलं वाऱ्याच्या झुळकेने डोलत होती. त्या विलोभनीय दृश्यानं विनोदला एकदम वरं वाटलं. त्याला वाटलं, 'ही सुंदर नाजूक फुलं आज किती सुरेख दिसताहेत...दोन दिवसानंतर ती सुकणार आहेत हे त्यांच्या ध्यानीमनीही नाही. दोन दिवसांचं याचं आयुष्य, पण ती किती सुखी, आनंदित असतात ! आपल्या मोहकतेनं दुसऱ्यांना दृष्टिसुख देवून त्यांचा दुःखभार ती हलका करतात, आपल्या मधुर सुवासानं साऱ्यांच्या चित्तवृत्ती प्रफुल्लित करतात ! इतरांना सुख देणं, आनंद देणं हेच त्यांचं जीवन, ह्यातच त्यांचंही सुख ! फुलांना जर हे जमतं तर सारासारविचारशक्ती असलेल्या आपल्यासारख्या मानवाला का जमू नये ? आपणही त्या फुलांचाच आदर्श समोर ठेवायला हवा. आपणही त्याग करायला हवा, आपल्या मित्रासाठी, सतीशसाठी ! ज्यानं आपल्याला पुनर्जन्म दिला त्याच्यासाठी !'

ह्या विचारांसरशी विनोदला एकदम हलकं हलकं वाटू लागलं. बाहेर चुरगळून फेकून देण्यासाठी फुल-

दाणीतून काढलेल्या गुलाबांच्या फुलांचं त्यानं ओझरतं चुंबन घेतलं आणि ती पुन्हा फुलदाणीत ठेवून दिली.

आता, थोड्या वेळानं विद्या आली की, विनोद ती फुलं तिला देणार होता आणि तिला सांगणार होता, 'विद्या, आपल्या निष्पाप प्रेमाची ही फुलं म्हणजे पहिली आणि शेवटची भेट ! विद्या, तुझं माझ्यावर खरोखरीच प्रेम असेल तर तू मला विसरून जा ! कारण, सतीशही तुझ्यावर प्रेम करतोय...तू त्याची जीवनसाथी व्हावीस अशी त्याची फार इच्छा आहे ! विद्या, हे जीवन म्हणजे विचित्र आहे....इथं कधी कधी हरण्यातच जिंकल्याचं समाधान मिळतं, त्यागानंच भोगापेक्षाही परिपूर्ण तृप्ती मिळते...! विद्या, सतीशनं मला जीवदान दिलं आहे...त्याच्या सुखाकरिता मला हा त्याग करावाच लागेल अन् त्यातच मला आनंद वाटेल ! आणि माझ्या आनंदासाठी तुलाही मला विसरावं लागेल ! विद्या...प्लीज !"

॥ ॥ ॥

स्वप्नांनी आयुष्य सजविता आले असते तर ---!

स्वप्नांनी आयुष्य सजविता आले असते –
तर घेतले असते गोंदवून सर्वांग
हिरव्या गोंदणथेंबांनी !
छेडली असती दर्दभरी चंद्रधून
निथळणाऱ्या काळोखातून बेमुर्वत !
किंवा दिले असते उधळून पिसाट
या प्राणांचे थवे –
सुंसाट वादळवाऱ्यावर निरर्थक !
तेव्हा आला असता अर्थ
तुमच्याही ऋचांना भरघोस कसा !
पण अशा नपुंसक आशयाचे तह
आम्ही कधी केलेच नाहीत. स्वप्नांनी आयुष्य....!

आलोय फक्त भोगत
असेच अनुवाद बेचव आयुष्याचे
नुसते आकार झाडांचे
पण बहर बेपत्ता !
जथे आतड्यांचा तंतकार मुकाट
जुळवीत होता गिटार
विसंवादी सुरांचे !
जखमातून उधाणत्या हुंदक्यांची सोबत
ओलेत्या डोळ्यातील थेंबाची फसगत
पचवून टाकलीय उजाड होऊन
ओसाड वाळवंटासारखी !
किंवा क्रूस खांद्यावर टाकून
मृत्यूच्या मोहोल्ल्यातून फिरलोय
बिनदिक्कत !
वळणावळणावर तुमचे संपन्न मीनाबाजार
आणि झुकून सलाम करणारे चकवे
जागोजाग !

पण पापांच्या वळचणीखाली
उभे पुण्य अंग चोरून
अशा मग्रूर गनिमी कळपात
शिरणे कधी जमलेच नाही !
अशा नपुंसक आशयाचे तह
आम्ही कधी केलेच नाहीत
स्वप्नांनी आयुष्य सजविता आले असते तर....!

– नीलकांत ढोले

दशकुमारचरितातील वानवास्य

के. रा. जोशी

दंडीच्या दशकुमारचरितातील आठव्या उच्छ्वासात विश्रुत नावाच्या कुमाराचे वृत्त आले आहे. त्यावरून असे दिसते की दक्षिण भारतात त्या काळी एक थोरले साम्राज्य होते. या साम्राज्याचा स्वामी स्वतः विदर्भावर राज्य चालवीत होता; व त्याच्या मांडलिकांच्या अधिकाराखाली कुन्तल (दक्षिण महाराष्ट्र), अश्मक (गोदावरीच्या दक्षिण तीरावरील, औरंगाबाद जवळील प्रदेश), नासिक्य (नाशीक), ऋषीक (खानदेश), कोंकण, मुरल (गोदावरीजवळील प्रदेश), इत्यादी प्रदेश होते. यास्तव प्रस्तुत विदर्भाधिपतीचे साम्राज्य उत्तरेस नर्मदेपासून दक्षिणेस तुगंभद्रेपर्यंत व पश्चिमेस अरबी समुद्रापासून पूर्वेस निदान वैनगंगेपर्यंत पसरले होते. ह्या राजानंतर त्याचा मुलगा राज्याचा स्वामी झाला. हा बुद्धिमान व कलानिपुण होता. पण राजनीतीच्या अभ्यासाकडे त्याचे मुळीच लक्ष नव्हते. तो एका खुशमस्कऱ्याच्या तंत्राने चालत होता. त्याच्या पित्याच्या वृद्ध मंत्र्याने त्याला राजनीतीच्या अभ्यासाचा उपदेश केला, पण त्याने दुर्लक्ष केले. राज्यकारभार सोडून तो विषयोपभोगात काळ घालवू लागला. यथा राजा तथा प्रजा या न्यायाने अधिकारी व प्रजाजनही त्याचेच अनुकरण करू लागले. त्यामुळे सर्वत्र अंदाधुंदी व अव्यवस्था माजली. ही संधी साधून अश्मक देशाच्या राजाने कारस्थान रचले व विदर्भ–देशाच्या सैनिकांचा नाश आरंभिला. शेवटी अश्मकाधिपतीने वानवास्य राजाला चिथावणी दिली. तो विदर्भावर चाल करून आला. तेव्हा त्याला तोंड देण्यासाठी विदर्भनृपतीने सैन्याची जमवाजमव केली. व स्वतःच्या सर्व सामंतांनाही बोलाविले. सर्व जमल्यावर विदर्भनृपतीने वरदा नदीच्या तीरावर सैन्याचा तळ दिला. प्रस्तुत लेखात विश्रुत चरितात वाकाटकांच्या ह्रासकालीन स्थितीचे प्रतिबिंब आहे असे अनेक मान्यवर संशोधकांचे म्हणणे मान्य करून अश्मक राजाने ज्या भानुवर्मा नावाच्या वानवास्य राजाला चिथावणी दिली तो कोण व कुठल्या प्रदेशाचा असणे संभवनीय आहे या मुद्याची चर्चा करावयाची आहे.

यासंबंधी या विषयाचे ख्यातनाम अभ्यासक म. म. डॉ. वा. वि. मिराशी यांचे मत असे आहे की, हा वानवास्य वनवासी प्रदेशाचा म्हणजे सध्याच्या कर्नाटक राज्यातील उत्तर कानडा जिल्ह्यात येणाऱ्या प्रदेशाचा राजा होय.[१] (वनवासीला वैजयंती या या नावानेही ओळखत.[२]) इ. स. पाचव्या व सहाव्या शतकात येथे कदंब नृपतीचे राज्य होते. शेवटचा कदंब नृपती भानुवर्मा याचा इ. स. ५४५ मध्ये दिलेला एक ताम्रपट उपलब्ध झाला आहे. त्याचा पिता रविवर्मन् हाच दशकुमारचरितातील भानुवर्मा असावा, असे म. म. मिराशींचे मत आहे.

संशोधन मुक्तावली सर दुसरा या पुस्तकाच्या पृ. ८९ वर तळटिपेत म. म. मिराशींनी अशी माहिती दिली आहे की "दशकुमारचरिताच्या प्रायः सर्व छापील आवृत्तीत 'नर्मदारोधसि' असा पाठ आहे. पण तो बरोबर नाही. कारण वनवासी हे गाव उत्तर कानडा जिल्हयात आहे. विदर्भावर स्वारी झाली ती दक्षिणेतून झाली. वनवासीनृपतीने विदर्भाची दक्षिण सीमा जी गोदावरी ती ओलांडून काही प्रदेश काबीज केला होता असे दिसते. त्याला सामना देण्यासाठी विदर्भनृपती नर्मदातीरी जाईल हे संभवनीय नाही. इतरत्र केवळ श्री. आगाशेंच्या पुस्तकात वरदारोधसि असे छापलेले पाहून तो पाठ वरदारोधसि असावा असा समज झाला. पुढे श्री. पी. के. गोडे यांना भांडारकर प्राच्य विद्या मंदिरात विक्रमसंवत् १८१६ (स. १७६०) च्या हस्तलिखितात 'वरदारोधसि' असाच पाठ आढळल्याचे कळाले. तेव्हा विदर्भनृपतीची वनवासीच्या राजाशी लढाई वर्धा नदीच्या तीरावर झाली असे म्हणण्यास बळकटी येते." वरील माहितीवरून

म. म. मिराशींना संमत असलेला 'वरदारोधसि' हा पाठ जुन्या हस्तलिखिताचा पुरावा मिळाल्यामुळे अधिक ग्रहृच झाला आहे. परंतु, त्यांनी वनवासी प्रदेशाचा राजा जो वानवास्य त्याविषयी जो कयास व्यक्त केला आहे त्यामधील अनुपपत्ती विचारणीय आहेत.

विदर्भाचे साम्राज्य उत्तरेस नर्मदेपासून दक्षिणेस तुंगभद्रेपर्यंत व पूर्वेस वैनगंगेपासून पश्चिमेस कोंकणापर्यंत होते असे उल्लेखून विश्रुत चरितात आलेल्या मांडलिकांशिवाय विदर्भनृपतीचे इतरही मांडलिक – उदा. पूर्वेचे कलिंग, कोसल, आन्ध्र असावे असे त्यांनी म्हटले आहे.[3]

वानवास्य राजाविषयी दशकुमार चरितातील विश्रुत–कथेत एकूण केवळ पाच उल्लेख आहेत.

i) वसन्तभानुर्भानुवर्माणं नाम वानवास्यं प्रोत्साह्यानन्तवर्मणा व्यग्राहयत्[४] ।

ii) तत्परामृष्टराष्ट्रपर्यन्तश्चानन्तवर्मा तमभियोक्तुं बलसमुत्थानमकरोत्[४–१]।

iii) अयं च वानवास्यः प्रियं मे मित्रम् । अमुनैनं दुर्विनीतमग्रतो व्यतिषिक्तं पृष्ठतः प्राहरेम[४–२]।

iv) उत्तरेद्युस्तेषां सामन्तानां वानवास्यस्य चानन्तवर्मा नयद्वेपादामिपतामगच्छत्[५] ।

v) वानवास्यं केनचिदंशेनानुगृह्य प्रत्यावृत्य सर्वमनन्तवर्मराज्यमात्मसादकरोत्[६] ।

यासंबंधी म. म. मिराशींचे निष्कर्ष असे आहेत:–

१) विश्रुतकथेतील विदर्भविषयक राजकीय उल्लेखात वाकाटकांच्या ह्रासकालीन राज्यस्थितीचे प्रतिबिंब असावे.

२) वानवास्य हा वनवासीचा (उत्तर कानडा जिल्हयाचा) राजा असावा.

३) भानुवर्मन्चा पिता रविवर्मन् हा भानुवर्मन् म्हणून विश्रुत चरितात उल्लेखिला गेला असावा.

४) लढाई ही नर्मदा तीरावर न होता वरदा तीरावर झाली असावी असे मानणे सयुक्तिक असल्यामुळे 'नर्मदारोधसि' ऐवजी 'वरदारोधसि' हा पाठ श्रेयस्कर आहे.

५) विदर्भाची दक्षिणसीमा गोदावरीपर्यंत होती.

६) वानवास्य हा विदर्भाचा दक्षिणभाग जिंकून गोदावरीतीरावर आला होता.

वरील निष्कर्षांपैकी विदर्भातील राजकीय स्थितीत वाकाटक साम्राज्याच्या ह्रासकालीन स्थितीचे प्रतिबिंब दिसते व लढाई ही वरदातीरावर झाली असे निष्कर्ष गृहीत धरल्यास पुढील प्रश्न उत्पन्न होतात.

I) वानवास्य म्हणजे वनवासीचा राजा असे म. म. मिराशींचे म्हणणे आहे. वानवास्य या शब्दात वनवासी हा मूळ शब्द आहे. वनवासी ही उत्तर कानडा जिल्ह्यातील कदंबनृपतींची इतिहासप्रसिद्ध राजधानी होय. त्यामुळे वानवास्य भानुवर्मन् म्हणजे कदंबकुलोत्पन्न रविवर्मन् असावा असा त्यांचा कयास आहे. वस्तुतः इ. स. ५४५ चा ताम्रलेख ज्याचा सापडला तो भानुवर्मा. रविवर्मन् या नावापेक्षा नामसादृश्यच नव्हे तर नामैक्य हे प्रस्तुत भानुवर्म्याच्या बाबतीत आढळून येते. त्याचप्रमाणे मध्ययुगीन चरित्रकोषात जोव्हीओ डुब्रील यांच्या Ancient History of the Deccan या ग्रंथातील पृष्ठ ९५ वर उल्लिखित वंशावलीच्या आधारे रविवर्मन् व भानुवर्मन् हे भाऊ होते असे म्हटल्याचे आढळून येते. तेव्हा वानवास्य भानुवर्मा हा रविवर्मन् समजावयाचा की त्याचा बंधू भानुवर्मा हा घ्यावयाचा !

दुसरे असे की वनवासीचा राजा तो वानवास्य या अर्थी व्याकरणदृष्ट्या वानवास्य रूप व्युत्पन्न होऊ शकत नाही.

II) वानवास्य भानुवर्म्याने उत्तर कानडा जिल्हयातील नगरीहून विदर्भावर स्वारी केली हे म्हणणे भौगोलिक दृष्टीनेही विसंगत होईल. त्यावेळी विदर्भनृपतीची वरीच मांडलिक राज्ये होती. वनवासीच्या बाजूकडून ऋषीक (खानदेश), अश्मक (औरंगाबाद) व कुन्तल (दक्षिण महाराष्ट्र) अशी ती आड येत असत. उत्तर कानडा जिल्हयातून स्वारी करावयाची झाल्यास अश्मक अथवा कुंतल ओलांडल्याशिवाय स्वारी होऊ शकत नाही. अश्मकाने आपला इमानदारपणाचा देखावा शेवटपर्यंत कायम ठेवला होता; व महासामंत कुन्तलपती अनन्तदेव अनन्त वर्म्याचा नादानपणा स्वतःच्या बाबतीत अनुभवास येईपर्यंत एकनिष्ठ होता. म्हणून भानुवर्मा तिकडून चालून आला असे म्हणणे तर्कसंगत वाटत नाही.

III) तिसरी महत्त्वाची गोष्ट अशी की वरदा (हल्लीची वर्धा) नदी ही विदर्भात सामान्यतः वायव्य-

आग्नेय अशी वाहते. (वाकाटकांच्या वत्सगुल्मशाखेची ती पूर्वसीमा म्हणावयास हरकत नाही.) वरदा पुढे पैनगंगेला, पैनगंगा प्राणहितेला व प्राणहिता गोदावरीला मिळते. दक्षिणेकडून शत्रू उत्तरेला वरदेच्या पूर्व तीरावर येण्यासाठी विदर्भाच्या रोखाने सरकू लागला तर तो गोदावरीच्या काठाने पुढे जाईल. (पूर्वी सैन्याच्या हालचाली शक्य तो नदीकाठाने होत असत. कारण, सैन्याला लागणारा पाणीपुरवठा विना सायास होऊ शकत असे.) गोदावरी ओलांडून विदर्भ जिंकणारा शत्रू वरदेच्या पूर्व तीरावर येण्यासाठी उत्तरेकडे सरकू लागला तर लढाईही पैनगंगेच्या तीरावर होऊ शकते. वानवास्य हा वरदेच्या पूर्वतीरावर व विदर्भनृपती पश्चिम तीरावर ही स्थिती उत्पन्न होणे त्या परिस्थितीत शक्य दिसत नाही. एवढेच नव्हे तर स्वारी झाल्याचा निरोप आल्यावरोबर अश्मक व कुंतलनृपती मदतीसाठी आले असा जो उल्लेख आहे तोही जुळू शकणार नाही. कारण, म. म. मिराशींच्या मते गोदावरीच्या वरील प्रदेश भानुवर्म्याने जिंकला असे मानले तर अश्मक व कुन्तलपती साहाय्यासाठी येऊ शकणार नाहीत.

याशिवाय, वनवासीचा राजा हा वस्तुत: एका लहान प्रदेशाचा राजा होय. तो अश्मकाच्या चिथावणीने शेकडो मैलांचे अंतर कापून दक्षिण विदर्भाचा प्रदेश जिंकतो व स्वत:ची रसद तुटू न देता विदर्भनृपतीशी मोठे युद्ध लढू शकतो हे तर्काला मुळीच पटण्यासारखे नाही.

दक्षिण विदर्भाचा बराचसा भाग वानवस्याने जिंकला होता ह्या महामहोपाध्यायांच्या विधानाला 'तत्परामृष्टराष्ट्रपर्यन्त:' या उल्लेखात अजिबात दुजोरा मिळत नाही. प्रस्तुत उल्लेखात विदर्भप्रदेशाच्या सीमेवर त्याने हल्ले सुरू केले होते एवढेच सांगितले आहे. यावरून हा वानवास्य उत्तर कानडा जिल्ह्यातील वनवासीचा कदंबकुलोत्पन्न रविवर्मन् असावा हा म. म. मिराशींचा कयास युक्तियुक्त वाटत नाही.

वनवासीचा राजा तो वानवास्य अशा अर्थाने वानवास्य असा प्रयोग अजून तरी ऐतिहासिक शिलालेख वा ताम्रपत्र यातून कदंब राजांना उद्देशून वापरल्याची माहिती अभ्यासकासमोर असल्याचे ऐकिवात नाही; आणि व्याकरणाच्या नियमांनी तसा प्रयोग व्युत्पन्न होण्याची शक्यताही नाही.

तेव्हा जर म. म. मिराशींचे म्हणणे सुसंगत वाटत नाही तर या प्रश्नाचे दुसरे उत्तर संभवू शकते काय या बाबीचा विचार करणे आवश्यक आहे.

भानुवर्मा हा वानवास्य का म्हणवला जात होता याचे विवेचन करताना 'वानवास्यो वनप्रभु:' असा कोश मुंबईच्या निर्णयसागरातून प्रसिद्ध झालेल्या दशकुमारचरिताच्या टीकेत दिला आहे. कोशाचे नाव मात्र उपलब्ध नाही. यावरून वनप्रभु: म्हणजे वनप्रदेशाचा राजा असा टीकाकाराचा अभिप्राय दिसतो; किंवा वानवास्य हा त्या अर्थाने टीकाकाराच्या माहितीचा असावा असा निष्कर्ष आपण काढू शकतो. विदर्भाची पूर्वसीमा आजही अरण्यांनी गजबजली आहे. मंडला, चंद्रपूर, नागपूर येथे पूर्वीही गोंडांची राज्ये गाजून गेली आहेत. अर्थातच विदर्भात अनन्तवर्म्याच्या राजवटीत अंदाधुंदी माजल्यामुळे सीमेवरच्या एखाद्या धाडसी राजाने विदर्भावर स्वारी करणे अधिक स्वाभाविक होय. सीमेवरचे राष्ट्र हे शत्रू म्हणून केव्हाही उभे ठाकू शकते. कौटिल्याने प्रतिवेशी राष्ट्राला 'अरि:' असे म्हटले आहे. तेव्हा त्याचा राजा प्रत्यन्तनृपती म्हणून कारस्थानी अश्मक त्याला चिथवू शकतो. कारण, सगळा विदर्भ त्याने स्वत:चा मंत्रिपुत्र जो चंद्रपालित त्याचे द्वारा पोखरून ठेवला होता. त्यासाठी सीमाप्रदेशावर असलेल्या भानुवर्म्याकडून शस्त्रास्त्रे मिळाली असणे संभाव्य आहे. म्हणूनच 'अयं च वानवास्य: प्रियं मे मित्रम्' असे अश्मक म्हणतो. तेव्हा गुप्तसंधान बांधण्यात पटू असलेल्या पाताळयंत्री अश्मकाने सर्व सिद्धता केली असल्याचे विश्रुतचरितात नमूद आहे. म्हणूनच तो कारस्थानातील इतर सहकाऱ्यांना, समोरून भानुवर्मा व मागून आपण याप्रमाणे अनंतवर्म्याला कैचीत पकडू असे म्हणतो. (अमुनैनं दुर्विनीतम् अग्रतो व्यतिषक्तं पृष्ठत: प्राहरेम) अशी स्थिती चंद्रपूर प्रदेशातील किंवा पूर्व सीमेवरील इतर कोणत्याही प्रदेशातील वनप्रभू राजा विदर्भनृपतीशी लढला ह्या कल्पनेला अधिक जुळणारी आहे; उत्तर कानड्यातील नृपती लढला या कल्पनेशी नव्हे. भौगोलिक पुरावाही ह्या मताशी जुळणारा आहे.

व्याकरण दृष्टीनेही वनवासी (वने वसति) एव वानवास्य: असा स्वार्थे ष्यञ् मानल्यास प्रयोग जुळू शकतो. प्रस्तुत कल्पनेस उपोद्बलक असे ऐतिहासिक प्रमाणही आढळते. बस्तर जिल्हा व त्याच्या पूर्वेचा

काही प्रदेश यावर राज्य करणारे 'नल' राजे वाकाटकांचे प्रत्यन्तनृपती होते.[७] त्यांची सोन्याची नाणी सापडली आहेत. ह्या नलवंशीय राजांपैकी भवदत्तवर्म्याने विदर्भाचा बराचसा भाग जिंकला होता. ही घटना इ. स. ४७० च्या सुमाराची होय.[८] म. म. मिराशींच्या मते मुख्यत: वाकाटकांच्या वत्सगुल्म शाखेचा इतिहास विश्रुतचरितात सूचित झाला आहे. आंध्रप्रदेशाचा विष्णुकुंडीवंशी राजा प्रथम माधववर्मा हा वाकाटकांचा नातलग होता. त्याने वाकाटक राजकन्येशी विवाह केला होता हे तत्कालीन कोरीव लेखावरून कळते. त्याने हरिषेणाच्या मुलास गादीवर बसविले व पुढे तो स्वत: विदर्भाधिपती झाला. विश्रुताच्या चरित्रात याचे प्रतिबिंब असावे असा म. म. मिराशींचा कयास आहे. विष्णुकुंडी माधववर्म्याची नाणी विदर्भात पवनार, नागपूर, भंडारा वगैरे ठिकाणी सापडली आहेत. एवढेच नव्हे तर कोरीव लेखात आलेल्या वर्णनावरून त्याचा अंमल दक्षिणकोसल (छत्तीसगढ), पश्चिम महाराष्ट्र आदी प्रदेशावर पसरला असल्याचे दिसते. त्यामुळे वाकाटकांचा हा नातलग याप्रमाणे राज्याची सर्व सूत्रे सांभाळता झाला व पुढे दक्षिणेचा सम्राट बनला. यावरून वाकाटकांचे राज्य खच्ची झाले यात काहीच शंका उरत नाही. अर्थातच हे राज्य खच्ची करण्याचे काम नलवंशीय भवदत्तवर्म्याने केले. पूर्वोक्त विष्णुकुंडीवंशी माधववर्म्याने दक्षिणकोसल (छत्तीसगड) विजय केला तो नलवंशीय राजांचा उच्छेद करण्यासाठी असावा हे पटण्यासारखे आहे.

वाकाटकांची नन्दिवर्धनशाखा भवदत्तवर्म्याच्या गंडांतराने फार संकटग्रस्त झालेली होती हे म. म. मिराशींना मान्य आहे. त्यासंबंधीचा सूचक उल्लेख असणारे ताम्रपत्र[१०] उपलब्ध आहे. अर्थातच वरदेच्या पूर्वतीरावर उभय वाकाटकांना हैराण करण्याइतका प्रबळ शत्रू होता हे स्पष्ट आहे. अर्थातच इ. स. ५०० च्या शतकाच्या शेवटी चंद्रपूरच्या बाजूने हल्ला करणे शक्य आहे. म. म. मिराशी हरिषेणाचा काळ ४७५ ते ५०० इ० असा मानतात व विश्रुतचरितातील घटना सहाव्या शतकातील त्याच्या मुलासंबंधी असावी असे त्यांचे मत[११] आहे. दण्डीचा (विश्रुतचरितकार) काळ हा सहाव्या शतकात संशोधक मानतात. संस्कृत कवींचे काल किंवा प्राचीन ऐतिहासिक घटनांचे काळ हे बहुतेक कयासाच्या स्वरूपाचे आहेत. यास्तव वरदेच्या पूर्व तीरावर लढणारा वाकाटकांचा शत्रू हा नलवंशीय राजांमध्ये शोधणे हे युक्तिसंगत व पुराव्यास जुळणारे आहे. तेव्हा ५–२५ वर्षे मागेपुढे ही बाब मान्य पुरावा समोर येईपर्यंत सहन करणे भाग पडते. यावरून विश्रुतचरितातील वानवास्य हा उत्तर कानडा जिल्ह्यातील वनवासीचा राजा नसून विदर्भाच्या पूर्व सीमेवरील नलवंशीय भवदत्तवर्मा वा इतर नलवंशीय राजा असावा अशी कल्पना करणे अधिक सयुक्तिक आहे.

---

१. वाकाटक नृपति व त्यांचा काळ – पृ. ९३; संशो. मु. दु. सर पृ. ९९.
२. अभिनव ज्ञानकोष ले. भिडे – 'कदंब'.
३. सं. मु. सर दु. पृ. ९७.
४. ४–१, ४–२. दशकुमारचरितम् पृ. २०० (निर्णयसागर प्रत).
५., ६. दशकुमारचरितम् – पृ. २०१.
७. संशो. मु. सर २ – पृ. ८.
८. संशो. मु. स. २ – पृ. ५० व वाकाटक नृपति व त्यांचा काळ पृ. ५१.
९. विष्णुकुण्डि-वाकाटक-वंशद्वयालङ्कृतजन्मन: –– ए. इं. पु० ४, पृ. ११५.
१०. बालाघाट ताम्रपट – वाका. नृ. व त्यांचा काळ पृ. ५२.
११. वाका. नृ. व त्यांचा काळ पृ. ६०–६३.

कृष्णदास मुद्गलाच्या रामायणावर प्रकाश

वि. बा. प्रभुदेसाई

कृष्णदास मुद्गल हा प्राचीन कवी एकनाथांचा समकालीन असून त्याने रचिलेले रामायणाचे 'युद्धकांड' तेवढे आतापर्यंत उपलब्ध झालेले आहे या कृष्णदास मुद्गलाच्या संदर्भात अभ्यासकांसमोर जे अनेक प्रश्न उपस्थित झालेले आहेत, त्या सर्वांचाच पूर्ण उलगडा झालेला आहे, असे म्हणता येणार नाही. हा कवी आणि कृष्णदास लोळी (किंवा लोळचा) हे एकच आहेत की भिन्न, त्याने संपूर्ण रामायण मराठीत आणले आहे की एखाददुसऱ्या कांडावरच रचना केली, त्याची अन्य वाङ्मयीन कामगिरी कोणती, त्याची चरित्रविषयक अधिकृत माहिती इत्यादींचा थोडाफार परामर्श आतापर्यंतच्या काही संशोधकांनी घेतलेला आहे.

डॉ. शं. गो. तुळपुळे हे प्रस्तुत विषयावरील विवेचनाच्या ओघात लिहितात, " कृष्णदास लोळचाविषयी विशेष माहिती नाही; परंतु 'सारस्वता'च्या द्वितीयावृत्तीत 'कृष्णदास मृद्गल लोळी विरचित' युद्धकांडाची एक प्रत विंचूरचे श्री. ना. व. कुलकर्णी यांचेकडे ऐकिवात असल्याचे कै. भावे सांगतात (पृ.१३७). संशोधकांनी शोध घ्यावा, कदाचित कृष्णदास मुद्गल एकच असून तो लोळी गावचा असण्याचा संभव आहे. कृष्णदास मुद्गलाच्या गुरूचे नाव कृष्ण नसून काशीराज असावे, असे त्याच्या युद्धकांडातील 'श्रीगुरू काशिराजाय नमः' या उल्लेखावरून वाटते. तसेच मागें सुंदरकांड संपादिलें। आतां युद्धकांड आरंभिलें, हे उद्गार त्याने रामायणाची मागील कांडेही रचिली असावी असे सुचवितात ".

[वि. ल. भावे, **महाराष्ट्र सारस्वत (पुरवणीसह)**, आ. पाचवी, मुंबई १९६३, पृ. ७८०.]. या मजकुराखालच्या तळटीपेत डॉ. तुळपुळे यांनी पुढील माहिती दिली आहे :– " कृष्णदास मुद्गलाचे 'अयोध्याकांड' मिळाल्याचे प्रा. वा. ल. कुलकर्णी (मराठवाडा विद्यापीठ) पत्रद्वारे कळवितात." या माहितीच्या आधारे मी चौकशी केली तेव्हा मराठवाडा विद्यापीठाच्या संग्रही आढळले ते कृष्णदास मुद्गलाच्या 'युद्धकांडा'चेच आणखी एक हस्तलिखित ! तंजावरच्या सरस्वती महाल संग्रहातील एका हस्तलिखितात कृष्णदासाची थोडीशी पद्यरचना उपलब्ध झालेली असली तरी त्याचे रामायणावरील एखादे नवे कांड मात्र अद्याप कुणालाही सापडल्याची विश्वासार्ह नोंद आढळत नाही.

वि. ल. भावे आणि शं. गो. तुळपुळे यांच्या व्यतिरिक्त, रा. चिं. ढेरे, प्रा. माणिक ल. धनपलवार, डॉ. ग. वा. तगारे, प्रा. म. रा. जोशी इत्यादी अभ्यासकांनीही निरनिराळ्या हस्तलिखितांच्या आधारे कृष्णदास मुद्गल या व्यक्तीवर आणि तिच्या वाङ्मयीन कर्तृत्वावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केल्याचे आढळते. अशा प्रकारच्या काही प्रमाणात अज्ञात व काही अंशी अज्ञात विषयांचा शोध घेताना समकालिनांच्या साहित्यातील निर्देशांच्या जोडीला त्या मूळ कवीच्या काव्याची हस्तलिखिते हाही महत्त्वाचा आधार मानला जातो. प्रा. जोशी यांनी आपल्या लेखात श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर, धुळे, राजवाडे संशोधन मंदिर धुळे व महाराजा सर्फोजी सरस्वती महाल लायब्ररी, तंजावर येथील कृष्णदास मुद्गलाच्या 'युद्धकांडा'च्या हस्तलिखितांची तपशीलवार माहिती दिलीच आहे. या ठिकाणी आणखी काही महत्वाच्या हस्तलिखितांचा परिचय करून घ्यावयाचा आहे.

औंध – प्रत – श्रीभवानी चित्रसंग्रहालय व ग्रंथालय, औंध (सातारा) येथील हस्तलिखित विभागात उपलब्ध झालेल्या या प्रतीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :–

ग्रंथांक क्रमांक – १३८०; **विषय** – (इतिहास ?) मराठी **ग्रंथनाम** – रामायण; **ग्रंथकारनाम** – कृष्णदास मुद्गल. **लेखनकाल** – (?). **लिपी** – मराठी (बाळबोध). **पृष्ठे** – ५२ (त्रुटित).

हस्तलिखितांची लांबीरुंदी – ९½" × ५"

प्रत्येक पानावर ११ ते १२ ओळी. जुन्या कागदावरील काळ्या शाईतील लिखाण. मूळ हस्तलिखिताची कल्पना येण्यासाठी काही 'प्रसंगां'तील निवडक अंश येथे उद्धृत करीत आहे.

॥ प्रसंग २१ वा ॥

साहीत्ये अक्षरांची अंवुजे। तुरंबुनी नवरसाप्रती भोजे। ते कवतुक दोहावया वीजे। चतुरी का पान करावे ॥९८॥ इती श्रीयौध्येकांडकथाअमृते। ळोकोधरण वाळमीकीत्रु (?) ते। ते परीसावे करूनी सुत्रीत। कृष्णदास मुद्गळु म्हणे :॥९९॥ प्रसंग यकवीसावा॥२१.

॥ प्रसंग २२ वा ॥

ऐसा संग्राम मांडला। आकांत धरीला लंकेस्वरे। ते काळी बोलोनी प्रताप उतरे। प्रहस्त सावरीले॥३॥ आता प्रधानु प्रहस्तनामा ॥ जाईल तुरंगणीसी संग्रामा। तोची सुपरीसा म्हणोनी। प्रार्थीतु असे ॥४॥ कृष्णदासु मूद्गळु वीनवी। प्रस्णकी सादर (क्ष ?) तो घ्यावी। सुत्रीत कथा परीसावी। रामायेण म्हणौनीयां॥२४०५॥ प्रसंग बावीसावा :॥६६

॥ प्रसंग २३ वा ॥

इतीश्रीयोध्येकांडकथापीउश। नानातरामायेण सरावे (?) पमाकय (?)। स्वातरेमाते कारांडाहय (?)। कृष्णदास मुद्गळु म्हणे ॥४५॥ प्रसंग तेवीसावा ॥२३॥

॥ प्रसंग २४ वा ॥

तरी आतां प्रहस्ता – वे (?) मानसी। तुळीन मेरू यैस्यासी। सरीखंडनी वानरा जीवीसीं। वुजीन सागराते ॥८०॥ आजी संग्रामी मारीन शत्रुते। जैसे कृत्ती मारीले रेणुकासुते। मग तया तेजळे सोनीते। xxxx प्रहस्त लावी ॥८१॥...जयावरी कृपा भगवंताची। तयासी रामकथारुची। अद्भुतासी नावडे प्रक्षा येथील। जैसे योगीया मीस्टाना॥८५॥

इतीश्री युध्येकांड रामायेणी कथा॥ जे स्रवण मेळवी प्रमार्थी॥ [हरी ?] दुखदारीद्रवेथा॥ कृस्णदास मुद्गळ म्हणे ॥८६॥ प्रसंगु चोवीसावा॥२४॥

॥ प्रसंग ५८ वा ॥

रुसीवागटीकेचा परमळु : जगी स्रोतयांसी करी सुकाळु : वीनवी कृस्णदासु मुद्गळू : देउणी सुढाळु: वुधी वायोचा (?) : ॥९६॥ : प्रसंगु ५८ ॥६॥

प्रस्तुत औंध प्रतीत लेखनकाल नमूद नसला तरी त्यातील शब्दविशेषांवरून तिचे प्राचीनत्व ध्यानात येते. या पोथीतील पुढील काही शब्दरूपे लक्षणीय वाटतात :– **युध्येकांड, योध्येकांड, यौध्येकांड, कृस्णदासु, कृस्णदास, मुद्गळ, मुद्गळु, ळोकोधरण, वाळमीकी, स्रवण, स्रोतयांसी, प्रस्ण.** **ल > ळ** आणि **श > स** या ध्वनिपरिवर्तनाकडे लक्ष वेधावेसे वाटते. हे हस्तलिखित प्राचीन असले तरी अत्यंत त्रुटित असून त्याची केवळ ५२ पृष्ठेच उपलब्ध झालेली आहेत. यातील मजकूर सलग आढळत नसल्यामुळे काही पाठभेदांपुरताच त्याचा उपयोग होण्यासारखा आहे. याहून अधिक महत्त्वाच्या अशा दुसऱ्या एका हस्तलिखिताचा परिचय आता करून द्यावयाचा आहे.

२) **मराठवाडा – प्रत.** मराठवाडा विद्यापीठाच्या संग्रहातील क्र. ४५२ चे हस्तलिखित संपूर्ण नसले तरी बरेच महत्त्वाचे वाटते. याचा लेखनकाल शके १५८४ आहे. एकूण पाच अप्रकाशित हस्तलिखित प्रतींचे अवलोकन करून प्रा. म. रा. जोशी यांनी असा निष्कर्ष काढला होता :– "या सर्व प्रतींपैकी तंजावर प्रतीचे लेखन शके १५८९ त वंगरूळ येथे झाले असून हीच प्रत प्राचीन आहे." [म. रा. जोशी, "कृष्णदास मुद्गल : एक अध्ययन", **मराठी संशोधन – पत्रिका,** मुंबई, एप्रिल १९७१, पृ. १००]. प्रा. जोशी यांचा लेख प्रसिद्ध झाल्यावर डॉ. तगारे यांनी त्यांच्या स्वत:च्या संग्रहातील एका 'चांगल्या' पण 'अज्ञात' राहिलेल्या प्रतीचा परिचय करून दिला आहे तो असा :–

"प्रस्तुत पोथी मला उंब्रज (ता.– कऱ्हाड, जि. सातारा) येथील सुप्रसिद्ध सावकार शिराळकर यांच्या घराण्यातून मिळाली. हे घराणे शिवकालापासून तेथे असल्याचे सांगतात. ही पोथी डोमगाव (कल्याण स्वामीचे) येथे लिहिली गेली असे पोथीलेखक म्हणतो:

वृशा नामसंवत्छ(त्स)रीं। आस्वीन शुद्ध नवमीवरी दशमीयां मंगळवारी। समाप्त जालें ॥१॥

पोथीचा समारोप वर दिला आहेच. मजजवळ कानू पिल्लेजंत्री वा तत्सम जंत्री नसल्यामुळे मी पोथी लेखनाचा काळ इसवी सनांत दिला नाही. ८१ प्रसंग व ८३८ पृष्ठे असलेल्या या ग्रंथाची ओवीसंख्या ९०२२

भरते." [ग. वा. तगारे, "कृष्णदास मुद्गल – 'युद्धकांड रामायण'", मराठी संशोधन – पत्रिका, मुंबई, ऑक्टोबर १९७२, पृ. २६ – २७.]

डॉ. तगारे हे आपल्या लेखात पुढे लिहितात, "पोथ्यांतील प्रत्येक प्रसंगात ओवीसंख्या किती आहे यावरून ग्रंथसंहितेच्या परंपरा निश्चित करता येणे कठिण आहे ..वस्तुत: पाठतुलना करून काढलेले निष्कर्ष अधिक विश्वसनीय असतात. तथापि वरील तौलनिक कोष्टक उद्बोधक वाटेल. माझ्याजवळील प्रतीतील एकूण ओवीसंख्या (९०२२) ही समर्थमंदिर क्रमांक ३४२ (लेखनशक १६४८) या पोथीच्या एकूण ओवीसंख्येच्या (९०४३) जवळपास येते हे लक्षणीय आहे." [पृ. ३१]. डॉ. तगारे यांची प्रत ही समर्थमंदिर, धुळे येथील लेखन शक १६४८ असलेल्या प्रतीशी जवळचे नाते सांगणारी आहे, असा या एकंदर विवेचनाचा निष्कर्ष आहे. म्हणजे, आतापर्यंत उपलब्ध झालेल्या हस्तलिखितांपैकी मराठवाडा – प्रत (लेखन शक १५८४) हीच प्राचीनतम मानावी लागते, यात काही शंका नाही.

या मराठवाडा – हस्तलिखिताच्या प्रत्येक पृष्ठावर १० ते ११ ओळी असून प्रत्येक ओळीत जवळजवळ तेवढेच शब्द आहेत. या प्रतीतील एकंदर 'प्रसंगां'ची संख्या ६० असून त्यांपैकी काही प्रसंग त्रुटित तर काही 'प्रसंगां'ची सगळीच पाने गहाळ झालेली असल्याने एकंदर ओवीसंख्या निश्चित करणे शक्य होत नाही. प्रस्तुत प्रतीच्या लेखनकालाचा आणि प्रतलेखकाचा निर्देश शेवटच्या म्हणजे साठाव्या 'प्रसंगा'त आला आला आहे तो असा :–

"रावणवध समाप्त ॥ **शके १५८४** शुभकृत संवत्सर चैत्र शुध १ पिंगलोपनाम्ना **श्रीपतिरावस्य पुत्रेण त्र्यंबकेन** स्वहस्तेन लिखितं वांगी [ग्रा] मे स्वपुत्राय **रघुनाथावदत्तं** ॥ श्रीरामार्पणमस्तु."

'**प्रसंग १२**' मध्ये "शके १५८६ क्रोधी नाम संवत्सरे लिखितं" असा उल्लेख आढळतो. '**प्रसंग ५४**' मध्येही 'शके १५८६' आहे. तेव्हा शके १५८४ ते १५८६ (इ. स. १६६२ ते १६६४) च्या दरम्यान या प्रतीचे लेखन झाले असावे हे स्पष्ट होते. या प्रतीतील उपलब्ध 'प्रसंग' व त्यांची ओवीसंख्या यांची तपशीलवार माहिती पुढीलप्रमाणे आहे:–

प्रसंग		ओव्या
१	–	११७ (१६ पृष्ठे)
२	–	१७७
३	–	१२९
४	–	१ ते ४१ (अपूर्ण)
५	–	५० ते १०८ (अपूर्ण)
६	–	८९
७	–	१२८
८	–	८४
९	–	८९
१०	–	९५
११	–	९१
१२	–	११३
१३	–	११३
१४	–	१००
१५	–	१ ते ६ (अपूर्ण)
१६ ते ५२ पर्यंत		गहाळ
५३	–	१३ ते १३० (अपूर्ण)
५४	–	१६६
५५	–	१२८
५६	–	१ ते ९१ (अपूर्ण)
५७ व ५८		गहाळ
५९	–	९६ ते १०२ (अपूर्ण)
६०	–	१४६ (२२ पृष्ठे)

या पोथीतील काही लेखनविषयक वैशिष्ट्ये अशी आहेत :– 'ळ' च्या ऐवजी सर्वत्र 'ल' आढळतो. ड़ = द्र. प्रत्येक ओवीच्या प्रारंभीच्या तीन्ही चरणांच्या अखेरीस दंडाऐवजी पूर्णविरामाचे अखंड किंवा पोकळ चिन्ह० = । (दंड). विसर्गाच्या : या चिन्हाऐवजी 8 असे चिन्ह. मूळ हस्तलिखिताची कल्पना येण्यासाठी काही 'प्रसंगां' मधून निवडक भाग येथे सादर करतो.

प्रसंग १ ला

[श्री] गणेशायनम 8 ॥ श्रीसरस्वत्यैनम 8 ॥ प्रथमनमोजीतुजगणेंड्रा० चतुर्दशविद्यां [×] रत्नसमुड्रा० कृपाकरावीपूर्णचंड्रा कविचकोरासि १॥ तुझेंवर्णावियामह [त्वम ?] जनाही जीदीर्घमतित्व० करींपांआपुलेकृपेस्तव० सनाथकरावे २॥ सक [ळसुर] वरांसितुंमान्यु० नृत्येंसंतुष्टविलामहेशानु० सर्वसिधीदायकतनु० अनु [पम्य] तुझी ३॥ जैसासेंदुरेंमेरु-

डवरविला० कि संध्यारागुपश्चिमे अविर्भविला० नानापूर्वदिशेसउगवला० बालसूर्यहाजैसा ४।। तुंगजाननुपरिअतिसौंदर्य० उपमेउणेंभुवनत्रय० वामहस्तआणिपादहृदय० लंबोदरातुझें ५।। जैसेंदुग्धसमूद्रींधूतलेंपवित्र० तैसेप्रधानकेलेंश्वेतवस्त्र० अपूर्वकटिप्रदेशींशस्त्र० खगेंद्ररिपूचें मिरवतें ६।। येकदंताचीप्रभाजैसीपडे० तैसें चंद्रबिबा [उ]जियेडें० किमेघमंडलींननिवडे० प्रकाशुविद्युलतेचा ७।। बीजपूरदइक्षुदंड० विद्युच्चक्रनिजदंतखंड० उत्फुल्लपद्मपाशांकुश [चंड]० इतुके मिरवती ८।। परिसाकथाअतिसावधान० रम्यरामायणीमहागहन० युध्द कांडसर्वदोष [?] हन० चरित्ररघुनाथाचें ९।। तमनाशेउगवलेनिअर्कें० तृणकाष्टेंभस्म होतीपावकें० तैसेंतुझेनिनामेंयेकें० नानाविघ्नेंनाशती १०।। जरिदेवातुझेंस्तवनकरावें तरिहेगंगनगणवेस्वभावे० जलनिधीसिमाजन आरेभावें कवण न[डा] गडोहीं ११।। सोमासिघालिजेपल्लववारा० दर्पुणदाविजेदिनकरा० तृप्तकरावें क्षीरसागरा० कवणरसेंकरून १२।। ऐसीयाजीतुजचिंतामणी० वीनवोतसेंआरुषवाणी० उपजलियेमाझिये अंत8करणी० काव्यवृत्तिकरावी ऐसी १३।।

कवित्वचंद्रपोडशकली० म्यांमंदत्वअमावास्येतिइच्छिलावली० तरि स्फूर्तिबीजचीनव्हाली० मजदाखवावीचडोलां १४।। ऐसा सिध्दविनायकुनमिला० तेणेंपूर्णकलाउन्मेषु वाढविला० म्हणउनि वाचासिधुउचंबलला० नवरसींसर्वथा १५।। वैखरीआणि परापश्यंती० मध्यमाऐसीयाचारीयुक्ती० तयाचीस्वामीणी सरस्वती० नमिलीमावेंसाष्टांग १६।। अंवेकविमयूरांत मेघमाला० कुमुदहृदयचंद्रकला० प्रासादबीजमानसआला० निक्षेपींस्नेहाले १७।। तेंप्रेमजलेंवोलावत० उन्मेषअंकुरफुटत० उत्पलवृक्षाऐसेंवाढत० पल्लवनवर्णवेसुरंगे १८।। साहित्य सुमनाचें परिमल० तेथेंसुरस विवेकाचेंफल० आलियातृप्तहोतीकेवल० सर्वश्रोतेसज्जन १९।। समर्थतुंत्रोब्रह्मकुमरी० कायवर्णवेल तुझी थोरी० पिपीलिका हे शैलशिखरीं० कैसेनिवेधेल २०।। औदुंबर फलगर्भि[चा] प्राणी० तो सर्वथांनेणेब्रह्मांडमांडणी० तुंसर्वजगाचीस्वामिणी० मजवो [कं] सीजाणवसील २१।। जयाकारणेंहेंजैसें० स्वरूपधरीत आहेसितैसें० अक्षर [रूपतुं] वनितावेषें० अव्यक्तव्यक्ती आलीसी २२।। तुं ज्यास पाहसी कृपाकटाक्षीं० तो अंधु होयरत्नपरीक्षी० मूककरवि अतिसुलक्षी० काव्यरचना बोलविसी २३।। तरिआतांतुजज्ञानगंगे० तृषेले मन माझें वोलगे० कां तुझेनि प्रसादें भोगें० कवित्वसोहला २४।। अवधारीमाझेकरुणावचन० उत्कंठितजालें माझें मन० रामकथेचेपरमस्छान पावावयावेगें २५।।...

याच **'प्रसंग १'** मधील **भावे–प्रतीत न** आढळणाऱ्या व प्रस्तुत **मराठवाडा–प्रतीत** असलेल्या ओव्या ११२ ते ११६ पुढीलप्रमाणे आहेत:—

जेथे रामकथाचरित्रघोप० तेथे महापातकांचानाश० धर्मअर्थकाममोक्ष सावकास० वसती तेचस्छली ११२।। जन्मोजन्मींचेपुण्यअसेल० तरिच रामकथेसि मन लागेल० अभक्तांस संसारविषयीचीच हलहल० माझें माझेच म्हणतां ११३ ।। परिप्राणीयानेविचा[रे ? विहि]त० पुढे काय कामा येईल निश्चित० हेचि आचरावे परमसावध० जेणेंशरीरसौख्य पावे ११४ ।। वालतरुणवार्धक० हेंजैसेंजाते कालानुसारे क्षणिक० तैसेंचि लक्ष्मी उपभोगदायक० क्षणमात्रें नाशतें ११५ ।। ऐसाजाणोनियां निर्धार० पुण्याचा जेणे होय प्रकार० तोचि आचरावा विचार० सज्जनी निश्चयात्मक ११६ ।। इतिश्रीरामायणवाल्मीकीकृत० काव्ययुधकांडकथामृत० पुढेंश्रोतीं देउनियां चित्त० कृष्णदासमुद्गल म्हणे ११७ ।। प्रसंगु १ ।। छ ।।

।। प्रसंग २ रा ।।

यात ओवी क्र. ८ नंतर पुढील संस्कृत श्लोक आढळतात :—

यत्रयत्र रघुनाथकीर्तनं तत्रतत्रकृतमस्तकांजुलि ।।
वाष्पवारिपरिपूर्णलोचनं मारुतंनमतराक्षसांतकं ।। १ ।।
संसारसागरसमुत्तरणैकमंत्रं ब्रह्मादियोगिमुनिपूजितसिध्दमंत्रं० दारिद्र्यदु:खभयरोगविनाशमंत्रं वंदे महासुखकरं रघुनाथमंत्रं ।।१।। धन्यायोद्धारघुपतिनृप: साचमाताच धन्या धन्याधन्योवंशोरघुकुलभवो यत्र रामावतार: ।। धन्या वाणी कलिजनमुखे रामनामप्रपन्ना:० धन्योलोक: प्रतिदिनमनै: रामवृत्तंश्रृणोति ।।१।।

हे श्लोक नकलाकाराने मागाहून मूळ काव्यात घातले असावेत. या श्लोकांनंतर ओवी क्र. ९ पासून पुढचे ओवीबद्ध कथानक सुरू झाले आहे.

कविनाममुद्रेच्या दृष्टीने पुढील काही **'प्रसंगां'**-मध्ये आलेले निर्देश लक्ष वेधून घेतात :—

॥ प्रसंग ३ रा ॥

ऐसाअवसरूजालियांलंकनाथा० हृदई धरिली-विपरीत कथा० पुढीलकैसीवर्त्तिलीकथा० आइका श्रोते हो ॥ १२८ ॥ वाल्मीकवाणीअमृतवल्ली० वहुतांभाग्यें फलासि आली० ते हे रसवृत्तिसेवार्वाहिली० कृष्णदास लोल्या म्हणे ॥ १२९ ॥ प्रसंग ३.

॥ प्रसंग ४ था ॥

कपि म्हणती धन्यगाविभीषणा० येथुनि लंकेचा तुंचि राणा० हा सर्व रघुनाथचराणा० पासूनि प्रसादु ७॥ इतिश्रीयुत्धकांडकथामृतरामायण० पुढिल कथेसिसादर अ(?)व्यवधान० वाल्मीककाव्यवचन० कृष्णदास मुद्गलम्हणे १०८ ॥ छ

॥ प्रसंग १२ वा ॥

येथूनी संग्रामाचे मूल० युद्धकांड बोलिजे केवल०
वाल्मीकवाणीपीयूषकल्लोले० सुजनींसेवावीकर्णी ९ ॥ तोचिउछिष्टकाव्यरसु० कथिला मुद्गलकृष्णदासु० श्रोतीकरुनियां अवकाशु० सादरमनें द्यावीं १०॥ जेगृहीं रघुनाथकथापठण० दुखदारिद्रदिगंतीगमन० श्रवण करिता० सत्यजाणा ११॥ युद्धकाण्डकथा श्रवण करितां० कलह होय निश्चिता० ऐसेंदुर्जनीमनींभावितां० महा-रौरवनरक १२ ॥ रघुनाथचरित्रआइकणें० महापापाचें होयक्षालणें० पुत्रपौत्रसंपत्तिलाहणे० कथाश्रवणेंचहोय १३ ॥ शके १६८६ क्रोधी [नाम ?] संवत्सरे लिखितं० प्रसंगु १२ ॥ छ.

॥ प्रसंग ५४ वा ॥

श्रीरामचंद्राय नमः ॥छ याउपरिश्रोतींआक्षेपु केला० हनुमंत द्रोणागिरिघेउनिगेला० तैंभरतेंविंधोनि भूमीवरिपाडिला० हेनाहींरुषिरामायणीं १॥ वक्ता म्हणेजीतुम्हीवरेआइका० पाहावे हनुमंतनाटका० सहसाछलनाकरूनका० मरहाटे म्हणउनियां० २ ॥ हनुमंतें देखिलेंअनुभविलेंजितुकें० चतुरकाव्यकथिलें तितुके० आणि भविष्य बोलिले वाल्मीकें त्या रामाचें पूर्वी ३ ॥ काव्यनाटकीचा अर्थवादु० हनुमंतभरतसूर्यसंवादु० या प्रमेयाचा अनुवादु० कौतुकें केला पैंहो ४ ॥ वाल्मीक वदला नाहीं प्रमेय० ऐसेंआपणीयासिबोलो नये० शतकोटिरामायण काय० कोणें शोधुन पाहिलें ५ ॥ वाल्मीकेशतकोटिरामायण रचिलें० तेयेकशंकरेंच पाहिलें० मग तेभागत्रयकेलें० त्रैलोक्यपवित्राकारणें ६ ॥ .....हनुमंत तो अकरावा रुद्र० त्याचे कथेने जनांसमुखसर्वत्र० दिगंतासि जायपापआणिदरिद्र० हनुमंतकथाश्रवणें ६५ ॥ इति श्रीरामायणरुपि-निर्मित० युधकांडरामकथाअमृत० श्रवणकरावे सावधचित्त० सौख्य हो कृष्णदास मुद्गल म्हणे ६६ ॥ शके १५८६ ॥ श्रीराम ॥

प्रस्तुत 'प्रसंग ५४' मध्ये आलेले 'हनुमंत-नाटक', 'शतकोटि रामायण' इत्यादी निर्देश हे कृष्णदास मुद्गलाने वाल्मिकी रामायणाव्यतिरिक्त आणखी कोणकोणत्या ग्रंथांचा आधार घेतला होता त्याचेच द्योतक आहेत. प्रतलेखनाच्या दृष्टीने शेवटी आलेला 'शके १८८६' हा उल्लेखही लक्ष वेधून घेतो.

॥ प्रसंग ६० वा ॥

श्रीरामायनमः ॥ रामकथा परम पावन० श्रवण करावी महासावधान० जेणें होय दुखदारिद्र्याचे भंजन० हे सत्य वाल्मीक बोले १ ॥ रामरावणाचा परम कोपु० रामरावणाचा परमप्रतापु० रामरावणाचा संग्रामसंकल्पु० न भूतोनभविष्यति २ ॥ नाहीउपमाहलाहलविषा० नाही उपमा त्या कालपुरुषा० नाही उपमात्यापाताल-शेषा० जैसी पृर्थ्वीदेखिली ३ ॥ नाहीउपमारवि-मंडला० नाही उपमा वडवानला० नाहीउपमा सुवर्णा-चला० ज्याचेनि हामेरू ४॥ नाही उपमात्यामेघ-वृष्टि० नाही उपमा अवतार कूर्मदृष्टि० नाही उपमा वज्रायुध जेमुष्टी० मिरवते जेइंद्राचिये ५ ॥ नाही हो समुद्रासि उपमा० आणि उपमा नाहीत्या व्योमा० रामारावणाचिया संग्रामा० उपमा कोठेच नाही ६ ॥ ..... ऐसें रामकथाचरित्र० श्रवणें होय सुखसागर० महापातकांचा संहार० रामकृपेने होय० १४४ ॥ ज[यां]सि जन्मांतरीं असेल पुण्य० तयांसि रामकथे लागेल मन० तया पुण्यपर[त्र]साधन० होईल सत्य जाणा १४५॥ इतिश्रीरामायणरुपिनिर्मित० इतुकियाने युध[××] समाप्त० परि हेंसविस्तरश्रोते परिसोत० कृष्णदास मुद्गल म्हणे १४६ ॥ रावणवध समाप्तः ॥ [प्रसंग ६० ?]

शके १५८४ शुभकृतु संवत्सर चैत्र शुध १ पिंगलोपनाम्ना श्रीपतिरावस्य पुत्रेणत्र्यंबकेन ह-स्तेन लिखितं [वां]गी[ग्रा]मे स्वपुत्राय .ळे –पृ० १६ [व]दत्तं ॥ श्रीरामार्पणमस्तु० छ ॥ श्री

या 'प्रसंग ६०' मध्ये पोटस्थता कवीच्या आणि प्रतलेखक यांचे स्पष्ट उल्ले 'पाखराची गाणी'

यासंबंधीचा विशेष खुलासा वरती एका ठिकाणी आलाच आहे. प्रस्तुत हस्तलिखितात अनेक पृष्ठांवरील समासांमध्ये (मार्जिन) पुढील उल्लेख आढळतात :— 'युधकांड लोल्याचें रामायण.' 'युधकांड रामायण लोल्या.' 'रामायण युधकांड लोला.' 'कृष्णदास लोल्या म्हणे.' अहमदनगर जिल्ह्यातील शेवगांव तालुक्यात जे एक 'लोळेगाव' आहे त्याच्याशी या कृष्णदास मुद्गलाचा संबंध असण्याची शक्यता नाकारता येत नाही. [पाहा :— महाराष्ट्रातील खेडयांची व शहरांची वर्णक्रमी, संकलक : महाराष्ट्र जनगणना कार्यालय, मुंबई १९६५, विभाग १, पृ. २१३ व विभाग २, पृ. १०७]. माझ्या मार्गदर्शनाखाली, प्रा. सौ. चेतना दुरगकर या प्रस्तुत विषयाचा विशेष अभ्यास करीत असल्यामुळे तूर्त एवढेच पुरे.

टीचभर खळग्यांत . . .

टीचभर खळग्यांत –
सामावले अर्थशास्त्र
चाले उलथापालथ
अवघ्या जगांत सर्वत्र ! १

टीचभर खळग्यांत –
कामा जुंपला हा लोक
दिसती विविध क्षेत्रीं
कोणी राव, कोणी रंक ! २

टीचभर खळग्यांत –
सर्व शास्त्र आणि कला
नांदताहे नाना रूपें
पृथ्वीमोती ग्रहमाला ! ३

टीचभर खळग्यांत –
सूर्यतेज कोटकोट
तीक्ष्ण शब्दांच्या धारेंत
ग्रासलें एकेक राष्ट्र ! ४

टीचभर खळग्यांत –
नांदे सकळ ब्रह्माण्ड
जगताच्या कोनोकोनीं
चालताती सर्व छंद ! ५

— तु. ना. काटकर

मी

मी उभा–
दण्डकारण्यात : दक्षिणसन्मुख
उभा हिमालय पाठीशी घालून
तूणीरातून महाशक्त

मी उभा–
दिक्कालारण्यात : दक्षिणसन्मुख
वाऱ्याला पालाण घालीत हातांचे

मी उभा–
डोळयांच्या उजेडात
दक्षिणसन्मुख बघत
अशोक तळवटी : वृक्ष स्वत:चीच छाया गिळतांना
आणि अज्ञेय हात–
सावलीचा संस्कार उरकून घेतांना....

— राम देशमुख

आकाश / माती = ?

अक्षयकुमार म. काळे

'आकाश' भागीला 'माती' बरोबर केवळ एकच नव्हे तर अनेक प्रश्नचिन्हे घेऊन देवानंद गोरडे आज आपल्या काव्यसंग्रहासह एकत्रितपणे काव्यरसिकांसमोर उभे आहेत. या भागाकारातून अनुभवास आलेल्या दाहक वास्तवाचे प्रखर चटके त्यांच्या कवितेतून सतत जाणवतात. आकाश म्हणजे स्वप्ने व आकांक्षा, ज्याची प्रत्येक संवेदनाक्षम जीव आतुरतेने प्रतीक्षा करीत असतो. पण नेहमीची वास्तवाची माती याशी बंड करून उठते. या दोहोंचे भांडण युगायुगांपासून चालत आले आहे. त्यातून निर्माण होतात ती केवळ प्रश्नचिन्हे व तीही अशी की ज्यांची उत्तरे मन विस्कटून गेले, फाटून गेले तरी सापडत नाहीत.

अनेक प्रश्नचिन्हांचा गोंधळ तर या कवितासंग्रहात नाही ना असा प्रश्न कोणाही काव्यरसिकाला पडावा. एक गोष्ट खरी की देवानंद गोरडे यांची प्रतिभा मात्र या प्रश्नांची उत्तरे शोधण्यात मग्न झालेली आहे. वरवर जरी हा संग्रह चाळला तरी गोरडे यांची कविता सहजासहजी उमगणारी नाही हे लक्षात येते. ती मूलत: दुर्बोध आहे. पण दुर्बोध असली तरी टाकावू नाही. ती चटकन उमगत नसली तरी खिळवून ठेवते. आशयाचे तरंग एकामागोमाग एक रसिक मनात संक्रमित करीत जाते. तिच्यातील मुख्य प्रतिमा एकदा लक्षात आली की पुढची कविता फारशी दुर्बोध राहात नाही.

त्यांची कविता एका दीर्घ दु:खाचा हुंकार आहे. तो हुंकार अस्पष्ट आहे. अंत:करणाच्या अबोध स्पंदनातून निर्माण होणारा अस्पष्ट अनुभव इथे काव्यात्म पातळीवर उतरतो हा अनुभव अत्यंत तरल आणि संवेदनशील आहे. ही केवळ प्रेमनिराशा नाही. प्रारंभीच्या काही कविता विश्वातील विराट दु:खाच्या आंशिक आविष्कारातून निर्माण झाल्या आहेत.

> मोजक्या गंधश्वासाचे दाणे टिपतांना
> इथले सांजगर्भ संकेत
> गळून पडलेत

असे सुख हातून निसटले आहे. मात्र कवी 'त्रिलापाला लागणाऱ्या शिशिरझडीत कल्पपर्ण पडण्याची' वाट पाहतो आहे. नियतीशी प्रार्थिलेले हे प्रसाददान आहे. पण नशिबी येते ती पैलतरावरील 'कावळ्यांची कावकाव.' आणि त्यातून कुणाच्या तरी अस्ताची चाहूल लागते. सुख तर राहोच पण दु:खच अधिकाधिक दाट होऊ लागते. कवी त्यात बुडून जातो. मनाच्या अशा द्वंद्वात्मक अवस्थेत तितीक्षा, कंदील, सेतू, संदेश, चेतना इत्यादी कविता निर्माण झाल्या आहेत.

त्यांची कविता केवळ निराशेतच बुडून जाते असे नाही. आशावादाची प्रसादचिन्हेही त्यांच्या कवितेत दिसतात. निराशेतून उत्कट चैतन्याच्या साक्षात्काराचे दर्शन घेण्याचा ते प्रयत्न करतात. 'रक्तातल्या शिवेवरूनच परतून गेलेल्या गंधगीतांच्या थव्याचा ठाव' घेण्यात ते निमग्न झाले आहेत. जीवनातला काळोखरंग लपेटून घेणारी समजूतदार झाडे त्यांचे सोबती आहेत. आभासादाखलही रक्तमयी ठिपका दिसत नसताना कंदिलाच्या संगतीने तो पांथस्थ वाटचाल करतो आहे. पुरात वाहून गेलेल्या गावाच्या वसण्याचे स्वप्न पाहातो आहे.

> मलाही आता रक्तातून
> पूर्व सजवायला हवी नि
> निस्तब्ध पहुडलेली झाडे हलवून
> उडवून द्यायला हवीत पाखरे
> आभाळभर —पृ० १५

किंवा,

> ओंजळीत कुणाचे संवेदनभार सांभाळीत
> टिबाटिबानी सांधाविशी वाटते कस्तुरी ओळ —पृ० १६

अशा आशेतूनच एक प्रकारची तटस्थता कवीच्या अंगी आता बाणलेली आहे. म्हणून 'पाखराची गाणी'

व 'हिंस्र श्वापदांनी ठोकलेल्या आरोळ्या' कवीला सारख्याच वाटायला लागतात.

रूढार्थाने त्यांची प्रेमकविता प्रेमनिराशेची आहे. हुंदका, अस्त, दाद, निरोप, रूळ, स्वल्प, टिंब, पंथ-विराम, पंखपीस, आडोसा या एका मागोमाग छाप-लेल्या कविता त्यांच्या प्रेमकवितेच्या विकासाच्या खुणा व्यक्त करतात. प्रेमातील लपंडावाचे त्यात फारसे चित्रण नाही. तरी,—

मी प्रसन्न पहाटेच्या झुळकीसारखा
तुझ्याशी लगट करू लागतोय
तेव्हा तुझ्या गालावर, ओठावर
दिशा दरवळू लागतात
आणि केसांच्या आडोशाला
चेहरा दडवून बसली म्हणजे
हे काळोख सखी !
तू माझा अस्त स्वीकारलेला असतो काय ?—

अशी एखादीच कविता मनात घुसून बसते. पण पुढे मात्र मनाची ही उत्फुल्ल अवस्था टिकलेली नाही. त्यांच्या अनुभवविश्वाचे केंद्र केवळ प्रेमनिराशेतून जाणवणारी व्याकुळता झाले आहे. एका पंखहीन पक्षाची आर्तता त्यांच्या कवितेत जाणवत राहते. सारे बहार आपल्याबरोबर घेऊन सरत्या रात्रीसारखी ती निघून गेली आणि कवीजवळ राहिली ती आठवणीची निमूट चित्रे. हृदयात 'जोंधळ मन्थनी' सूर पेटविणारी प्रेयसी आता रक्तावर उठल्यासारखी वाटते तिची पाऊले अस्पष्ट होत जाणाऱ्या पाऊलवाटेसारखी पारखी झाली आहेत. तिच्या निरोपबोलीची सूर्य किरणे कवीला होरपळवू लागली आहेत.

तू : मी : दोन रूळ
नजरेचा कोन सांधून
सुसाट धावत सुटलेले
कितीही चालत गेलो तरीही
न जुळलेले, अंतर राखून — पृ० ४१

अशी खात्री आता त्याला पटवून देऊ लागली आहेत. मात्र त्या निराश रात्रीच्या प्रहराला साक्षी ठेवून कवी तिची प्रतीक्षा करतो आहे. त्या घनघोर निराशेतही आशेची धुगधुगती ज्योत अंतःकरणात जागवतो आहे. तिच्या प्रत्येक पत्रात पाठविलेल्या पंखातून आता संपूर्ण पक्ष्याची पिसे जमली असतील आणि आपण तर शुभ्र घळीत पंख झडलेल्या पांखरासारखे, ही भावना त्याला पोखरीत आहे. ती स्पंदने, त्या कविता, ते तिचे हाता-तले हात, ती चंद्रधून सगळे त्याला आठवू लागले आहे. आणि चंद्राकडे डोळे रुतवून पाहण्याची हिंमत तो गमावून बसला आहे.

प्रेमनिराशेतला हा अनुभव काळजाला भिडणारा आहे. त्यांच्या अनुभवाचे विश्व एककेंद्री असले व त्यात व्यामिश्रता नसली तरी अनुभव व्यक्त करण्याची पद्धत मात्र एकसुरी नाही. अनुभवातील सूर एकच असला तरी अभिव्यक्तीतील विविधता वाखाणण्यासारखी आहे.

देवानंद गोरडे यांच्या कवितेतून जाणवते ती त्यांची शब्दकळा. शब्दाच्या अर्थाची प्रखर जाणीव त्यांच्या मनाला झाली आहे. इतके मात्र खरे की, त्यांची शब्दकळा सहज नाही. ती अभ्यासाने, क्वचित प्रयासाने कमाविलेली आहे. पुष्कळदा आकर्षक शब्दांच्या नादी कवी वाहवत गेला आहे असे दिसते. काही ठिकाणी शब्द अपरिहार्यपणे न येता ओढून ताणून आणलेले दिसतात. त्या शब्दांचा मूळचा सुरेलपणा मात्र इथे खुपू लागतो व कविता अडल्यासारखी वाटते. शब्दांच्या या फसव्या जाळ्यातून जसजशी गोरडे यांची सुटका होईल तसतशी त्यांची कविता अधिकाधिक विकसित होत जाईल.

अधूनमधून आपल्या प्रेमविश्वाच्या बाहेरही त्यांची कविता डोकावू लागली आहे.

शेकोटीत भाजलेले पानगे
तिच्या पोटाची खळगी बुजवतात
—खळगी पोटालाच बुजगावते तेव्हा
तिचीच शेकोटी होते
मग त्यावर कुणीही पानगे भाजून घेतात —पृ० ४९

ही त्यांच्या कवितेतील नवी जाणीव आहे व ती त्यांच्या विकासाची दिशा दाखविते. देवानंद गोरडे त्यांच्या पहिल्या पण सकस संग्रहाने काव्यरसिकांमध्ये त्यांच्या बद्दलच्या अपेक्षा वाढल्या आहेत. त्यांच्या नव्या जाणि-वांचा विकास पुढे कसा होतो हे पाहण्यास रसिक उत्सुक असतील यात नवल नाही.

$\frac{\text{आकाश}}{\text{माती}} = ?$

कवी— देवानंद गोरडे

प्रकाशक— अभिनव साहित्य परिषद,

पो.—अंजनगाव सूर्जी जि.—अमरावती

अनुक्रमणिका

समुद्रधून

भारत सासणे

तिला वाटलं, आपल्या मनातलं कमळ शिल्लक आहे अजून. इतका काळ लोटला तरी ते तसंच टवटवीत आहे. प्रसन्न. कुणासाठी तरी जपून ठेवल्यासारखं... राखून ठेवल्यासारखं...इतका काळ लोटला तरी ? ...पीटर म्हणत असे, " तुझ्या छातीच्या आंत कुठेतरी कमळ असावं. अक्षय. सुंदर ..त्याचे सुगंधी उच्छ्वास तुझ्या श्वासांतून प्रकट होतात...केव्हातरी ते कमळ मी हुंगणार आहे, अंतरंग भरून जाईपर्यंत."...किती काळ लोटला ?...तिला वाटलं, नकोत त्या आठवणी. पीटरच्या. पूर्वायुष्याच्या...कसल्याच नकोत...

ती मागे खुर्चीवर रेललेली. तिनं दूरवर पाहिलं. समुद्रावर एक उदास जडशा राखीरंगाचे तवंग साचले होते. ह्या शिवाय काही नाही, आपलं, जिवाभावाचं म्हणावं असं काही नाही. रोजच असते तशी कठोर निळी क्षितिजरेषा...समुद्र आज परका वाटतोय. तो बोलत नाही आज. बोलवत नाही आज...सगळं कसं परकं वाटतंय...काही तरी हरवल्यासारखं...ती बसून राहिली.

तिला वाटलं, चारही वेदांचं सार सांगणारा समुद्रघोष कुठे हरवून गेला आज?...लाटा उसळत होत्या, पुन्हा परत जात होत्या. पण त्या समुद्रघोषांतून तीच ती परिचित, जीवघेणी, प्राणांना ओढ लावणारी समुद्रधून ऐकू येत नव्हती. ती व्याकुळली. तिला वाटलं, समुद्र रुसला. किती तरी वेळापासून ती तयारीने बसली होती. रोजच्या सारखी. व्हायोलीन अॅडजस्ट् केलं होतं. गज हाती धरला होता...रोज संध्याकाळी ती धून वाजू लागे. समुद्रगर्भातून येणारी. अंतरंगाला ओढ लावणारी ...पुकारणारी. ती कान देऊन ऐके. मग त्या स्वरांचा पाठलाग करी. व्हायोलीनवर तेच स्वर उतरवी... पुन्हा ऐके...पुन्हा स्वरांची नक्कल...एक प्रकारची बेहोषी चढायची. मन धुंद व्हायचं...सगळी सगळी दुःखे विसरल्यासारखं व्हायचं...मग तिला वाटे, आपण अजूनही सुंदर आहोत...तरुण आहोत, आणि ते जपून ठेवलेलं कमळ अजूनही अक्षय ताजं आहे...

क्वचित एखादा समुद्रपक्षी गच्चीला लगटून जाई. डोळ्यात प्राण आणून तिने वाट पाहिली. क्षितिजावर नजर ठरत नव्हती. सूर्य मावळला होता; कधीच. कुंचल्याने फटके मारावेत तसे शेवटचे रंग राखी समुद्रावर रेगाळत होते...इतकंच – फक्त इतकंच.

समुद्रधून आज ऐकू आली नाही. अंतरंगाला मोहिनी पडावी असं काही झालं नाही. ती व्हायोलिन घेऊन व्हीलचेअरवर बसून राहिली. संधिप्रकाश तिला वेढू लागला. किरमिजी रंगाची शेवटची दुनिया तिच्या डोळ्यात प्रतिबिंबित होत राहिली. तिला वाटलं, हाही दिवस वाया गेला. आजही पीटरचं पत्र आलं नाही...की आलं असेल ? पोस्टमनला या दिशेने वळताना पाहिलं होतं दुपारी. आपण नीलूला विचारलंच नाही आज. पण त्याचं तरी कां यावं पत्र ?...आणि किती दिवस तो निष्ठा बाळगून राहील ?...जन्मभर ?...पूर्वी येत असत त्याची पत्रे. दर आठवड्याला. झालं ते खूप वाईट झालं. तू धीराने घे...मी अमक्या तमक्या डॉक्टरांना लिहिणार आहे...सध्या येता येत नाही, वगैरे....मग ती पत्रेही कमी झाली. तिला वाटलं, ज्याच्यासाठी जगावं अशी साधनं एकएक करून निसटून जाताहेत. आणि आता ही हवीहवीशी वाटणारी, जिवाभावाची उन्मादक समुद्रधूनही राहिली नाही.. हरवून गेली. आणि कुणी जीव टाकावा अशा सुंदरही राहिलो नाहीत आपण...

त्या विचाराने दचकली. भ्याली. तिनं आपल्या शरीराकडे पाहिलं...फिकट पांढरी रोगट त्वचा, कृश हात...निळ्या शिरा सुद्धा उठून दिसताहेत...तिनं आपल्या बेडौल वक्षांकडे पाहिलं. पावलांकडे पाहिलं. ती तर कधीच वाळून गेली होती. पाय निर्जीव झाले होते....

अनुक्रमणिका

तिला वाटलं, खूप लांबून, पैलतटावरून आपण त्या शरीराकडे पहात आहोत. एकदम एकदम तिला भिती वाटू लागली. तिला वाटलं, ते शरीर आपलं नाही, कुणीतरी आपल्याला फसवलंय आणि या शरीरात कोंडून ठेवलंय...आपलं शरीर चोरून नेलंय... आपलं शरीर कसं कमळासारखं होतं. टवटवीत. पीटर म्हणत असे...

तिनं एकदम व्हीलचेअर गच्चीच्या दुसऱ्या टोकापर्यंत नेली. चाकांचा आवाज सुद्धा आता किती कुरूप येतोय...तिनं छातीभरून श्वास घेतला. आभाळ काळवंडायला लागलं होतं. वारे वहात होते... अर्जुनाच्या बाणासारखे तीक्ष्ण वारे प्राणांना भेदताहेत, याचं संस्कृतात भाषांतर कसं करायचं?...तिला शब्द आठवेनात, जुळेनात, ती चिडली...आपण संस्कृतातून एम. ए. उगाचच झालो. त्याचंही काही वाटत नाही आता...सगळी उत्कटताच संपलीय...किती वर्षापूर्वी आपण सुंदर होतो?...तरी सत्तावीस अठ्ठावीस वर्षे म्हणजे काही फार नाहीत. तिला वाटलं, नीलूला ओरडून हाक मारावी आणि तिला आरसा आणायला सांगावं...पहावं ते प्रशांत महासागरासारखे डोळे शिल्लक आहेत कां?...पीटरच तसं म्हणत असे. तो म्हणे...

आत्म्याच्या देठापासून थकून तिनं डोकं गच्चीच्या कठड्यावर टेकवलं.

मागे पावलं वाजली—नीलू आली असणार... कोण कुणासाठी इतकं करतं?...लहान वहीण झाली म्हणून काय झालं?...तिनं वळून पाहिलं. नीलूच होती. तिनं चहा आणला होता. डाव्या हातात औषधाची गोळी होती. तिनं पाहिलं, आणि ती दचकली. नीलू नटली सजली होती. ती सुंदर दिसत होती. प्रसन्न वाटत होती. तिनं ठेवणीतला पेहराव केला होता. अंतरातून उमलून आल्यासारखी ती टवटवीत वाटत होती....हिच्याही छातीत असेल कां कमळ?... आता किती तरी पीटर हिच्या भोवती रुंजी घालत असतील.

हळूहळू मत्सराच्या पाकळ्या उमलू लागल्या. ती अस्वस्थ झाली. चहाचे घोट घेत राहिली. नीलू चुळबुळत उभी होती. तिच्या मनात काहीतरी सांगायचं होतं. दोघीही मौन होत्या. कुणीच बोलत नव्हतं. वातावरणातला ताण जाणवत होता, फक्त समुद्रघोष ऐकू येत राहिला.

तिनं मान उचलली. ओठ उघडले. ती काही बोलणार इतक्यात नीलूच म्हणाली.

'आजही पत्र आलं नाही पीटरचं...' ती दचकली...इतका सवयीचा झालाय कां हा प्रश्न हिला?...

'पण पोस्टमन्

'हो! माझं पत्र आलंय!', ती नीलूकडे पहातच राहिली. संशय फडा काढू लागला.

'तुझं पत्र? कुणाचं?'

नीलू घटमळली.

'अग, एक निमंत्रण पत्रिका आहे...'

'कसली?'

'कॉलेजच्या माजी विद्यार्थी संघाने पाठवलीय. सिल्व्हर ज्युबिली नाही कां या वर्षी? कार्यक्रम आहे आज आठ वाजता...'

नीलूच्या चेहऱ्यावरचे रंग बदलत होते.

'जाणारेस कां?'

हा प्रश्नच अप्रस्तुत होता. नीलू तयार होऊन उभी होती समोर. नीलूनं उत्तर दिलं नाही. तिनं फक्त पदर घट्ट गुंडाळून घेतला. वाऱ्यावर केसांच्या बटा लहरत होत्या. नीलू थोड्या वेळाने ओशाळून म्हणाली,

'अग, मी ताईंना सगळं सांगून ठेवलंय...त्या करतील तुझं सगळं,...मला उशीर नाही व्हायचा परतायला...'

...आपण हिला इतकं डांबून ठेवलंय?... तिनं नीलूकडे पाहिलं. आपल्या आंत, मनांत पडझड झाल्यासारखं तिला वाटत राहिलं. तिनं एकदम नीलूचा हात घट्ट धरला.

म्हणाली,

'बैस...इथं खुर्चीवर...'

नीलू बसली. ती अस्वस्थ होती. घड्याळाकडे पहात होती. नीलूच्या अधिरतेचा तिला राग आला.

'निलू, खरं सांग!...मी दिसते सुंदर? तुझ्यासारखी?' नीलू गडबडली. 'दीदी...'

'खरं सांग !...दिसते ?'

नीलू काहीच बोलली नाही.

'कधीच चालू शकणार नाही मी ?...कधीच कुठल्या कार्यक्रमाला जाऊ शकणार नाही ?'

'दीदी, डॉक्टर म्हणत होते...'

'खोटं बोलत होते ते ! मी कधीच चालू शकणार नाही...पडझड झालेल्या इमारतीसारखी दिसतेय ना मी ?'

...नीलू हळूहळू कोमेजू लागली. तिच्या उत्साहावर विरजण पडल्यासारखं झालं. सूर्यफुलांच्या शेतातून रेंगाळणारा सूर्यप्रकाश निराशेने परतावा, आणि मागे अंधार उरावा, तसं तिच्या डोळ्यात झालं. ती नुसती गप्प बसून राहिली.

'पत्र तुला दुपारीच मिळालं, आणि कार्यक्रमाबद्दल लपवून ठेवलंस ना आतापर्यंत ?'

नीलू गप्प राहिली. तिला वाटलं, हात सोडवून घ्यावा आणि पळत सुटावं.

ती वाकून नीलूकडे पाहू लागली...किती सुंदर दिसतेय ही !...हिच्या छातीतलं, रक्तापलिकडचं कमळ कसं टवटवीत असेल...हिच्या सौंदर्याचा राग करतो कां आपण ?...तरी सुद्धा ती नीलूकडे रोखून पहात म्हणाली,

'तुझ्याकडे तो येत असतो तो कोण ?'

'क....कोण ?'

'तो भुऱ्या केसांचा, निळा टी शर्ट घालतो तो ?'

'तो डिसूझा...' नीलू चाचरली.

'कोण आहे तो !'

'केमिस्ट !'

'मग इथं काय तो औषध विकायला येतो ?'

नीलू निरिच्छेने ऐकत राहिली. ती पार कोमेजून गेली होती. सगळी उत्कटताच संपल्यासारखी वाटत होती. खालच्या अंधाराकडे ती एकाग्रपणे पहात राहिली. मनातलं आभाळ पार काळवंडून गेल्यासारखं तिला वाटलं.

नीलूचे दोन्ही हात तिने हातात घट्ट धरले.

'माझ्या औषधासाठी तिथंच जात होतीस तू ?'

'हं !'...नीलू हरवली.

'किती दिवसांपासून सुरू आहे हे ?'

'काय ?' नीलू चिडली.

मग कुणीच बोललं नाही. तिनं बोटे रुतविली नीलूच्या हातात. हळूहळू तिच्या डोक्यात प्रकाश पडू लागला. घटनांचे अर्थ उमलू लागले

'तो....डिसूझा येणार आहे ? त्याच्याबरोबर जाणारेस कार्यक्रमाला ?...'

नीलू काहीच बोलली नाही. ती दूर समुद्रावरच्या अंधाराकडे पहात राहिली. तिचं मौन बोलकं होतं.

तेवढ्यात खाली मोटारीचा आवाज होऊ लागला. दार उघडण्याचा आणि बंद करण्याचा आवाज आला. तिचा श्वासोच्छ्वास जोराने होऊ लागला.... आधार तुटल्यासारखं, एकटं राहिल्यासारखं तिला वाटलं. घनदाट अरण्यात एकटं हरवल्यासारखं तिला वाटलं. तिने नीलूचे हात घट्ट धरले. नीलू निरिच्छेने बसून होती.

खालच्या वाळूतून कुणी तरी चालू लागलं. मग डोअरबेल खणाणत राहिली.

आणि तेवढ्यात ती जिवाभावाची समुद्रधून फेसाळत, लहरत येऊ लागली...समुद्रगर्भातून, अज्ञाततून...आंतून येणारी, जीवघेणी !...ती बेभान झाली. तिच्या अंग प्रत्यंगातून जीवनलालसा सळसळू लागली...विकार जागे झाले...तिला पीटरच्या सहवासाचा गंध आठवू लागला...त्याचे ओठ आठवू लागले. स्पर्श आठवू लागला...तो म्हणत असे, 'ही समुद्रधून एक संदेश देतेय. ती म्हणतेय, प्रेमिकांनो, एकमेकांवर रागवू नका...जग फार सुंदर आहे !...

...तुझ्या सारखं !...माझ्या सारखं ?... या पावलासारखं ?'

ती बेभानपणे ती फेसाळणारी, लहरणारी, छळणारी समुद्रधून हुंगू लागली, पिऊ लागली....रक्तात भिनऊन घेऊ लागली. तिच्या अंतरंगातले कमळ त्या अज्ञात संगीताने डोलू लागले...रक्ताला भरती येऊ लागली...क्रूरपणे तिने नीलूचे हात घट्ट धरले.

डोअरबेल खणाणत राहिली, आणि अस्वस्थ करणारी, साद घालणारी ती समुद्रधून ऐकत दोघी सुन्न बसून राहिल्या.

□□□

यासाठी....शेवटचा दिस गोड व्हावा!

आशा खोत

मुलाला नोकरी लागून २ वर्षे झालीत. त्याच्या पहिल्या पगाराची साडी आता जुनाट वाटायला लागली. – त्याने दिवाळीत मद्रासी कर्णफुले आणली. आपण तीच वापरत आहोत. यंदा आपण त्याला म्हटले, "हे बघ, यंदा मला 'सून' आण!" काय योगायोग तरी, दाखवायला आलेल्या मुलींतली "ती" मुलगी आपणा सर्वांनाच आवडली.... बाकीच्या गोष्टी ठरवायचा शुभ दिवस ठरला... आणि आता यापुढे सतत हव्या असणाऱ्या शहाणपणाची, सहन-शीलतेची मुहूर्तमेढ आपल्याला रोवायची आहे...तो शुभ दिवसही तोच आहे. अजूनपर्यंत आपण आपले होतो, बोलत होतो, विसरत होतो, एकमेकांना पुरेपुरे ओळखून होतो. आपल्या घरांतल्या आपल्या जागा, आपले महत्व...कसं अबाधित होते! आता फरक होणार आहे. २०–२२ वर्ष, वेगळ्या कुटुंबात वाढलेली भोवतालच्या परिस्थितीनुसार व तिच्या स्वभावानुसार, जीवनाची स्वत:ची अशी एक धारणा करून घेतलेली, वैवाहिक जीवनात स्वत:चो स्वप्ने, खरी करू पहाणारी, अनेक अपेक्षा बाळगणारी, तरुण आकर्षक मुलगी, आपल्या कुटुंबांत समरस व्हायला येणार आहे. तिचे मुख्य आकर्षण आहे तिचा प्रिय पती, म्हणजे आपला लाडका मुलगा...व त्यालाही 'ती'चे फार आकर्षण आहे...तिचे स्वागत करायला तो केव्हांपासून तयार आहे!!

आपल्यावर आता फार मोठी जबाबदारी आहे, व आपल्या अजूनपर्यंतच्या चांगुलपणाला आव्हान आहे. ती लहान, अननुभवी, स्वप्नाळु आहे. आणि गमतीची व गंभीर वस्तुस्थिती अशी आहे की 'ती' तशी आहे हे तिला ठाऊकच नाही!!

आपण बाकीच्या गोष्टी ठरवायच्या; 'शुभ-दिवशी' जे म्हणणार आहात व जसे म्हणणार आहात ते सारे तिच्या कानावर जाणार आहे व त्याची प्रतिक्रिया घेऊनच ती आपल्या घरी येणार आहे...आपले घर तिला तिचे घर वाटेपर्यंत तिच्या प्रतिक्रिया एकांगी व तीव्र असणार म्हणून साखरी शब्दांत आपले म्हणणे शक्य तो 'ती'च केंद्रबिंदू ठेवून मांडायला हवे! आहे कठीण पण आता काही काळ सारेच कठीण आहे!..

विवाहसमारंभातही नातेवाईकांच्या भरीस पडून आपण आपले जितके महत्त्व वधूपक्षावर लादू तेवढंच आपले महत्व 'ती'च्या मनातून घसरणार आहे. आपल्या पक्षांतली मंडळी जेवढा शिष्टपणा, आगाऊपणा करतील, ते सारे आपल्यावर उलटणार आहे...म्हणून मधुरवर्तिनी, प्रियदर्शिनी व आपल्या पक्षावर विजयिनी असायला हवं!

'ती' सर्व समारंभ आटोपून, समारंभपूर्वक आपल्याकडे येईल... ती जरा बिचकत, पण आपला अंदाज घेत घेत येईल! प्रथम प्रथम, मोजकं, शांत, सरळच बोलेल पण आपली माणसं आपल्या भोवती असणार व आपण, त्यांची री ऽ ओढीत बोलणार... अशी परिस्थिती झाल्यास 'ती'चा अंदाज आपल्याला येणार नाही पण ती मात्र आपल्याला झकास समजून जाईल व आपल्या चुकांच्या 'नोटस्' घेईल! अगदी दूरदर्शीपणाने बोलायला हवे. "अमक्यातमक्याला श्रीमंत घराण्यातली मुलगी मिळाली खूप छान केले बाई त्यांनी – किंवा, आम्हाला नाही बाई असले काही चालत किंवा आवडत..." असले वाक्पटुत्व कटाक्षाने टाळायला हवं! – लक्षांत ठेवा, नवीनपणामुळे तिने जबरदस्तीचा शांतपणा स्वीकारला आहे. म्हणूनच तिचा मेंदू अधिक कार्यक्षम आहे. तो तुमची बोलणी, त्यातले भाव, सर्व टिपीत आहे व स्वत:चे त्यावर प्रतिक्रियात्मक शिक्के मारून 'फायली' तयार करीत आहे!...

काही दिवस जातात. आता मुलगा सून एकमेकां-जवळ जास्त मोकळेपणाने वागू लागली आहेत. घरांतही सूनबाई स्वत:चे स्थान निश्चितपणे तयार करीत आहे. एवढेच काय, घरकामांची आखणी 'ती'

करू पहात आहे ! संध्याकाळी 'ती'ला त्याच्याबरोबर रोज बाहेर फिरायला, सिनेमाला, नाटकाला, अगर कुणाकडे चहा फराळाला, जायचे आहे. अर्थात संध्याकाळचे काम आपल्यावर आहे. आपण मोठ्या, म्हणून सकाळचा स्वयंपाक मोठेपणाने आपणच करणे भाग आहे. ती थोडीफार मदत करते... इथेच धुसफूस व्हायचा लाल कंदील आहे. आपल्यालाच संभाळायचे आहे. आपल्याला स्पष्ट जाणीव हवी, या नव्या नवलाईत आपला मुलगा, बायकोचीच बाजू घेणार आहे... आपल्याला जोडप्याचा हेवा वाटतो आहे असाही सूर निघायचा संभव आहे. आपला तोल एकदा गेला की सावरणे कठीण होईल. नाटकाच्या तिसऱ्या अंकांतली परिस्थिती आहे. निर्णायक... चढती—

— मग काही दिवसांनी सून माहेरी जाते. तिची व त्याची एकमेकांना मोठीमोठी पत्रे येतात जातात... आपण कोणतीही टिकाटिप्पणी करायची नाही. कौतुकाचीच दृष्टी ठेवायची ! ती व तो याखेरीज त्यांच्या जीवनात महत्त्वाचे काहीच नाही हे नीट आकलन करून आपण आपल्यातच रहायचे म्हणजे असे की आपणच त्यांना आपल्या जीवनांतून अलगद दूर केले आहे असे मानायचे ! आपली चिडचीड व्हायला नको, स्वतःची प्रतिष्ठा भंग पावली असे वाटायला नको, म्हणून हाच उपाय आहे... हा खटाटोप आहे ! !

आता थोडयाच काळात आपल्याला स्पष्ट कळते की आपण 'आजी' होणार... स्वतःला आता हेही स्पष्ट कळवा की तो व ती यांचे जग आता बदलणार आहे, पुन्हा नव्याने ! डॉक्टर्स व केमिस्ट यांच्याकडे 'वाऱ्या' सुरू होणार आहेत, प्रकृतीची सतत तक्रार रहाणार आहे. घरात तर आता कामाच्या दृष्टीने फक्त 'आराम' असणार आहे... आपल्या गर्भारपणाची व तिच्या गर्भारपणाची. त्या दोन काळांची जराही भाषा बोलू नका ! कोणताही उपदेश अगर औषधाची अनावश्यकता, पैशांचा खर्च, सांगू नका. भावी नातवाच्या गोष्टी करा—'ती'ला कोणतेही काम सांगू नका... ही घडी सांभाळा, नाहीतर जन्मभर ऐकावे लागेल. त्याचे समर्थन कुणाला पटायचे नाही व उतारवयात तुम्हाला ते द्यायची ताकदही नसेल — त्यापेक्षा थोडे अधिक काम करा ! बाळंतपणासाठी 'ती' जरा लौकरच माहेरी जाईल. तुम्हाला यथा समय नातवंड होईल. जे होईल, तेच इष्ट व हवेसे होते हे म्हणायला चुकू नका ! बाळंतविडा व्यवस्थित करा... बाळ बाळंतीण लौकरच घरी येतील. आता तुमचा निवृत्तीचा काळ दाराशी ठोठावीत आहे, त्याला सामोरे जा ! बाळाला मानसशास्त्रानुसार व नवीन टेकनिकानुसार वाढवायचे आहे त्या दोघांच्या मनात. तुम्ही अगदी अलगद बाजूला व्हा ! बाळाचे तुम्हाला काऽही जमत नाही. अधूनमधून फक्त खेळवा ती म्हणाली तर — नसती हौस अगर स्वतःच्या ज्ञानाची प्रौढी दाखवणे म्हणजे स्वतःला अडकवणे व वाईटपणा घेणे आहे !

सूनबाईचे मत आपल्याबद्दल मुळीच वाईट नाही. तिला आता मोकळेपणे सांगा, आपल्याला पूर्वीप्रमाणे कामे होत नाहीत. 'ती'चा संसार आता 'ती'च छान रीतीने करील — लौकरच आपण दोघेही तीर्थयात्रेला जाणार आहोत व सूनबाई उत्तम व दक्ष गृहिणी असल्यामुळे ते शक्य आहे. वयाचा परिणाम तुम्हा दोघांना जाणवू लागला आहे. बाळाच्या आजोबांनाही आता स्मरण रहात नाही, बाजारहाटाची जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात अर्थ नाही. तुमच्या मुलाला व सुनेला, आपले हे पटणार आहे, कारण त्यांना आता शांतपणा, जबाबदारी समजू लागले आहे. — मुलाला वाटते आहे, आईचे हे वय भजन पूजन, प्रवचन, पुराणांचेच आहे...सूनबाईलाही वाटत आहे, आपल्या संसारात आपलेच महत्त्व हवे...आपलीच हुकूमत हवी, बाळाला जास्त प्रेम आपलेच हवे. तिच्या मनांत आता 'नवरा' नसून 'घर' व संसार आहे. प्रामुख्याने तुमची लुडबूड अनायासे टळत आहे ते बरेच आहे ! —चला, आता आपण आपले लक्ष एकदम काढून घेऊ ! भजनांची वही उघडू. पेटीवर जमते का वाजवायला तेही पाहू... संध्याकाळी देवळात जाऊ...एकप्रकारचे पेन्शन सुरू झाले आपले ! — मात्र हाही काळ गोड व्हावा असे मनापासून वाटत असेल तर यासाठी खटाटोप आहेच, पण तो खटाटोप वाटायला नको—

मुख्य म्हणजे जिभेला शांती शिकवायची ! सूनबाई जे अन्न शिजवते — जसे शिजवते तेच उपयुक्त व मधुर असते ! उपवास करायला हवेत.— ते वयाच्या दृष्टीने व प्रकृती दृष्टीने उपयुक्त असतात. उपवासाच्या दिवशी चमचमीत खाणे आपल्याला व सूनबाईलाही परवडत नाही ! कपडयाची आवड आता फक्त आवश्यकतेत मिसळून टाकायला हवी...जप अधिक करायला हवा व जप करायच्या वेळी कोणतीच दखल घ्यायची नाही याची प्रथम दखल हवी...प्रत्येक गोष्टीवर संयम हवा,

हे सारे.. यासाठी...

शेवटचा दिस गोड व्हावा !

● ● ●

अनुक्रमणिका

ज्ञानेश्वरीतील एक 'नवीन' ओवी

सुरेश म. डोळके

'युगवाणी'च्या 'श्रीज्ञानेश्वर – विशेषांका'त (डिसें. १९७५–जाने. १९७६) श्री. जयन्त बाळकृष्ण कुळकर्णी यांचे 'ज्ञानेश्वरीतील एक नवीन ओवी ?' हे टिपण प्रसिद्ध झाले आहे. यात श्री. कुळकर्णी यांनी, त्यांना ज्ञानेश्वरीच्या एका हस्तलिखित प्रतीत आढळलेली एक जास्तीची ओवी उद्धृत केली असून, 'या ओवीला अनन्यसाधारण महत्त्व आहे' असेही म्हटले आहे.

हे टिपण प्रसिद्ध केल्याबद्दल मी सुरुवातीलाच श्री. कुळकर्णी यांचे अभिनंदन करतो. कारण, आपल्याला आढळलेल्या एखाद्या ग्रंथातील वेगळा किंवा अधिक पाठ अभ्यासकांसमोर ठेवल्यानेच त्या पाठाची चर्चा होऊ शकते व चर्चा आणि चिकित्सा झाल्यानेच त्या पाठाची निश्चित्यनिश्चिती होऊ शकते. पाठान्तर नमूद करणे हा पाठचर्चेचा मूलाधार, ही पाठचिकित्सेची पहिली पायरी होय. म्हणून, एखाद्या ग्रंथात जी जी पाठान्तरे किंवा पाठाधिक्ये आढळतील ती ती चर्चेकरिता व चिकित्सेकरिता अभ्यासकांसमोर ठेवणे हाच त्या ग्रंथाची पाठनिश्चिती करण्याचा प्रारंभमार्ग होय. प्राचीन ग्रंथांच्या बाबतीत तर हे विशेष लागू पडते; –ज्ञानेश्वरी-सारख्या मराठी साहित्याचा मानबिंदू असलेल्या ग्रंथाच्या बाबतीत तर विशेषच !

ज्ञानेश्वरीची ज्ञानेश्वरांच्या हातची प्रत मिळणे शक्य नाही. काही संशोधकांनी त्यांना मिळालेल्या ज्ञानेश्वरीच्या हस्तलिखित प्रती फार जुन्या काळापर्यंत नेऊन पोचविल्या. राजवाड्यांनी तर आपली प्रत थेट ज्ञानेश्वरांच्याच काळापर्यंत नेऊन भिडविली. डॉ. हर्षे यांनीही आपली प्रत ज्ञानदेवांच्या काळापासून केवळ ६० वर्षांच्या अवधीत लिहिलेली आहे असा दावा मांडला. भारद्वाजांनीही आपल्याला मिळालेली प्रत अस्सल ज्ञानेश्वरीवरून लिहिलेली असावी असा तर्क लढविला होता. आपआपल्या प्रतींची प्राचीनता सिद्ध करताना त्या त्या संशोधकाच्या प्रतिपादनात आग्रह; अभिमान आणि अभिनिवेश यांचेही दर्शन घडले. त्यातून सिद्ध मात्र एवढेच झाले की ज्ञानेश्वरीचे कोणतेही एक हस्तलिखित ज्ञानदेवविरचित मूळ ज्ञानदेवीच्या जवळच काय, पण ज्ञानदेवीनंतर २५०–२७५ वर्षांच्या काळा-पर्यंतदेखील पोचू शकत नाही. आणि त्याबरोबरच हेही दिसून आले की ज्ञानेश्वरीची कोणतीही एक हस्त-लिखित वा मुद्रित प्रत सर्वत्र ज्ञानदेवीचे प्राचीनतम पाठ देऊ शकत नाही.

अशा स्थितीत, ज्ञानेश्वरीच्या जास्तीत जास्त हस्तलिखित प्रती मिळविणे व त्यांच्या पाठान्तरांची सर्व दृष्टींनी चर्चाचिकित्सा करून योग्यतम पाठांची निश्चिती करणे हाच ज्ञानेश्वरीची मूलस्थापना कर-ण्याचा एकमेव मार्ग ठरतो. ही प्रतिशोधिलेली संहिता ज्ञानदेवविरचित मूळ ज्ञानदेवीच्या शक्य तितक्या जवळ जाणारी असेल. ती जर ज्ञानदेवकालीन ठरली तर तिच्यावरून तत्कालीन अस्सल भाषा कळेल, आणि ज्ञानदेव व ज्ञानदेवी यांच्यासंबंधी निर्माण होणाऱ्या निरनिराळ्या प्रकारच्या प्रश्नांचा व शंकांचाही निरास होईल.

मुद्रणपूर्व काळात एकनाथांपासून तो गोपाळाश्रम-स्वामींपर्यंत, आणि मुद्रणोत्तर काळात माडगावकरां-पासून तो श्री. ना. बनहट्टी यांच्यापर्यंत अनेक संशोध-कांनी निरनिराळ्या प्रतींच्या आधारे ज्ञानदेवीचे पाठ-संशोधन व पाठचिकित्सा करून आपआपल्या प्रतिशुद्ध संहिता सिद्ध केल्या आहेत. पाठनोंदणी तर शके १७६७ साली पहिलीच जी मुद्रित आवृत्ती शिळाछापावर निघाली [प्रभाकर–प्रत] तेव्हापासूनच सुरू आहे. ज्ञान-देवीच्या सर्व अध्यायांची प्रतिशुद्ध संहिता सिद्ध होई-पर्यंत हे प्रयत्न सुरूच राहायला हवेत. म्हणूनच, श्री. कुळकर्णी यांनी त्यांना आढळलेल्या ज्ञानेश्वरीच्या हस्त-लिखित प्रतीची माहिती दिल्याबद्दल, व तिच्यात

असलेली जास्तीची ओवी सादर केल्याबद्दल, ते अभिनंदनास पात्र आहेत.

या ओवीची चर्चा व चिकित्सा करण्याचे प्रस्तुत लेखात योजले आहे.

ही चर्चा करताना श्री. कुळकर्णी यांना ज्ञानेश्वरीच्या ज्या हस्तलिखित पोथीत ही ओवी आढळली तिचा आधी विचार करू. श्री. कुळकर्णी लिहितात– 'माझे रहिमतपूरचे मित्र श्री. ह. भा. माने...त्यांच्या संग्रही असलेली हस्तलिखित ज्ञानेश्वरी प्रत म्हणजे सुमारे तीनशे वर्षांपूर्वीची आहे. सदर हस्तलिखित प्रतीचा शक १६७६ आहे. संवत्सर पिंगल असून चैत्र कृष्ण ८ सोमवार असा निर्देश आहे...'

यावरून, श्री. कुळकर्णी यांना मिळालेल्या ज्ञानेश्वरी – हस्तलिखितात शके १६७६, पिंगल संवत्सर, चैत्र कृष्ण ८ सोमवार हा कालनिर्देश असल्याचे स्पष्ट दिसते. पण, कोणत्याही जंत्रीनुसार शके १६७६ मध्ये 'पिंगल' संवत्सर येत नाही. 'भाव' संवत्सर येतो. भाव आणि पिंगल या संवत्सरांत ४३ वर्षांचे अंतर आहे. म्हणजे शके १६७६ च्या जवळपाससुद्धा पिंगल संवत्सर येत नाही. अर्थात, या हस्तलिखितातील शक–संवत्सरांचा उल्लेख चुकीचा आहे.

शके १६७६ मध्ये चैत्रकृष्ण ८ ला सोमवार मात्र बरोबर येतो. पण, संवत्सर चुकीचा असल्यामुळे शके १६७६ हे ग्राह्य मानता येत नाही.

शके १६७६ मध्ये लिहिण्यात आलेल्या पोथीला श्री. कुळकर्णी हे 'सुमारे तीनशे वर्षांपूर्वीची' कशी मानतात हेही आश्चर्यच आहे !

या ओवीसंबंधी श्री. कुळकर्णी लिहितात –"या हस्तलिखित प्रतीत पुढील एक जादा ओवी आढळली. ही ओवी अध्याय १० मध्ये असून तिचा क्रमांक ७४ आहे.

नभ अलिप्त सर्वासी । स्वये अलिप्त होणें नभासी ।
हेचि महाभूतांच्या माथेयासि । चढणे साचे ॥

ही ओवी प्रसिद्ध असलेल्या ज्ञानेश्वरीच्या कोणत्याही प्रतीत आढळत नाही...या ओवीला अनन्यसाधारण महत्त्व आहे."

प्रसिद्ध असलेल्या ज्ञानेश्वरीच्या प्रतीत ही ओवी आढळते की नाही याचा नंतर विचार करू. आधी हस्तलिखित प्रतींचा पडताळा पाहू.

माझ्याजवळ 'ज्ञानदेवी'ची एक हस्तलिखित पोथी आहे. तिच्यात पुढीलप्रमाणे कालनिर्देश आहे – 'शकें १६९२ विकृतिनाम संवत्सरे आषाढ शुक्ल दशम्यां शशिवासरे स्वातिनक्षत्रे सिद्धियोगे...इदं ज्ञानदेव्यालेखनं ..समाप्तं अगमत ॥' यातील शक – संवत्सर– तिथी – वार हे सर्व उल्लेख बरोबर जुळत असून इंग्रजी कालगणने प्रमाणे २ जुलै १७७० हा या हस्तलिखिताचा समाप्तिकाळ ठरतो.

या हस्तलिखितात १० व्या अध्यायात पुढील ओवी आहे –

नभ अलिप्त सर्वांसि ॥ स्वयें अलिप्त होणें नभासि ॥
तेंचि महाभूतांचा (च्या ?) माथयासि ॥
चढणें साच ॥७४॥

ही ओवी मूळ संहितेत लिहिलेली नसून 'प्रवर्त्तेलाहि...माथयावरि ॥' या ओवीच्या ७३ या आकड्यापूर्वी व 'माथयावरि' या शब्दानंतर √अशी खूण करून; खालच्या कोन्या जागेत नंतर लिहिण्यात आली आहे. मूळ संहितेत 'यो मामजं...प्रमुच्यते' या गीताश्लोकानंतर (१०–३) लगेच 'तेथ राहोनि ठायेंठिकें ॥ स्वप्रकाशें चोखें ॥ अजत्व माझें देखे ॥ आपुला डोळां ॥' ही ओवी लिहिण्यात आलेली आहे व तिला, संहितेतील ओव्यांच्या पूर्वोत्तरक्रमानुसार, ७४ हा क्रमांकही बरोबर दिलेला आहे. पण, ७३ व्या ओवीनंतर, बाजूच्या जागेत का होईना, 'नभ अलिप्त...चढणें साच' ही ओवी लिहिण्यात आल्यामुळे तिलाही ७४ हाच क्रमांक देण्यात आला आहे. त्यामुळे झाले असे की ७४ हा क्रमांक दोन ओव्यांना मिळाला आहे. एक संहितेतील मूळ ओवीला, व दुसरा नंतर लिहिण्यात आलेल्या या ओवीला. यावरून, संहिता लिहून झाल्यानंतर ही ओवी जास्तीची लिहिण्यात आली हे स्पष्ट दिसते. संहितेतल्या ओव्यांतील प्रत्येक चरणाला समाप्तीनंतर लाल शाईत उभे दंड देण्यात आलेले आहेत. या ओवीत मात्र चरणसमाप्तीनंतर काळयाच शाईत – म्हणजे ज्या शाईत ओवी लिहिलेली आहे त्याच शाईत – उभे दंड दिलेले आहेत. यावरूनही, ही ओवी मूळ संहितेत नव्हती, ती नंतर लिहिण्यात आली, हे उघड आहे.

म्हणजे हस्तलिखिताच्या दृष्टीने ही ओवी नवीन नाही. आणखी शोध केल्यास एखाददुसऱ्या हस्तलिखितात ही ओवी सापडूही शकेल.

'ही ओवी प्रसिद्ध असलेल्या ज्ञानेश्वरीच्या कोणत्याही प्रतीत आढळत नाही' असे श्री. कुळकर्णी म्हणतात. पण, त्यांनी प्रसिद्ध असलेल्या सर्व ज्ञानेश्वऱ्या जर पाहिल्या असत्या तर त्यांना असे विधान करता आले नसते. कुंट्यांच्या ज्ञानेश्वरीत ही ओवी आहे[१]. ती अशी–

'नभ अलिप्त सर्वांसी। स्वयें अलिप्त होणें नभासी। हेंचि महाभूतांचिया माथयासी। चढणें साचें ।। ७३ ।।'

कुंट्यांनी ही ओवी तळटीपेत दिली आहे. टीपांतील मजकुराबद्दल कुंटे म्हणतात– 'ज्ञानेश्वरीच्या कांहीं हस्तलिखित प्रती मिळाल्या त्यांवरून निघालेलीं पाठांतरें व अधिक ओंव्या मिळाल्या त्या टीपांवर निरनिराळया स्वतंत्र देऊन पाठांतरेंही दिलीं आहेत.'[२]

म्हणजे कुंट्यांना ज्ञानेश्वरीच्या हस्तलिखित प्रतीत ही ओवी आढळली, पण ती 'अधिक' आहे असे त्यांना वाटले व म्हणून त्यांनी तिचा अंतर्भाव आपल्या संहितेत केला नाही. या ओवीच्या क्रमांकाच्याही बाबतीत, मी वर ज्या हस्तलिखितात ही ओवी असल्याचे दाखविले आहे तशीच – म्हणणे एकच क्रमांक दोन ओव्यांना देण्याची – स्थिती आहे. कुंटे–प्रतीत 'प्रवर्तलाही... माथयावरी' या संहितेतील ओवीला ७३ क्रमांक असून, 'नभ... साचें' या टीपेतील ओवीलाही ७३ हाच क्रमांक आहे. म्हणजे वरील हस्तलिखितातल्याप्रमाणे येथेही एकच क्रमांक दोन ओव्यांना आहे. फरक इतकाच की हस्तलिखितात ही ओवी 'प्रवर्त्तलाही...' या ओवीच्या नंतर दर्शविली आहे, तर कुंट्यांनी ती 'प्रवर्तलाही...' या ओवीच्या आधी असल्याचे चिन्ह केले आहे.

विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी निबंधमालेत रावजी श्रीधर गोंधळेकर यांच्या 'जगद्धितेच्छु' छापखान्यात छापलेल्या 'ज्ञानेश्वरीपरिभाषे'वर अभिप्राय लिहिला आहे. त्यात त्यांनी आपल्याला मिळालेल्या ज्ञानेश्वरीच्या एका हस्तलिखितात गोंधळेकर–प्रतीपेक्षा ४६० ओव्या जास्त असल्याचे सांगितले आहे.[३] त्यात ही ओवी होती का, हे समजण्याला मार्ग नाही. पण, ज्या ग्रंथावर चिपळूणकरांनी अभिप्राय लिहिला त्या ज्ञानेश्वरीपरिभाषेत ७० ते ७४ या प्रत्येक ओवीतील एकेका कठीण शब्दाचा अर्थ दिलेला आहे त्यात या ओवीतील एकाही शब्दाचा अर्थ दिलेला नाही.[४] यावरून, ज्या ज्ञानेश्वरीच्या आधारे ही परिभाषा तयार करण्यात आली त्या प्रतीत ही ओवी नसावी असे वाटते.

कुंट्यांच्या प्रतीप्रमाणे आणखी एका मुद्रित ज्ञानेश्वरीत ही ओवी आढळते. शके १७८६ मध्ये गणेश बापुजी शास्त्री मालवणकर यांनी मुंबई येथे शिळाप्रेसवर ज्ञानेश्वरी छापून प्रसिद्ध केली.[५] तिच्यात १० व्या अध्यायात ही ओवी आहे. ती अशी–'नभ अलिप्त सर्वांसीं ।। स्वयें अलिप्त होणें नभासी ।। हेंचि महाभूतांचिया माथयासी ।। चढणें साचें ।। ७३ ।।'

मालवणकरशास्त्र्यांच्या प्रतीतील या ओवीचे वैशिष्टय असे की त्यांनी ही ओवी जास्तीची म्हणून छापलेली नसून मूळ संहितेतच छापलेली आहे.

त्यांच्या प्रतीत या ओवीचा क्रम ७३ असून 'प्रवर्तलाही...' ही ओवी ७४ वी आहे. नंतर मात्र कुणीतरी ओवीक्रमांकावर गेरू फासून या ओवीचा मूळ क्रम खोडून तो ७४ असा केला आहे, व ७४ या ओवीला ७३ हा क्रमांक दिला आहे. त्यामुळे, आज ही प्रत पाहणाराला ७२, ७४, ७३ असे विचित्र ओवीक्रमांक दिसतात.

सारांश, 'ही ओवी प्रसिद्ध असलेल्या ज्ञानेश्वरीच्या कोणत्याही प्रतीत आढळत नाही' हे श्री. कुळकर्णी यांचे म्हणणे बरोबर नाही.

पण, हस्तलिखित व मुद्रित प्रतींच्या दृष्टीने नवीन नसलेली ही ओवी ज्ञानदेवविरचित मूळ ज्ञान-

---

१. श्रीज्ञानेश्वरी : संपा० – अण्णा मोरेश्वर कुंटे, षष्ठावृत्ती सन १९२३, पृ. २१३

२. कुंटे – ज्ञानेश्वरी, 'विनंति', पृ. ६.

३. 'निबंधमाला' : अंक ५१, नवीन पुस्तकें.

४. 'ज्ञानेश्वरीची परिभाषा', आवृत्ती २ री, ता. २८ सप्टेंबर सन १८९० (अ. १०–१)
[हा ग्रंथ आमचे मित्र प्रा. भा. श्री. परांजपे यांच्या कृपेने आम्हाला पहावयास मिळाला].

५. [ही प्रत आमचे मित्र प्रा. म. रा. जोशी यांच्या कृपेने आम्हाला पहावयास मिळाली].

देवीच्या दृष्टीने 'नवीन' आहे की काय, याचाही विचार केला पाहिजे. ज्ञानदेवांच्या मूळ ज्ञानदेवीत ही ओवी असेल का?

माझ्याजवळच्या हस्तलिखितात ही ओवी मूळ संहितेत नसून खालच्या कोन्या जागेत लिहिलेली आहे. कुंटेयांच्याही प्रतीत 'अधिक' ओवी म्हणून ती तळटीपेत नमूद झाली आहे. यावरून, या दोनही प्रतींच्या मूळसंहितेत ही ओवी नाही; हस्तलिखितात ती नंतर कुणीतरी बाजूच्या कोन्या जागेत लिहिली हे स्पष्ट दिसते. म्हणजे, या प्रतींच्या मूळसंहितेच्या दृष्टीने ही ओवी उत्तरकालीन आहे. प्रथम समासात आणि नंतर संहितेत या (नित्याच्या) क्रमाने मालवणकर–प्रतीत ती मूळ संहितेत प्रविष्ट झाली असावी.

पण, तिचा प्रवेश एवढ्यावरच थांबला. तिचे पाठप्रसरण झाले नाही.

समासात लिहिण्यात आलेले सर्वच प्रक्षिप्त असते असे एकांगी मत स्वीकारण्यात अर्थ नाही. प्रतलेखकाच्या हातून प्रत करताना मूळातला काही मजकूर गळू शकतो व तो किंवा त्यानंतरचा एखादा सुबुद्ध वाचक तो मजकूर समासात लिहून ठेवू शकतो. म्हणून एखाद्या वेळी तो लुप्तोपलब्धही असू शकतो. कधी हा मजकूर म्हणजे एखादा शब्द असेल किंवा कधी एखादी ओवीही असेल. असा मजकूर, तो समासात लिहिलेला आहे या एकाच कारणाने, मूळ संहितेच्या दृष्टीने उत्तरकालीन किंवा प्रक्षिप्त आहे असे मानणे योग्य नाही. भाषा, प्रयोजन, अर्थसंगती, संदर्भानुरोध, प्रवाहसामरस्य, रचना, औचित्य, लेखकाची वृत्ती इत्यादि कसोट्यांवर तो मजकूर तपासून पाहिला पाहिजे व जर तो या कसोट्यांवर उतरणार नाही तर मात्र मग प्रक्षिप्त मानला पाहिजे.

वरील ओवी मालवणकर–प्रतीखेरीज ज्या प्रतींत आढळते त्या प्रतींतील संहितेचा ती भाग नाही हे या ओवीच्या या प्रतींतील क्रमांकावरूनसुद्धा लक्षात येते. हस्तलिखित प्रतीत व कुंटेयांच्या आवृत्तीत तिला देण्यात आलेले क्रमांक हे पुनरुक्त आहेत. म्हणजे, ते मूळ संहितेतील ओवीक्रमांकाशी प्रवाहित झालेले नाहीत. अर्थात, येथे मूळातील ओवी गळली म्हणून ती लिहिण्यात आलेली नाही, तर मूळसंहितेव्यतिरिक्त जास्तीची ओवी आढळली म्हणून ती नमूद करण्यात आली आहे, – आणि तीही अलीकडच्या म्हणजे गेल्या सुमारे २२५ वर्षांतल्या तुरळक प्रतींत ! म्हणजे ज्ञानदेवीच्या मूळसंहितेच्या दृष्टीने या ओवीला अस्तित्व नाही.

आता अंतर्गत प्रमाणांच्या दृष्टीने या ओवीचे परीक्षण करू :

गीतेच्या १० व्या अध्यायातील 'न मे . . सर्वशः' या श्लोकावरील* ज्ञानदेवांचे प्रतिपादन चालू असता ही ओवी नमूद झाली आहे. 'माझे मूळ रूप कोण जाणेल?' हा ज्ञानदेवांच्या प्रतिपादनाचा विषय आहे. नमूद झालेल्या ओवीपूर्वीच्या २ व नंतरच्या ३ ओव्या पुढील अर्थाच्या आहेत :––

'असे असले तरी जो कदाचित् संसारात पुढे पाऊल टाकण्याचे सोडून सर्व इंद्रियांना पाठमोरा होतो (देहादि अनात्मतत्त्वांकडे जाणारी वृत्ती काढून ती अन्तर्मुख करतो), ।। ७२ ।।

इंद्रियांकडे (देहादि अनात्मतत्त्वांकडे) त्याची प्रवृत्ती झालीच तरी तेथून वेगाने मागे फिरतो आणि देहभाव मागे टाकून (विवेकाने त्यांचा निरास करून) पंचमहाभूतांच्याही (जो) माथ्यावर चढतो (पंचमहाभूतांवर विजय मिळवितो), ।। ७३ ।।

---

* 'गीतापदपदार्थबोधिनीप्रबोधचंद्रिका' नावाच्या एका हस्तलिखित पोथीत या श्लोकाचा पदपदार्थ पुढीलप्रमाणे दिला आहे :–

'सुरगणाः । देवसमूह जे ते ।। मे । माझा ।। प्रभवं । महिमा जो त्यातें ।।
न विदुः । नाहि जाणत ।। महर्षयः । भृग्वदि महर्षी जे ते ।। न ।। नाहि जाणत ।।
अहं । मी जो तो ।। देवानां । देव जे त्याचा ।। सर्वशः । सर्वही ।। महर्षीणां च ।
महर्षी जे त्यांचाही ।। निश्चये करून । आदिः । कारण होय ।। २ छ'

[आकाश हे सर्वांहून अलिप्त (= अलग) असते, पण स्वतः आकाशापासूनही अलिप्त असणे हेच पंचमहाभूतांच्या माथ्यावर चढणे होय].[६]

(व) तेथे नीट स्थिर राहून (जो) निर्मळ आत्मप्रकाशाने माझे जन्मराहित्य आपल्या डोळ्यांनी पाहतो (आत्मज्ञानाने माझे अजत्व जाणतो), ॥७४॥

मी आरंभाच्याही पलीकडला (अनादि) आहे व सर्व लोकांचा मुख्य ईश्वर आहे, अशा मला जो पुरुष याप्रमाणे जाणतो, ॥७५॥*

तो (पुरुष) पाषाणांत परीस जसा श्रेष्ठ किंवा सर्व रसांत अमृत जसे श्रेष्ठ त्याप्रमाणे (तो) (मनुष्यांत (मनुष्याच्या आकाराने असलेला) माझाच अंश आहे, असे समज.' ॥७६॥

वरील अर्थावरून लक्षात येईल की, कुंट्यांच्या प्रतीप्रमाणे, ७२ व्या ओवीत सुरू झालेले विधान ७६ व्या ओवीत पूर्ण होते. 'जो' या सर्वनामापासून सुरू झालेला भाव 'तो' या सर्वनामापासून सुरू झालेल्या वाक्यात बरोबर संपतो. 'जो. . .जाणतो' हे विशेषणवाक्य 'तो' या उद्देश्याचे विस्तारक आहे. विशेषणवाक्याचा व प्रधानवाक्याचा संबंध 'जो' हे संबंधी सर्वनाम व 'तो' हे दर्शक सर्वनाम यांनी बरोबर जोडण्यात आलेला आहे. व्याकरणाच्या दृष्टीने ही रचना शुद्ध आहे.

कोऱ्या जागेतील ओवीचा अर्थ व्यक्त करणारे वाक्य [चौकोनी कंसात दिलेले] 'जो. .जाणतो' या विशेषणवाक्यात बसत नाही. त्यात 'तो' या उद्देश्यासंबंधी काहीच सांगितलेले नाही, व त्याची धावही 'तो' या उद्देश्याकडे नाही. यातील क्रियापदही स्वतंत्र आहे. त्यामुळे ते स्वतंत्रच वाक्य ठरते, व विशेषणवाक्याच्या प्रवाहाशी ते समरस होत नाही. अर्थात, ही ओवी मध्येच येणे अन्वयाच्या दृष्टीने विसंगत, व रचनेच्या दृष्टीने विजातीय आहे. ज्ञानदेवांची रचना व्याकरणदृष्टया शुद्ध, अन्वयाच्या दृष्टीने नीटनेटकी असते. मध्येच लोंबकळत राहणारी ओवी त्यांनी लिहिली असणे शक्य नाही.

संदर्भाच्या दृष्टीने विचार केला तर ही ओवी संदर्भसंगत ठरत नाही. कारण, 'माझ्या' मूळ स्वरूपाचा थांग लागणे हे मोठमोठ्या ऋषींना, इतकेच नव्हे तर देवांनाही कसे अशक्य आहे याचे प्रतिपादन हा पूर्वीच्या विवेचनाचा ओघ आहे. असे असले तरी, 'मी आदिसीं पर। सकळलोकमहेश्वर' हे जाणण्याकरिता पुरुषाला काय केले पाहिजे हे सांगणे हा प्रस्तुत ओव्यांतील विषय आहे. या विषयाचे वाक्य ७२ व्या ओवीत सुरू होऊन ७६ व्या ओवीत संपले आहे. ते वाक्य सुरू झाल्यावर संपण्याच्या आधीच त्यात दुसरे स्वतंत्र विधान येणे अप्रयोजक वाटते. मागील-पुढील संदर्भाच्या दृष्टीने त्यात संगती नाही.

अर्थाच्या दृष्टीनेही ही ओवी सुसंगत नाही. पंचमहाभूतांच्या माथ्यावर चढणाऱ्याच्या ठिकाणी कोणकोणती योग्यता मिळविण्याची आवश्यकता आहे व असा पुरुष काय करतो हे सांगण्याच्या ओघात '. .हे महाभूतांच्या माथ्यावर चढणे होय' असे सामान्य विधान करण्यात काहीच स्वारस्य नाही. यात प्रस्तुतपोषकता नाही, प्रवाहसामरस्यही नाही.

शिवाय, या ओवीत पंचमहाभूतांच्या माथ्यावर चढणे म्हणजे काय हे सांगितले आहे. महाभूतांच्या माथ्यावर चढण्याकरिता पुरुषाच्या ठिकाणी कोणकोणते गुण आवश्यक आहेत व पंचमहाभूतांच्या माथ्यावर चढल्यानंतर असा पुरुष ज्ञानदृष्टीने काय पाहतो याचे प्रवाही प्रतिपादन चालू असता मध्येच '. .महाभूतांच्या माथ्यावर चढणे होय' हे सरळ व प्रत्यक्ष विधान करणे यात काव्य नाही. 'जो पंचमहाभूतांच्या माथ्यावर चढतो तो. .' यात काव्यमयता आहे. त्यातल्या काव्यध्वनीशी ही ओवी सुसंगत नाही. उलट, मूळकाव्यध्वनीचा विरस करणारी आहे. ज्ञानदेवांच्या अप्रतिहत कवित्वशैलीच्या दृष्टीने ते ध्वनिविघ्न आहे. ज्ञानदेवांची ज्ञानदेवीतली भूमिका कवीची आहे हे यत्किंचितही विसरता येत नाही.

शिवाय, या ओवीत पुनरुक्तिदोषही आहे. 'महाभूतांचिया चढे। माथ्यावरी' व 'महाभूतांच्या माथेयासि। चढणे साचे' अशी चरणांची पुनरुक्ति झालेली

६. हस्तलिखित पोथी, कुंटे-प्रत व मालवणकर-प्रत यांत या ओवीच्या स्थानाविषयी एकवाक्यता नाही. वरील अर्थात हस्तलिखितातल्याप्रमाणे ओवीचे स्थान स्वीकारले आहे.

* ही ओवी राजवाडे-प्रतीत नाही. ती लुप्तोपलब्ध आहे काय, याचाही विचार झाला पाहिजे.

आहे. ज्ञानदेवांनी त्याच त्या शब्द-चरणांची लगोलग अशी पुनरुक्ति केली असणे संभवनीय नाही. ही पुनरुक्ति कुण्यातरी प्रतकाराने केलेली आहे, – मूळ ओवीतील कल्पनेचे स्पष्टीकरण करण्यासाठी! मूळातील कल्पना स्पष्ट करण्याकरिता स्वतःचे शब्द किंवा ओव्या मूळ ज्ञानेश्वरीत अंतर्भूत करण्याचा – बुद्धिपुरस्सर पाठकल्पनाचा – प्रकार प्रतकारांनी केल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यातलाच हा एक प्रकार!

सारांश, निरनिराळ्या दृष्टींनी विचार केला तर ही प्रक्षिप्त ठरते. ती मूलस्थ नव्हे. ज्ञानदेवविरचित मूळ ज्ञानदेवीत ती असणे शक्य नाही.

– हस्तलिखित व मुद्रित ज्ञानेश्वरीच्या दृष्टीने ती नवीन नाही, पण मूळ ज्ञानदेवीच्या दृष्टीते मात्र ती 'नवीन' आहे खरीच!

॥ ॥ ॥

म्यूझियम!

एखाद्या पावसाळी अंधाराच्या रात्री
जीवन आतून भासते–
रिकामे–रिकामे!
'म्यूझियमच्या' प्रांगणातील
शोभेच्या तोफेसारखे
चैतन्याला संपूर्ण पारखे
गर्जनेचे दैवत शांत झालेले
अग्नीची आहुती गिळून शिळारूप बनलेले

–आत, मनाच्या दालनादालनात
नाना वस्तू – नाना प्राणी
निस्तेज नजरेच्या–
जुन्या आठवणींचा पेंढा भरलेले!
–मोकळ्या घाटमाथ्यावर, कोवळ्या उन्हातून
हे काचपेटीतील बंदिस्त वाघांसह
डरकाळी फोडीत धावतील काय कधी?
वाऱ्याची साथसंगत धरतील काय कधी?
सारेच कसे काचेत, सुरक्षित, बंदिस्त, सुस्त
पावलांना मातीचा स्पर्श नाही!
उन्हात धावण्याचा हर्ष नाही!
असे हे जीवन, – 'शोभेचे यंत्र' म्हणून
क्षणाक्षणांचे निरर्थ अर्घ्य देत
भिंतींच्या काचांकडे केविलवाणे पहात आहे:

–ही गुळगुळीत काच कधी दुभंगेल काय?
भिंतीवरून सूर्य खाली कधी उतरेल काय?

–वि. म. कुळकर्णी

'रसिक पत्रे'

शिक्षण, युवक सेवा व क्रीडा मंत्री
महाराष्ट्र शासन
सचिवालय, मुंबई ४०० ०३२
८ एप्रिल १९७६

श्री ज्ञानेश्वर सप्तजन्मशताब्दी वर्षात 'युगवाणी'चा श्री ज्ञानेश्वर विशेषांक प्रसिद्ध करून विदर्भ साहित्य संघाने औचित्य तर साधले आहेच परंतु श्री ज्ञानेश्वर विषयक साहित्यांत मोलाची भर घातली आहे. सर्वश्री श्री. ना. बनहट्टी, भा. पं. बहिरट, मधुकर रामदास जोशी, देवीसिंग चौहान, डॉ. गंगाधर मोरजे इ० नामवंत व अधिकारी लेखकांचे अभ्यासपूर्ण लेख या अंकात समाविष्ट केलेले आहेत. वैचारिक लेखांबरोबरच डॉ. मधुकर आष्टीकर यांची 'माझा ज्ञानियांचा राजा' ही तीन अंकी नाटिकाही या विशेषांकांत समाविष्ट केलेली आहे.

श्री ज्ञानेश्वरांचे कार्य व तत्वज्ञान याविषयी अभ्यासकांना उपयुक्त असे लेख असल्याने युगवाणीचा हा विशेषांक संग्राह्य झाला आहे.

—प्रभा राव

डॉ. आष्टीकर यांस सादर नमस्कार,

विदर्भ साहित्य सम्मेलनाच्या ३२ व्या अधिवेशनातील आपले भाषण वाचण्यात आले. "साहित्य म्हणजे सामाजिक चित्तशक्तीचे प्रत्ययकारी प्रस्फुरण" ही साहित्याची व्याख्या फार आवडली. ह्यातील प्रत्येक शब्दाची योजना केवळ अर्थपूर्णच नसून एखादा मोठा विषय किती थोडया शब्दात सांगता येतो, ह्याचे उत्कृष्ट उदाहरण होय. त्याचप्रमाणे नाटकाचीही. "त्रिविध रसनिर्मितीद्वारे जनमनावर अत्यंत प्रभावीपणे परिणाम करणारे साहित्य साधन." "साहित्यनिर्मिती केवळ परिचयातून नव्हे तर प्रत्ययातून होत असते." वगैरे अनेक तत्वांचा उल्लेख आपण समर्थपणे केला आहे. "वैयक्तिक स्तरावर काही अनुभूती लेखकाला येतहि असतील पण त्या सार्वजनिक समजून चितारणे इष्ट नाही." ह्या मताशी कुणीही समीक्षक सहमत व्हावा.

'मॉडर्न टच्' कंपूशाही करून 'बाईंडर' आणि 'गिधाडे' अशा नाटकांना प्रतिष्ठा मिळवून देणे वगैरे आपले कितीतरी उल्लेख हे कोणाहि नीतिमूल्याची कदर बाळगणाऱ्याला, सामाजिक संकेतांची बूज राखणाऱ्याला खचितच आवडतील. आपल्या भाषणावर आणखी कितीतरी लिहिण्यासारखे आहे, तथापि पत्राच्या मर्यादा लक्षात घेऊन इथंच थांबतो.

— स. ह. कुळकर्णी

रानडे रोड, ९९ शिवाजी पार्क, मुंबई

सा. न. वि. वि.

संपादक बदलल्यानंतर युगवाणीच्या ऊज्वल भवितव्याविषयी चिंतातूर होणाऱ्यात मीही एक होतो. परंतु अलिकडील युगवाणीचे अंक पहाता माझे मत बदलले आहे. समाधान होत आहे.

—प्रा. डॉ. वि. स. जोग

नागपूर

सप्रेम नमस्कार

ज्ञानेश्वर विशेषाङ्क अप्रतीम! वैदर्भीय अस्मिता राखून सर्वाङ्गसुंदर संपादनाबद्दल हार्दिक अभिनंदन! आमच्या स्नेहसम्मेलनात आपली रसिकप्रिय 'कावळ्याची शाळा' ही विनोदी एकांकिका झाली. या एकांकिकेने वस्तुस्थितीवर विदारक प्रकाश टाकला आहे. ही एकांकिका बी. ए. च्या अभ्यासक्रमात असल्याने शिकवतांना मोठी बहार येते. विद्यार्थी एकदम एकरूप होतात. खाचाखोचांशी सहमत होऊन हसतात. ४–५ तास कावळ्यासारखेच उडून गेलेत. 'माझा ज्ञानियांचा राजा' आधी हाती पडता तर ह्या वर्षीचे औचित्य ध्यानी घेऊन तीहि एकांकिका बसविण्याचा मानस होता. त्या एकांकिकेचे पुस्तक उपलब्ध नव्हते. आता तरी छापले काय? पाठवावे.

— प्रा. दि. वि. जोशी

जळगाव

अनुक्रमणिका

सादर नमस्कार,

ज्ञानेश्वर विशेषाङ्क आवडला. नवीन दृष्टिकोन ठेवूनहि कुठल्याहि प्रकारे प्रतिमाभंजन व सांस्कृतिक मोडतोड न करता, ज्ञानेश्वरमाऊलीचे तत्वज्ञान व इतर जीवनविषयक लिखाण आपण संपादित करून एक नवे साधले आहे. संपादनकौशल्याबद्दल मनस्वी अभिनंदन ! आपले ओवीबद्ध संपादकीय लाजवाब ! 'माझी ज्ञानीयांचा राजा' ही एकांकिका पुस्तकरूपाने उपलब्ध नव्हती ती आपण पुनर्मुद्रित करून रसिकांची सोय केलीत. इथे भाविक त्याचा प्रयोग बसवीत आहेत. आपले मानधन बुडणार नाही.

—सुधाकर बापट

संपादक "रत्नागिरी" पाक्षिक, देवगड (कोंकण)

अंकात अंक युगवाणीचा ज्ञानेश्वर विशेष अंक. अशी नवी म्हण मी करेन. लेख चोखंदळवृत्तीचे निदर्शक आहेत. आमच्या वडिलांना अंक फारच आवडला. आपली एकांकिकाही नव्या वातावरणाचे सुंदर प्रतिबिंब उमटवून जाते. ज्योतिबा हायस्कूलची मुले ही एकांकिका सुंदर करतात. मी परवाच प्रयोग पाहिला. तुमच्या संपादनाचे नवे अंग जाणवले. आपण नावाप्रमाणे अष्टपैलू आहात. नवे नाटक केव्हा देणार ? कादंबरीही द्यावी. आश्वासने जुनी आहेत. फक्त आठवण नव्याने.

—राजा सावंत

ताडदेव, मुंबई.

जय हिंद !

विदर्भ साहित्य संमेलनाच्या ३२ व्या अधिवेशनाच्या अध्यक्षाचे आपले भाषण मी वाचले; पुन: पुन: वाचले. मी मुलकी राजरस्त्यावर आल्यापासून गेली सुमारे ३० वर्षे साहित्य संमेलने आणि परिषदांच्या अध्यक्षांची भाषणे वाचीत आहे. परंतु आपल्या भाषणासारखे दुसरे एकही भाषण माझ्या वाचण्यात आलेले नाही. इतके मुद्देसूद, इतके प्रांजळ, साहित्याच्या प्रत्येक दालनाचा, प्रत्येक लेखक आणि लेखनप्रकाराचा आणि प्रवाहाचा इतका अद्ययावत, सडेतोड आणि मार्मिक आढावा घेणारे दुसरे एकही भाषण अजून पर्यंत झालेले नाही असे मी निर्धास्तपणे म्हणेन.

मला आपले भाषण समजले आणि उमजलेही. यापेक्षा अधिक लिहिण्याची आवश्यकता नसली, तरीही नव, दलित, क्लासिक, आणि मांगल्य – कमीत कमी इतक्या बाबतीतले आपले विचार सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहेत. ते आपण असे परखडपणे मांडले याचा माझ्यासारख्या 'हडेल हप्पी' माणसालाही आनंद होतो आहे. आणि तो आनंद आपणाजवळ प्रकट केल्यावाचून राहावत नाही.

युगवाणीचे संपादक या नात्याने मी आपणास कळवू इच्छितो की ताज्या अंकासारखा युगवाणीचा इतका सर्वांग सुंदर, उच्च अभिरुचीचा, भारदस्त, आणि मनोरंजक दुसरा अंक आजपर्यंत निघालेला नाही. युगवाणीच नव्हे तर सर्वच मासिकात हा अंक आपल्या सुंदरतेने उठून दिसणारा आहे. धन्यवाद !

—भा. त्र्यं. परांजपे

लेफ्टनंट कर्नल, नागपूर.

स. न.

महाराष्ट्रातील निरनिराळ्या साहित्य संस्था, त्यांची सुप्रसिद्ध मुखपत्रे व इतरही जबाबदार मराठी मासिके यांच्या वतीने विदर्भ साहित्य संघाच्या आपल्या 'युगवाणी 'ने फेब्रुवारी–मार्च ७६ चा महिला विशेषांक जाणीवपूर्वक प्रकाशित करून या कार्यात पुढाकार घेतला ही गोष्ट मला महत्वाची वाटते. अंक सुंदर आहे.

—प्रा. श्याम सोनारे, वरुड

गिधाडे

भेसूर मनोवृत्तींनी ग्रासलेलं वन
आणि भोवताली अनेक गिधाडे
त्यांचे दोन स्वार्थी, अस्थिर डोळे
आणि रक्तपिपासू चोच
रिचवून सुस्तावलेले पोट

अन् त्यांचे भेसूर समाधानी चित्कार
समोर असते भूतपूर्व सम्राटाचे
शोषित अस्थिपंजर...
विनामूल्य कलेवर

—सुभाष करबेलकर

मांढळ येथील उत्खनन

अजय मित्र शास्त्री

नागपूर जिल्हयाच्या उमरेड तालुक्यातील कुही विकास खंडात असलेले मांढळ हे एक गाव आहे. ते नागपूराहून सुमारे ४५ मैलावर आहे. प्राचीन काळात ते एक महत्वाचे स्थान असले पाहिजे.

सुमारे पावणेदोन वर्षापूर्वी वृक्षारोपणाकरिता खड्डे खणताना वनविभागाच्या लोकांना मांढळ जवळ असलेल्या भोला हुडकी नावाच्या टेकडीवर एका ठिकाणी तीन मूर्ती सापडल्या. गावातील काही पुढारी लोकांनी त्याबद्दल नागपूर विद्यापीठात माहिती दिली. ही माहिती मिळाल्यावर तावडतोब नागपूर विद्यापीठाच्या प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती व पुरातत्व विभागातील तज्ज्ञांनी मांढळला भेट दिली. परीक्षणान्ती त्या सुरेख मूर्ती शैव धर्माशी संबंधित असून शिल्प शैलीच्या दृष्टीने वाकाटक–गुप्तकालीन आहेत हे स्पष्ट झाले. त्यामुळे त्या मूर्ती गोंड कालीन आहेत असा नागपूरच्या कांही वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातमीवरून झालेला गैरसमज दूर झाला. त्या अनुषंगाने सभोवतालच्या परिसराचीही पुरातात्विक दृष्टीने चाचणी करण्यात आली आणि भोला हुडकी व मांढळ हा सगळा प्रदेश पुरातात्विक व ऐतिहासिक दृष्टया महत्वपूर्ण आहे हे लक्षात आले.

यंदा मार्च ते मे १९७६ च्या दरम्यान सुमारे सहा आठवडे विद्यापीठाच्या पुरातत्व विभागाने भोला हुडकी व मांढळ येथे उत्खनन केले. या उत्खननाद्वारे ह्या प्रदेशाच्या प्राचीन इतिहासावर महत्वाचा प्रकाश टाकण्यात आला. भोला हुडकी येथे झालेल्या उत्खननात एका विटांच्या वास्तूचे अवशेष मिळाले आणि एका ठिकाणी मुद्दाम खोदलेल्या खड्डयात अनेक सुरेख मूर्ती मिळाल्या. ह्या मूर्ती शैव आणि वैष्णव संप्रदायाशी संबद्ध आहेत. शैव मूर्तींची संख्या अधिक आहे. त्यामध्ये लकुलीश, दुर्गा, पार्वती, नैगमेष, बलराम इत्यादींचा समावेश असून शिल्पशैलीच्या दृष्टीने त्या वाकाटक-गुप्तकालीन आहेत. एवढया मोठया संख्येत मूर्ती मिळाल्यामुळे ही वास्तू एका प्राचीन देवळाची असावी असे वाटते. वास्तू वाकाटक–गुप्तकालीनच आहे ह्या निष्कर्षाला वास्तूमध्येच एके ठिकाणी सापडलेल्या तीन वाकाटक ताम्रपटांनी पुष्टी मिळाली हे तीन्ही ताम्रपट पूर्ण असून त्यांच्या कडया व मुद्रा सुरक्षित आहेत. त्यापैकी एक ताम्रपट द्वितीय प्रवरसेनाचा असून तो प्रवरपुराहून दिलेला आहे. पृथ्वीषेणाचा एक ताम्रपट रामगिरी स्थानावरून दिलेला आहे. आणि दुसरा बेण्णा तटस्थानाहून दिलेला आहे. पृथ्वीषेणाच्या ह्या दोन्ही ताम्रपटात ऋतुमिती दिलेली आहे, आणि पृथ्वीषेणाची मुद्रा प्रथमच मिळालेली आहे. ह्या सर्व गोष्टी ऐतिहासिक महत्वाच्या आहेत.

मांढळ गावाला लागून हुडकीच्या वाटेवर 'वऱ्हाडया' तलाव आहे. त्याच्या काठावर एका जागी उत्खनन केल्यानंतर आणखी एका विटाच्या भक्कम वास्तूचे अवशेष मिळाले. विटांचा आकार व वास्तूत सापडलेली खापरे यावरून ही वास्तु वाकाटक–गुप्तकालीन असावी असे वाटते. ही वास्तूदेखील एका देवळाची आहे असे वाटते. पण भोला हुडकी व तळयाजवळील ठिकाणांचे उत्खनन अजून अपूर्ण असल्यामुळे त्या वास्तूंच्या स्वरूपाविषयी सध्या नक्की काही सांगता येत नाही. पुढील सत्रात उत्खनन पूर्ण झाल्यावर त्याबद्दल निश्चितपणे सांगता येईल.

ह्याशिवाय गावात राष्ट्रीय विद्यालयाच्या परिसरात सातवाहन कालीन वसाहतीचे कांही अवशेष मिळाले त्यामध्ये विटांनी बांधलेली वर्तुळाकार कडयांची विहीर (Ringwell), कौलारे, मणी इत्यादी वस्तू मिळाल्या. ह्यावरून मांढळची प्राचीनता सातवाहन काळापर्यंत जाते हे निश्चित.

विद्यापीठाचा पुरातत्व विभाग पुढील वर्षीही मांढळ येथील आपले उत्खनन कार्य चालू ठेवील.

जगणे

जगणे :
सकाळचे, दुपारचे, संध्याकाळचे,
कातरवेळेचे–काकडारतीतले, सांजवातीतले.
जगणे :
गाभाऱ्यातले – पारावरचे – गल्ल्यांतले – छावणीतले.
गर्दीतले, एकटचाचे.
जगणे :
निरामय, निराकार – अष्टपैलू.
जगणे :
पावसाळ्यातले, ग्रीष्मदग्ध, लग्नदग्ध.
जगणे :
कुशीतले, ओटीतले, पोटातले – ओठातले
श्वासातले, वासातले – दु:श्वासातले !
जगणे :
'हि'च्यासाठीचे – 'ती'च्यासाठीचे.
जगणे :
कुरणातले – पाचोळ्यातले
डोहातले–रेताडातले.
जगणे : शिल्पाचे, कळ्यांचे.
जगणे : नात्याचे, सार्वजनिक – राष्ट्रीय वैश्विक.
पारदर्शक तसे काळेशार कातळी (नि 'अपार' दर्शक !)
जगणे :
सप्तपदीतल्या नि घटस्फोटाच्या पावित्र्याचे:
घरातले नि दिशातीत.
पायी जगणे. हवेतलेही.
गच्चीवरचे मोकळे.
गिरण्यांच्या गळचात दाटलेले. जगणे :
गाऊन घातलेले नि भिंगे लागलेले
पेरून वाट पाहलेले
वाट पाहून वैतागलेले
वैतागून – आणिक काय ? – वैतागलेलेच
जगणेच ते.
माझे.–तुझेही यात आलेच. किंवा आलेच नाही.
जगणे : विश्वरूपाचे – 'आय–दी क्राउड' चे.
आसवांचे आसवांचे. आठवांचे आठवांचे.
पीएल – ४८० – लालत्रिकोण – निर्देशांक
– माझ्यातले चिमूटभर लालित्य – इन्फिनिटी.
– हे जगणे.
सुश्राव्य – सुदीर्घ चुंबन
विदेही अपत्यासाठी – अगोचर समाधान.
वाटेवरचे पाय.
पायाखालची रक्ताळून थरारलेली वाट.
तिचे जगणे
.·. माझे. किंवा व्यत्यास याचा.
पापण्यांच्या काजळात रुतलेले हुंदके.
गळचाच्या देठावर
परमेश्वर नामक एका कल्पनारम्य कवीची
उमललेली टवटवीत पाकळी.
सावल्यांचे जग. अंधारातले जग.
जगताना अंधारलेले.
संधिप्रकाशातले सरते श्वास.
श्वास संपतानाचा संधिप्रकाश.
जगतानाचे जगणे
जगण्यासाठीच जगणे
जगणे संपल्यानंतरचे जगणे.
जगणे :
अवाढव्य – अवाढव्य !

–जनार्दन मुऱ्हेकर

कविता

शुभ्र हाडांचा पाऊस पडावा
तसे ते हसले
तेव्हा त्यांच्या पायाशी येऊन घोंघावत राहिले
पक्ष्यांचे समुद्र. चित्रविचित्र रंगांचे पक्षी

तू आपला असाच गेला असशील
ओठातून झुळझुळणारे
स्वच्छ शब्दांचे झरे घेऊन

आटेस्तोवर वाटले असतील झरे ज्याला त्याला
म्हणून तर तुझ्या मुशाफिरीत
खांद्यावरील काठीला टांगून ठेवलेल्या
पिंजऱ्यातील
पोपट मरून पडला
आणि विझून गेला
हातातला कदील.

—उत्तम कोळगावकर

कितीही मोडीत काढले जुने विचार

कितीही मोडीत काढले जुने विचार
तरी नव्याने पुन्हा ते येऊन थबकतात
राहतातच समोर ठामपणे जुने होत

वाटते....हातामधल्या दाढीच्या कातरीने
एकेक कातरावा विचार....पण आज
शनिवार....आज नको....जाऊ द्या उद्या
पाहू. नखे वगैरे शनिवारी कापू नयेत.
कापली तरी नखे ती नखेच. पुन्हा पुन्हा
वाढणारच ती. आणि कातरीला काय होतेय
लोखंडावर नखाचा ओरखडा थोडाच

उठणार आहे ? पण....आज नकोच. उद्या
पाहू. नाहीतरी विचार बिचार कापत ना
ओरखडा उठलाच मनावर कार्डीओग्रामच्या
नागमोडी रेषेसारखा – अशुभाचा कानोसा
कानात कोंवणारा तर.....तर....जाऊ द्या
उद्या पाहू. कितीही मोडीत काढले जुने विचार
तरी नव्याने पुन्हा ते येऊन थबकतातच
राहतात समोर ठामपणे अधिक जुने होत
नव्याने. वाटते हातामधल्या दाढीच्या कातरीने

—सुरेश मथुरे

दिवस

मंतरलेली पहाट
भूपाळीच्या तालावर
आपल्या वासराला घेऊन
नदी कांठी फिरत असते

नदीच्या लाटा आपली
चाल हळूच मंदावतात
आणि तिला दाखवितात
आपल्या जीवनातील सूख

सूर्याला आकाशात
त्याच वेळी जाग येते
आणि आकाशदीप मालवून
तो निघतो आपल्या कामावर
लगबगीने दिवसभर राबण्यासाठी

—देवकीनंदन सारस्वत

अनुक्रमणिका

'युगवाणी'च्या लेखकांस सूचना

'युगवाणी'कडे पुष्कळ साहित्य प्रकाशनासाठी येत असते, त्यात नवोदित व होतकरू लेखकांच्या साहित्याचे प्रमाण जास्त असते. विशेषतः या लेखकवर्गाने खालील सूचना अमलात आणल्यास, संपादनाच्या व मुद्रणाच्या दृष्टीने ते सोईचे होईल.

१. लेखन कागदाच्या एकाच बाजूने व योग्य समास सोडून केलेले असावे.

२. अक्षर सुवाच्य असावे, लपेटीदार किंवा चित्रमय अक्षरे काढताना मूळ अक्षर कोणते आहे, या विषयी संदेह उत्पन्न होऊ नये. विशेषतः कवींनी या बाबीकडे कटाक्षाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

३. साहित्यासोबत एका वेगळ्या कागदावर लेखकाचे पूर्ण नाव, संपूर्ण पत्ता व साहित्याचे शीर्षक असावे. शिवाय त्या त्या साहित्यावरही त्याचे शीर्षक आणि लेखकाचे नाव असावे. कवींनी एका पृष्ठावर एकच कविता लिहावी. त्या कवितेला शीर्षक व खाली कवीचे नाव द्यावे. कविता अस्वीकृत असल्यास कवितेची हस्तलिखित प्रत परत पाठविण्यात येत नाही.

४. लेखकाने आपल्या साहित्याची एक प्रत स्वतःजवळ ठेवावी. 'युगवाणी'ला पाठविलेली प्रत परत पाहिजे असल्यास पुरेसा डाकव्यय पाठवावा. परत पाठविलेले साहित्य पोस्टात गहाळ झाल्यास 'युगवाणी' जबाबदार राहणार नाही.

५. मराठी साहित्य महामंडळ-पुरस्कृत मराठीच्या नव्या लेखननियमांप्रमाणे 'युगवाणी' चे मुद्रण होत असते. त्या दृष्टीने लेखकांनी आपले लेखन एकवार तपासून दुरुस्त करून मगच पाठवावे.

६. लिहिण्याच्या घाईत किंवा लिहिताना होणाऱ्या विचारप्रक्रियेत काही शब्द, शब्दांचे गट किंवा काही प्रसंगी तर अर्धेअधिक वाक्यच सुटून गेलेले आहे, असे ऱ्याच ठिकाणी आढळून येते, व एकंदर वाक्याचा अर्थ लागत नाही. अशा ठिकाणी, अर्थानुरोधाने उद्दिष्ट शब्द किंवा शब्दसमूह काय असावे याचा तर्क करण्याची पाळी संपादकावर येते. तेव्हा या दृष्टीनेही लेखकांनी आपले लेखन स्वतःच एकवार काळजीपूर्वक वाचून वरील त्रुटी त्यात नाही याबद्दल स्वतःची खात्री करून घेऊन मगच ते 'युगवाणी'कडे पाठवावे.

७. लेखांमध्ये येणारी इतर ग्रंथांतील किंवा कोणत्याही साहित्यातील उद्धरणे, अवतरणे, संदर्भ हे मुळाप्रमाणे तपासून पाहिलेले असावेत. तसेच लेखाला तळटीपा असल्यास, त्यांचे परस्पर संबंधित क्रमांक मूळ लेखात व तळाशी बरोबर दिलेले आहेत, याची खात्री करून घ्यावी.

८. साहित्य स्वीकृत किंवा अस्वीकृत ठरविण्यास वेळ लागतो. म्हणून त्यासंबंधी पत्रव्यवहार करीत राहू नये ही विनंती. 'युगवाणी'च्या ज्या अंकात साहित्य प्रसिद्ध होते त्याची एक प्रत, व साहित्याची सुटी कात्रणे हे लेखकांकडे पाठविण्यात येतात.

लेखक-वर्गाने आजवर 'युगवाणी' ला बहुमोल सहकार्य दिलेले आहे. तरी वरील सूचनांचा लेखकवर्ग प्रेमभावाने आदर करून, उत्तरोत्तर अधिकाधिक सहकार्य देईल, अशी आशा आहे.

—संपादक

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त (२७ जानेवारी १९७६ ते १५ मार्च १९७६)

गो. स. देहाडराय, सरचिटणीस

१. कार्यालय व्यवस्थापन

१.१ कार्यकारी मंडळाची पंधरावी सभा दि. १८ एप्रिल ७६ ला झाली.

१.२ विश्वस्त मंडळ–सभा दि. ८–४–७६ ला झाली.

२. नाना जोग स्मृतिदिन

नाना जोग स्मृतिदिन दि. १ मे ७६ ला साजरा करण्यात आला. सकाळी ९ वाजता नाना जोग यांच्या अर्धपुतळ्याला संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे 'अनिल' यांनी पुष्पहार अर्पण केला. सायंकाळी ७ वाजता सुभाष मंडळ, नागपूर, या नाट्यसंस्थेने 'भूक अमर आहे' ही एकांकिका सादर केली व रात्री आठ वाजता कथाकथनाचा कार्यक्रम झाला. त्याचे संचालन प्रा. ज. रा. फणसाळकर यांनी केले. या कार्यक्रमात सर्वश्री प्रभाकर पुराणिक, दिनकर देशपांडे, वसंत चिंचाळकर, सौ. मालती निमखेडकर, सौ. कुंदा पारसनीस, सौ. शकुंतला जोग यांनी भाग घेतला. त्यांचा संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे यांनी सत्कार केला.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

दि. १४ एप्रिलला डॉ. आंबेडकर जयंती निमित्ताने त्यांच्या छायाचित्राला पुष्पमाला अर्पण करण्यात आली.

४. ज्ञानेश्वर सप्त शताब्दिनिमित्त परिचर्चा

श्री ज्ञानेश्वर सप्तशताब्दि महोत्सव समिती व वि. सा. संघ यांच्या विद्यमाने दि. ९–५–७६ ला गडकरी सभागृहात 'ज्ञानेश्वरांचा चिद्विलास' या विषयावर परिचर्चा आयोजित करण्यात आली. अध्यक्षस्थानी विधानपरिषदेचे सभापती आणि संतवाङ्मयाचे गाढे अभ्यासक श्री. वि. स. पागे होते. या परिचर्चेत डॉ. द. भि. कुळकर्णी, डॉ. श्री. भा. वर्णेकर, प्रा. म. रा. जोशी, श्री. आ. रा. देशपांडे 'अनिल', प्रा. श्री. मा. कुळकर्णी, प्रा. पिंपळापुरे, श्री. आष्टीकर वैद्य, डॉ. च. द्य. देशमुख, ॲडव्होकेट सदानंद पवनीकर, ॲडव्होकेट अ. रा. कुळकर्णी, श्री. ज्ञानेश्वर साधु या विद्वानांनी भाग घेतला. त्यांनी स्वतःला जाणवलेले ज्ञानेश्वरांचे वेगळेपण सांगितले. श्री. वि. स. पागे यांनी समारोप केला. सरचिटणीस श्री. गो. स. देहाडराय यांनी आभार मानले. सकाळी ९ वाजता सुरू झालेला हा कार्यक्रम दुपारी १२ वाजता संपला. श्रोत्यांची उपस्थिती चांगली होती.

५. शोकसभा

सुप्रसिद्ध लेखक, कवि आणि नाटककार श्री. चिं. त्र्यं. खानोलकर उर्फ आरती प्रभु यांचे अकाली निधन झाले. त्यांना श्रद्धांजलि वाहण्यासाठी वि. सा. संघाने दि. २८ मे ला शोकसभा

अनुक्रमणिका

आयोजित केली. डॉ. द. भि. कुळकर्णी, डॉ. सुनील सुभेदार, डॉ. ना. कृ. शनवारे व श्री. रमेश अंभईकर यांची भाषणे झाली. प्रा. भी. रा. जहागीरदार अध्यक्षस्थानी होते. त्यांनी शोकप्रदर्शक ठराव वाचून दाखविला आणि सर्वांनी उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली.

६. श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय

दि. ६ मे ला ज्ञानेश्वर वाङमयाचे प्रदर्शन भरविण्यात आले. प्रदर्शनाचे उद्घाटन विधान परिषदेचे सभापती श्री. वि. स. पागे यांनी केले.

एम्. ए. पार्ट १ व २ वर्गाच्या विद्यार्थ्यांना डॉ. मधुकरराव आष्टीकर, प्रा. अरुण वेलणकर व प्रा. तारा सावंगीकर यांनी अभ्यास विषयक मार्गदर्शन केले. त्याबद्दल श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय ऋणी आहे.

७. संगीत केंद्र (स्वरमंडळ)

नागपुरातील सुपरिचित गायक श्री. मधुसूदन भावे नागपूर सोडून औरंगाबाद येथे कायमचे वास्तव्यासाठी जात आहेत. त्या निमित्ताने दि. ८ मे ला गडकरी सभागृहात त्यांचा गायनाचा कार्यक्रम व सत्कार आयोजित करण्यात आला. संवाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे 'अनिल' यांच्या हस्ते मधुसूदन भावे यांना श्रीफल व देणगी अर्पण केली.

८. वि. स. खांडेकर पारितोषिके

महाराष्ट्रातील विद्यापीठांनी १९७५ मध्ये घेतलेल्या कला स्नातक परीक्षांत, मराठी ऐच्छिक विषयात प्रथमांक मिळविणाऱ्या परीक्षार्थींना १९७५ वर्षाची वि. स. खांडेकर पारितोषिके एप्रिल १९७६ मध्ये पाठविण्यात आली. त्यांची नावे :—

१) श्री. बाबुराव केरबाराव शिंदे, मराठवाडा विद्यापीठ
२) कु. शोभा वी. महाजन, एस. एन. डी. टी. (स्त्री महाविद्यालय), मुंबई.
३) कु. उषा गोपाळ भालवणकर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
४) कु. निवेदिता अशोक चितळे, मुंबई विद्यापीठ
५) कु. ज्योती जनार्दन कस्तुरे, नागपूर विद्यापीठ.
६) कु. रेखा बाळकृष्ण करंदीकर, पुणे विद्यापीठ.

९. सन्माननीय व्यक्तींच्या भेटी — सत्कार

९.१ विदर्भ महाविद्यालयातील तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक श्री. दि. य. देशपांडे नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्यांचा दि. ११ एप्रिलला सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी मुंबईचे तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक मे. पुं. रेगे आणि सौंदर्यशास्त्राचे लेखक प्रा. पाटणकर उपस्थित होते. प्रा. सौ. मनुताई नातूहि उपस्थित होत्या. साहित्य समीक्षा विषयक प्रश्नांची चर्चा झाली. अध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे यांनी समयोचित भाषण केले व सरचिटणीस श्री. गो. स. देहाडराय यांनी आभार मानले.

९.२ शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या विद्यमाने नागपूर येथे भरविलेल्या 'नवसाक्षरांसाठी साहित्यनिर्मिती' या शिबिराचे संयोजक श्री. मनोहर पंधे यांनी दि. १९–४–७६ ला संघाला भेट दिली. अमराठी भाषिकांना मराठी विषय कसा शिकवावा ह्या विषयावर चर्चा झाली. त्यावेळी डॉ. मधुकर आष्टीकर उपस्थित होते.

९.३ दि. २२–५–७६ ला सुप्रसिद्ध उद्योगपती आणि संतवाङमयाचे अभ्यासक श्री. बाबुराव पारखे यांचा सत्कार करण्यात आला. त्यांचे 'भौतिक विज्ञान आणि वैदिक संस्कृति' या विषयावर भाषण झाले.

१०. नवीन आजीव सभासद

सौ. मनोरमाबाई महादेवराव घोटे, गोंदिया.
डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, नागपूर.
डॉ. वसंत नरहर वांकर, नागपूर.

११. शाखावृत्त

तुमसर, जिल्हा भंडारा येथे नवीन शाखा स्थापन करण्यात येऊन अस्थायी कार्यकारी मंडळ निवडण्यात आले. कार्यक्रम झाले ते असे – डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती (१४ एप्रिल ७६), कामगार कल्याण केंद्राच्या सहकार्याने विविध मनोरंजनाचे कार्यक्रम (१ मे ७६).

इतर शाखांचे वृत्त हाती आले नाही.

साभार पोच

[दि० १६–३–७६ ते १५–५–७६ पर्यंत युगवाणीला भेट म्हणून पुस्तके आली ती अशी :]

पॉप्युलर प्रकाशन, ३५ सी, ताडदेव रोड, मुंबई ३४

सांजशकुन – जी. ए. कुळकर्णी, पृ. २२०, रु. १५.; **धर्म आणि लोकसाहित्य** – दुर्गा भागवत, पृ. २ + ८९, रु. १०, **पानाआडचे फुल** – आशालता भावे, पृ. १५ + २५७, रु. २०, **थँक्यु मिस्टर ग्लॅड** – अनिल बर्वे, पृ. ११६ रु. ८.

कॉन्टीनेन्टल प्रकाशन, विजयानगर कॉलनी, पुणे ३०

मरण गंध – वा. रा. कांत, पृ. १५ + ९३, रु. ६. **लोकसाहित्याचे अंतःप्रवाह** – प्रभाकर मांडे, पृ. ३ + ३०२, रु २२.

इतर प्रकाशने

जावई चालून आला – शकुंतला बोरगावकर, प्रकाशक श्री व सौ. लीला भास्कर गोळे, ८०० अ, सदाशिवपेठ, पुणे ३०, पृ. १२० रु. ८.

संतसमागम – के. ब. कदम, प्रकाशक डॉ. ए. पी. पडोळे, श्रीकृष्ण पेठ, अमरावती, पृ. ६३, रु. ३.

यशवंतराव चव्हाण–(व्याख्यान माला), प्रकाशक, नगरपालिका वाचनालय, कऱ्हाड, पृ. ५८ मूल्य दिले नाही.

मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र – पुर्नविचार – संपादक : कमलाकर दीक्षित, प्रकाशक । युनिव्हर्सल पब्लिकेशन; कोल्हापूर, पृ. ११५, रु. १२.

युगवाणीचे पुढील अंक

जून – जुलै १९७६ (वर्ष ३२ अंक ३ – ४) हा जोड अंक ऑगस्ट १९७६ च्या पहिल्या आठवड्यात प्रकाशित होईल.

दीपावली विशेषांक

यावर्षी दिवाळी आक्टोबरमध्ये असल्यामुळे युगवाणीचा ऑगस्ट – सप्टेंबर १९७६ चा जोड अंक (वर्ष ३२ अंक ५–६) 'दीपावली विशेषांक', आक्टोबर १९७६ मध्ये दसऱ्याच्या सुमारास प्रसिद्ध होईल.

लघुकथा, एकांकिका, कविता, समीक्षात्मक व संशोधनपर आणि ललित लेख पाहिजे आहेत.

जून – जुलै अंकासाठी ते ५ जुलै १९७६ पर्यंत पाठवावे आणि दीपावली अंकासाठी १० सप्टेंबर १९७६ पर्यंत पाठवावे ही विनंती.

—संपादक

युगवाणीच्या वार्षिक वर्गणीदारांना विनंती

आपण युगवाणीच्या १ एप्रिल १९७५ ते ३१ मार्च १९७६ या ३१ व्या वर्षाचे वर्गणीदार होता. त्याबद्दल धन्यवाद. परंतु त्या वर्षाची वर्गणी ३१ मार्च १९७६ ला संपली आहे. पुढील ३२ व्या वर्षाची वार्षिक वर्गणी रु. १५/– मनिऑर्डरने ताबडतोब पाठवावी आणि वर्गणीदार राहावे ही नम्र विनंती.

—संपादक

गणेश व्याख्यानमाला, १९७६–७७

या वर्षीची व्याख्याने औरंगाबादचे सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. **भगवंत देशमुख** देतील. त्यांचा कार्यक्रम असा :—

रविवार, दि. १८ जुलै ७६...विषय "**भारुड या रचनाप्रकाराची वैशिष्ट्ये — एकनाथपूर्वकालीन भारुड.**"

सोमवार, दि. १९ जुलै ७६ –
विषय – "**एकनाथी भारुड.**"

ही दोन व्याख्याने नागपूर येथे विदर्भ साहित्य संघात सायंकाळी ६–३० वाजता होतील.

तिसरे व्याख्यान विदर्भ साहित्य संघाच्या वणी शाखेतर्फे वणी येथे मंगळवार दि. २० जुलै ७६ ला होईल. भारुड या विषयाच्या संदर्भात "**आधी कळस मग पाया**" हा व्याख्यानाचा विषय राहील.

सर्व व्याख्यानांना प्रवेश निःशुल्क राहील.

—गो. स. देहाडराय
सरचिटणीस

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

वार्षिक साधारण सभेची सूचना

घटना नियम १० (अ)प्रमाणे विदर्भ साहित्य संघाच्या सभासदांना सूचना देण्यात येते की, विदर्भ साहित्य संघाची वार्षिक साधारण सभा रविवार दि. २५ जुलै १९७६ ला दुपारी ४ वाजता नागपूर येथे केंद्रीय कार्यालयात भरेल.

सभेपुढील विषय

१. मागील वार्षिक साधारण सभेचा अहवाल.
२. गत वर्षाचे कार्यवृत्त.
३. १९७५–७६ सालचे हिशेब तपासनीसाकडून तपासून घेतलेले हिशेब.
४. पुढील (१९७६–७७) वर्षाचे अंदाजपत्रक.
५. १९७६–७७ करिता अधिकृत (चार्टर्ड) हिशेब तपासनीसाची नेमणूक.
६. निवडणुकी बाबतच्या तक्रारींचा विचार करून निकाल देण्यासाठी लवादाची नियुक्ती (घटना नियम १२ 'औ' प्रमाणे).
७. अध्यक्षांच्या अनुमतीने येणारे अन्य विषय.

गणपूर्तीच्या अभावी सभा स्थगित झाल्यास ती सभेच्या वेळेनंतर त्याच दिवशी व त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने भरेल व तिला गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.

संघाच्या साधारण सभेत मांडावयाचे ठराव अगर सूचना यांची लेखी पूर्वसूचना सभासदाने सभेपूर्वी चार दिवस अगोदर कार्यालयाकडे दिली पाहिजे.

ह्या सभेला सर्व सभासदांनी उपस्थित राहावे ही विनंती.

विशेष सूचना :– घटना कलम ९ (इ) अन्वये सभासद होऊन बारा महिने न झालेल्या नव्या सभासदास मताधिकार राहणार नाही.

नागपूर
दि. ३१–५–७६

गो. स. देहाडराय
सरचिटणीस

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ

त्रेपन्नाव्या वर्षाचा वृत्तान्त

(१ एप्रिल १९७५ ते ३१ मार्च १९७६)

विदर्भ साहित्य संघाच्या त्रेपन्नाव्या म्हणजे १९७५-७६ ह्या वर्षाचा वृतान्त वार्षिक साधारण सभेपुढे सादर करताना, सभासदांना तो समाधानकारक वाटेल आणि पुढील वर्षातील प्रगती-विषयी ते निःशंक राहतील असा आम्हाला विश्वास वाटतो. नवीन कार्यकारी मंडळाला, दि. १-४-७४ ला सेवाधिकार स्वीकारल्यानंतर, कोणती आणि किती कामे करावी लागली हे सभासदांना विदित असल्यामुळे त्यांचा पुनरुच्चार करण्याची आवश्यकता नाही. येवढे मात्र सांगावेसे वाटते की सतत परिश्रमात उणीव पडलेली नाही. तरीही काही महत्वाच्या सुधारणा करावयाच्या राहिल्या आहेत. ह्याची जाणीव आम्हाला आहे. पुढील वर्षात त्या करून दाखवू असा आत्मविश्वास आहे. अर्थात् त्या घडवून आणण्यास सर्वांचे सक्रिय साहाय्य आम्हाला मिळावे ही अपेक्षा व्यक्त करून विदर्भ साहित्य संघाच्या कार्याचा आढावा सभेसमोर ठेवण्यात येत आहे.

१. कार्यालय व्यवस्थापन

१.१ **सभासद संख्या :** (३१-३-७६ पर्यंत)-उपकर्ते ९, आश्रयदाते ४, सहाय्यक १, हितचिंतक २, आजीव सभासद-२५७ आणि साधारण सभासद-७६८ = एकूण-१०४१.

१.२ **शाखा :-** अकोला, आकोट, उमरखेड, खामगाव, गोंदिया, चंद्रपूर, चिखली, दारव्हा, बुलढाणा, यवतमाळ आणि वणी या ठिकाणी संघाच्या शाखा आहेत.

१.३ **संलग्न संस्था :-** रंजन कला मंदिर, नागपूर, सुरुची निकेतन, नागपूर, सुभाष मंडळ नागपूर, सार्वजनिक वाचनालय, अचलपूर या संस्था संलग्न म्हणून आहेत.

१.४ **वार्षिक साधारण सभा :-** वार्षिक साधारण सभा, रविवार दिनाक २७ जुलै ७५ ला सायं ४ वाजता, गडकरी सभागृहात, संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या सभेत १९७५-७६ चा अर्थसंकल्प मान्य करण्यात आला. तो युगवाणीच्या एप्रिल-मे ७५ च्या अंकात प्रकाशित केला आहे. सभेचे सविस्तर प्रतिवृत्त संबंधित पुस्तकात लिहिण्यात आले आहे.

१.५ **कार्यकारी मंडळाच्या सभा :-** या वर्षात १३ एप्रील, २२ जून, २७ जुलै, ९ नोव्हेंबर, १४ डिसेंबर १९७५ आणि ६ जानेवारी १९७६ ला अशा सहा सभा झाल्या. दि. ९-११-७५ च्या सभेत मराठी साहित्य महामंडळावर प्रतिनिधी म्हणून श्री. त्रिं. गो. देशमुख व श्री. गो. स. देहाडराय यांची नियुक्ती झाली. दि. १४-१२-७५ च्या सभेत अचलपूर येथील संलग्न संस्थेने दिलेले, वि. सा. संघाचे ३२ वे साहित्य संमेलन भरविण्याचे आमंत्रण स्वीकारण्यात आले.

संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी माननीय वैदर्भीय साहित्यिकांची तीन नांवे सुचविण्यात आली त्यातून अचलपूर येथील स्वागत मंडळाने सुप्रसिद्ध साहित्यिक व युगवाणीचे विद्यमान संपादक डॉ० मधुकरराव आष्टीकर यांची अध्यक्षपदासाठी एकमताने निवड केली.

१.६ **विश्वस्त मंडळ :** काही विशेष प्रयोजन नसल्यामुळे विश्वस्तांची सभा झाली नाही.

२. दिवंगतांना श्रद्धांजली

वृत्तान्ताच्या काळात निम्नलिखित दिवंगत व्यक्तींना आदरपूर्वक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली : आनंदराव काळे – आजीव सभासद, श्री. ना. वनहट्टी – थोर साहित्यिक, समीक्षक व श्रेष्ठ ज्ञानोपासक; छगनलाल भरूका, देवराम अंबादास उपाध्य बाबासाहेब नाईक, आजीव सभासद; न्यायमूर्ती के. तु. मंगलमूर्ती – भूतपूर्व कार्यकारी विश्वस्त व हितचिंतक सदस्य; वि. घ. देशपांडे – सुप्रसिद्ध सामाजिक व राजकीय कार्यकर्ते आणि भूतपूर्व लोकसभा सदस्य; पंडित शंकरराव सप्रे–गायनाचार्य; पां चि. करकरे, तरुण भारता चे संपादक, वसंतराव देसाई – नाट्याचे व संगीताचे व्यासंगी अभ्यासक, वि. पु. भागवत – सुप्रसिद्ध मुद्रक व प्रकाशक, चं. वि. बावडेकर – साहित्यिक आणि संपादक, शांताराम आठवले – गीतकार व प्रवचनकार, थिरकवा–अखिल भारतीय कीर्तीचे तबलावादक, दामुअण्णा मालवणकर – सुप्रसिद्ध विनोदी नट.

३. संघाचा वर्धापन दिन

मकर संक्रांतीच्या दिवशी दि. १४ जानेवारी ७६ ला संघाचा त्रेपन्नावा वर्धापन दिन साजरा झाला. सुप्रसिद्ध गायिका सौ. कुसुम चाफळे यांच्या सुस्वर मंगलगीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली. समारंभाचे अध्यक्षस्थान न्या. मू. मासोदकर यांनी मंडित केले होते. त्यांच्या हस्ते कै. न्या. मू. के. तु. मंगळमूर्ती यांच्या छायाचित्राचे अनावरण झाले. वि. सा. संघाच्या अचलपूर येथील आगामी साहित्य संमेलनाचे निर्वाचित अध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर यांचा सत्कार करण्यात आला. पी. एच्‌डी. पदवी मिळाल्याबद्दल डॉ. सौ आशा सावदेकर व डॉ. सौ. शकुंतलाबाई खोत यांचा सत्कार करण्यात आला. त्याच प्रसंगी १९७४ या वर्षाची वि. स. खांडेकर पारितोषिके मिळविणारांची नांवे घोषित करण्यात आली. वि. सा. संघाच्या मराठी भाषेच्या परीक्षात प्रथमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांना आणि कै इंदिराबाई खरे शालेय वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना अध्यक्षांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली

५. मान्यवर व्यक्तींच्या भेटी व सन्मान

खालील मान्यवर व्यक्तींनी व साहित्यिकांनी संघाला भेटी दिल्या. त्यावेळी त्यांचा सन्मान करण्यात आला. श्री. गं. बा. सरदार – साहित्यिक व समीक्षक; महाराष्ट्रातील विद्यापीठांचे कुलगुरु, डॉ. दाभोळकर (पुणे), श्री. शंकरराव खरात (मराठवाडा), डॉ. माधुरीबेन शहा (एस. एन. डी. टी.), बॅ. पाटील (शिवाजी), प्रा. टोपे (मुंबई) व डॉ. दे. य. गोहोकर (नागपूर); माननीय श्री. रा. धों. भंडारे – बिहारचे राज्यपाल, श्रीमती डॉ. चित्रा नाईक – संचालिका, शिक्षण विभाग म. राज्य, सर्वश्री शंकर पाटील, पुणे, उद्धव शेळके, मुंबई, मधु जामकर, परळी, बाबा मोहोड, अमरावती, शरच्चंद्र टोंगो, यवतमाळ, सौ. शैलजा राजे, पुणे, श्रीमती शैला लोहिया, आंबेजोगाई, देविदास सोटे, वर्धा, मधुकर केचे, अमरावती, दत्ता भगत, दातेगावकर, कोतापल्ले (मराठवाडा), –साहित्यिक; श्री. कृ. द. पुराणिक, संचालक, ग्रंथालय, महाराष्ट्र राज्य, श्री. शाहीर दादा कोंडके, सुप्रसिद्ध निर्माते, दिग्दर्शक व कलाकार.

५. अभीष्ट चिंतन

५.१ मराठी काव्यात मुक्तछंदाचे प्रथम प्रवर्तन करणारे व 'अनिल' या कविनामाने विख्यात असलेले श्री. आत्माराम रावजी देशपांडे यांचा अमृत महोत्सव दि. ११–९–७५ ला गडकरी सभागृहात, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. दे. य. गोहोकर यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा झाला. त्यावेळी डॉ. वि. भि. कोलते आणि प्रा. वा. कृ. चोरघडे यांची भाषणे झाली. श्री. आ. रा. देशपांडे यांनी सत्काराला समयोचित उत्तर दिले.

५.२ महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध लेखक, ग्रंथकार व थोर विचारवंत तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या पंचाहत्तराव्या वाढदिवसानिमित्त दि. १४–९–७५ ला धनवटे रंगमंदिरात डॉ. भवानीशंकर नियोगी यांच्या अध्यक्षतेखाली सत्कार करण्यात आला. या प्रसंगी डॉ. वि. भि. कोलते, डॉ. ग. त्र्यं. देशपांडे, डॉ. ना. र. देशपांडे, डॉ. वर्णेकर आणि डॉ. प्रभा हातवळणे यांची भाषणे झाली.

५.३. डॉ. पु. ना. प्रधान यांच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजिलेल्या नागरिक सभेत वि. सा. संघातर्फे त्यांना पुष्पमाला अर्पण करून त्यांचे अभीष्ट चिंतन करण्यात आले.

६. जन्मशताब्दी

श्री ज्ञानेश्वर सप्त जन्मशताब्दी निमित्ताने श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयातील विद्यार्थीनींनी ज्ञानेश्वरीतील निवडक ओव्यांचे सामूहिक वाचन केले व चर्चा केली.

७. स्मृतिदिन

७.१. खालील मान्यवर साहित्यिकांचे स्मृतिदिन पाळण्यात आले.

नाना जोग	१–५–७५	'दहातून एक गेला बाकी शून्य' व 'रॅगींग' ह्या एकांकिका सादर करण्यात आल्या
कृ. प्र. खाडिलकर	३०–८–७५	प्रतिमेला पुष्पहार.
ना. मु. गुप्ते कविवर्य 'बी'	३०–८–७५	,, ,, डॉ.वि.रा. करंदीकर यांचे हस्ते.
अण्णाजी बोवडे	१–१०–७५	प्रतिमेला पुष्पहार.
य. खु. देशपांडे	२०–११–७५	,, ,,
राम गणेश गडकरी	२३–१–७६	डॉ. प्रा. सौ. शकुंतलाबाई खोत यांचे व्याख्यान.

७.२. छत्रपति श्री शिवाजी महाराज जयंती (१३ मे ७५), गांधी जयंती (२ ऑक्टो.), बाबासाहेब आंबेडकर जयंती व महानिर्वाण दिन (१४ एप्रिल आणि ६ डिसेंबर) ह्या दिवशी त्यांचे पुण्यस्मरण करण्यात आले.

८. सांस्कृतिक कार्यक्रम (संयोजक – श्री. वा. के. अत्रे)

८.१. गणेश व्याख्यानमाला.

ही व्याख्यानमाला दि. ३० व ३१ ऑगस्ट या दिवशी पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. वि. रा. करंदीकर यांनी गुंफली. विषय–(१) वामन पंडित--व्यक्ति आणि वाङ्मय (२) वामन पंडित--कवि आणि तत्त्वज्ञ. डॉ. करंदीकर यांचे तिसरे व्याख्यान संघाच्या शाखेतर्फे आकोला येथे दि. १ सप्टेंबरला झाले. त्याचा विषय 'वामन पंडित -- गीतेचे भाष्यकार' हा होता.

८.२. वेहेरे व्याख्यानमाला.

ही १९७५ची व्याख्यानमाला दि. १६, १७ व १८ ऑगस्ट ७५ ला, मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयाच्या मराठी विभागाचे सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. म. वा. धोंड ह्यांनी गुंफिली. १) मराठी लावणी २) कलगी तुरा ३) लावणी, पोवडा आणि कीर्तन ह्या विषयांवर त्यांची तीन व्याख्याने झाली.

१९७६ च्या व्याख्यानमालेची सुरवात कै. वेहेरे यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी म्हणजे दि. १९ जाने. ७६ ला झाली. सुप्रसिद्ध इतिहास संशोधक श्री. सेतुमाधव पगडी यांनी "मध्ययुगीन भारतातील साहित्यिक व सांस्कृतिक प्रवाह" या विषयावर दि. १९, २० व २१ जानेवारीला व्याख्याने दिली. या प्रसंगी कै. वेहेरे यांच्या पत्नी श्रीमती विमलाबाई व चिरंजीव श्री. प्रतापराव वेहेरे उपस्थित होते.

८. ३. सुप्रसिद्ध साहित्यिक व विनोदी लेखक डॉ. अ. वा. वर्टी यांचे 'शब्दसृष्टीचे ईश्वर' या विषयावर दि. २१–५–७५ ला व्याख्यान झाले.

८. ४. छायाचित्रांचे अनावरण :

दि. ११ जून ७५ ला डॉ. वांकर ह्यांनी वि. सा. संघाला दिलेल्या प. वा. साने गुरुजी यांच्या तैलचित्राचे अनावरण आणि 'साने गुरुजींची जीवनगाथा' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. वि. भि. कोलते यांचे हस्ते झाले. सुप्रसिद्ध उर्दु कवी प्रा. मनशा आणि हिंदी कवि श्री. रमेश गुप्ता यांनी साने गुरुजींचे जीवन दर्शन घडविणाऱ्या स्वरचित कविता म्हटल्या.

दि. १३ जुलै ७५ ला नागपूर नाट्य मंडळाने वि. सा. संघाला दिलेल्या सुप्रसिद्ध नाटचकलावंत व दिग्दर्शक कै. सखारामपंत जोशी यांच्या छायाचित्राचे अनावरण संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे यांचे हस्ते झाले. डॉ. वि. भि. कोलते. प्रा. माणिकराव वैतुले, प्रा. सुंभ, सौ. सरलाताई ढवळे, डॉ. श्रीराम म्हैसाळकर, श्री. शंकरराव कुळकर्णी, ॲड. वैद्य आणि सर्वश्री घारपुरे, देहाडराय व खेरडीकर यांची भाषणे झाली.

दि. २ ऑक्टो. ७५ ला विदर्भातले पहिले मराठी कादंबरीकार कै. बाळकृष्ण सन्तुराम गडकरी यांच्या छायाचित्राचे अनावरण संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे ह्यांचे हस्ते झाले. अमरावतीच्या डॉ. सिंधुताई मांडवकर व कै. गडकरी ह्यांचे चिरंजीव श्री. मु. बा. गडकरी यांची भाषणे झाली. कै. गडकऱ्यांचे छायाचित्र त्यांचे वडील चिरंजीव, ॲड. पां. बा. गडकरी व त्यांच्या आप्तांनी वि. सा. संघाला भेटीदाखल दिले.

८.५ अभिनंदन

मराठीतील सुप्रसिद्ध कादंबरीकार व साहित्यिक श्री. वि. स. खांडेकर यांना १९७४ चे भारतीय ज्ञानपीठाचे एक लाखाचे सर्वोच्च पारितोषिक मिळाल्यावद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

कऱ्हाड येथील एकावनाव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी कु. दुर्गा भागवत यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

८.६ न्या. मू. रानडे आंतरमहाविद्यालयीन वादस्पर्धा

ही स्पर्धा वक्तृत्वोत्तेजक सभा आणि वि. सा. संघ या संस्थांच्या विद्यमाने २६; २७ व २८ सप्टेंबरला आयोजित करण्यात आली. स्पर्धेचा विषय 'सध्याचा शिक्षणाचा दर्जा खालावला

आहे ' हा होता. स्पर्धेत एकूण १६ महाविद्यालयाच्या ३२ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. स्पर्धेचा निकाल आणि पारितोषिक वितरण समारंभाचे वृत्त युगवाणीच्या दिवाळी अंकात (ऑक्टोबर–नोव्हेंबर ७५) दिलेले आहे.

८.७ कै. इंदिराबाई खरे शालेय वक्तृत्व स्पर्धा

११ जानेवारी ७६ ला कै. इंदिराबाई खरे शालेय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली. स्पर्धेचा विषय ' एक सतत आठवणारी गोष्ट ' हा होता. या स्पर्धेचा निकाल युगवाणीच्या डिसें, ७५ जानेवारी ७६ च्या अंकात दिला आहे.

९. परीक्षा समिती (संचालक प्रा. माणिक के. बैतुले)

९.१ ऑगस्ट ७५ व जानेवारी ७६ या दोन सत्रात, विद्यालयीन २१२६, महाविद्यालयीन ६८०, शासकीय १४१, असे एकूण २९४७ परीक्षार्थी विविध परीक्षांना बसले. गतवर्षीपेक्षा ही संख्या ६१४ ने वाढली.

९.२ गतवर्षी प्रत्यक्ष उत्पन्न रु. ७६६१ तर प्रस्तुत वर्षी रु. १३,१९९ झाले. उत्पन्न रु. ५,५३८ ने वाढले. त्याचप्रमाणे गतवर्षी ९२९१ रु. तर या वर्षी रु. १२,१९३ व्यय झाला. गतवर्षी २६३० रु. ची तूट होती तर या वर्षी शिल्लक रु. १,००६ आहे.

९.३ प्रस्तुत वर्षी प्रतिसत्र प्रतिपरीक्षा सर्वप्रथम येणाऱ्यास पारितोषिके देण्यात आली. सर्वाधिक परीक्षा शुल्क देणाऱ्या केंद्रव्यवस्थापकांसही पारितोषिके देण्यात आली.

९.४ प्रस्तुत वर्षी एकूण ५३ केंद्रात परीक्षा झाल्या. ऑगष्ट सत्रात सर्वाधिक परीक्षार्थी व परीक्षा शुल्क, जनता शिक्षण महाविद्यालय, चंद्रपूर, जानेवारी ७६ मध्ये सिंधी हिंदी हायस्कूल, नागपूर यांनी मिळवून दिले. त्यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषक देण्यात आले.

९.५ अवांतर पारितोषिके युगवाणी फे.–मा. ७६ च्या महिला विशेषांकातल्या कार्यवृत्तात पृ. ५२ वर प्रकाशित झाली आहेत.

१०. नाट्यसमिती (संयोजक – श्री. अ. व्यं. जागीरदार)

१०.१ ' रजनी–गंधा ' नाट्यप्रयोग दि. १३ एप्रिलला सादर केला, ' कार्तिकी ' बोलपटात उत्कृष्ट भूमिका केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य पुरस्कार प्राप्त झालेले विदर्भातील कलावंत श्री. मोहन कोठीवान यांचा २६ मे ७५ ला सत्कार करण्यात आला.

१०.२ हौशी व होतकरू कलावंतासाठी नाट्यशिक्षण शिबिर, ४ ते ११ मे ह्या आठवड्यात आयोजित करण्यात आले. त्याचे मार्गदर्शन प्रा. कमलाकर सोनटक्के, नाट्यविभाग प्रमुख, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी केले.

१०.३ ' घर आंगण ' उपक्रमाखाली श्री. शिरीष गोपाळ देशपांडे लिखित ' शून्यपूर्ण ' ही एकांकिका १५–६–७५ ला सादर करण्यात आली.

१०.४ इतर स्पर्धा आयोजित करण्यात आल्या त्या अशा : (१) आंतर महाविद्यालयीन खोलकुटे नाट्यस्पर्धा (२) बालनाट्यस्पर्धा व (३) कै. पद्माकर डावरे एकांकिका स्पर्धा. यशस्वी झालेल्या स्पर्धकांची आणि वैयक्तिक अभिनयात प्रशंसापात्र कलावंतांची नांवे युगवाणी फेब्रु. मार्च ७६ च्या कार्यवृत्तात देण्यात आली आहेत.

१०.५ विदर्भ साहित्य संघाच्या वास्तूतील कोठेकर दालनाचा संपूर्ण वापर रंजन कलामंदिर ही संलग्न संस्था बरेच वर्षापासून विनामूल्य करीत होती. ते दालन मोकळे करून त्या संस्थेने २८–९–७५ ला इतरत्र स्थानांतर केले. त्यावेळी त्या संस्थेने तीन टयूब लाइटस् आणि कै. नाना जोगांचे चित्र वि. सा. संघाला भेट म्हणून दिले.

११. चित्रकला आणि संगीत समिती (आमंत्रक – श्री. आनंद जोग)

सुप्रसिद्ध सीनेगीत दिग्दर्शक श्री. सी. रामचंद्र (चितळकर) यांनी स्वरमंडळास दि. १७–१–७६ ला भेट दिली आणि संगीतविषयक प्रश्नांवर अनौपचारिक चर्चा केली.

